**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेतलेल्या इयत्ता १०वी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शहर तसेच उपनगरांतील नामांकित शिक्षण संस्थांनी आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. करोनानंतरच्या काळात सुरू झालेल्या शाळा, ऑनलाइनचा प्रभाव यातून अभ्यासात येणाऱ्या अडचणी यावर मात करीत शिक्षण संस्थांनी १०० टक्के निकाल राखण्यात यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांना सरासरी ९२ ते ९६ टक्के पर्यंत गुण मिळण्याचे प्रमाण अधिक आहे. यासह विषयानुरूप अधिकाधिक गुण मिळवण्यातही विद्यार्थीही यशस्वी ठरले असल्याचे शाळांच्या निकालाच्या आकडेवारीतून दिसून आले. दहावी परीक्षेत मिळालेले यश हेच पुढील शिक्षणाचा पाया आहे. याबद्दलची विद्यार्थ्यांमध्ये असणारी जागरूकता निकालातून दिसून येत आहे. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षकांसह आपल्या यशाचे श्रेय पालकांनाही दिले.**

### भारती विद्यापीठ शाळांचा निकाल ९९.०८ टक्के

**पुणे** - भारती विद्यापीठ अंतर्गत विविध शाळांतील इयत्ता दहावीचा एकूण निकाल ९९.०८ टक्के इतका लागला आहे. दहावी परीक्षेस यंदा २५०० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २४७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखल्याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा विजयमाला कदम आणि कृषी व सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी व शिक्षकांनी तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### दारूवाला एज्युकेशन सोसायटी शाळेचे यश

**पुणे** - गुलटेकडी येथील दारूवाला एज्युकेशन सोसायटीच्या क्रिसेंट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. दहावी परीक्षेत क्रिसेंट हायस्कूलमधील २०६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. शाळेतून आयुष वाळुंज हा विद्यार्थी ९७.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. शेख युसरा मोहम्मद व परदेशी श्रद्धा अतुल या दोन्ही मुलींनी प्रत्येकी ९६.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. एकूण २०६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातून १३५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. फराह दारूवाला व हिना दारूवाला यांनी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापिका शालिनी दुबे, उपमुख्याध्यापिका निलोफर शेख, नादिया शेख , सर्व शिक्षक व पालकांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### ॲड. जाधवर विद्यालयाचा निकाल १०० टक्के

**पुणे** - नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या ॲड.शार्दुल सुधाकरराव जाधवर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. त्याचप्रमाणे प्रा. डॉ. सुधाकरराव जाधवर माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९८.११ टक्के लागला आहे. तर, पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्यूनियर कॉलेजचा निकाल ९७.६० टक्के लागला आहे. ॲड.शार्दुल सुधाकरराव जाधवर माध्यमिक विद्यालयाचा आदित्य ढाकणे हा ९१.६० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. प्रा.डॉ.सुधाकरराव जाधवर माध्यमिक विद्यालयाची निकिता भिकुले ही ७७.८० टक्के मिळवून प्रथम आली आहे. पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूलचे तेजस जाधव हा ९४.६० टक्के घेत पहिला आला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर व उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी अभिनंदन केले.

### महाराष्ट्र विद्यार्थी सहाय्यक मंडळ अव्वल

**पुणे** - महाराष्ट्र विद्यार्थी सहाय्यक मंडळ संचलित अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, महर्षी वाल्मीक विद्यालय कोळविहिरे, जडाबाई दुगड विद्यालय कोंढवा आणि शारदा निकेतन इंग्लिश मीडियम स्कूल बारामती या सर्व शाखांचा दहावीचा निकाल यंदाही १०० टक्के लागला आहे. सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्र विद्यार्थी सहाय्यक मंडळ संचलित सर्व शाखांचा निकाल हा शंभर टक्के लागला आहे.

यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शन करणारे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थेचे सचिव प्रसाद आबनावे, खजिनदार प्रथमेश आबनावे, सहसचिव पुष्कर आबनावे, सदस्य गौरव आबनावे, प्रज्योत आबनावे यांनी अभिनंदन केले. यावेळी या सर्व शाखांचे प्राचार्य विद्या कांबळे, सुनील भालके, विनिता कुंलुगे, शबाना खान या सर्व प्राचार्यांनी घेतलेले परिश्रम याबद्दल संस्थेचे मानद अध्यक्ष मोहन जोशी व चेअरमन सुमन घोलप यांनी अभिनंदन केले.

### आझम कॅम्पसच्या शाळांचे घवघवीत यश

दहावीच्या परीक्षेत महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूल, अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूल, एम.सी.ई.एस. इंग्लिश मिडीयम स्कूल या शाळांनी घवघवीत यश मिळवले आहे. अँग्लो उर्दू गर्ल्स हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. यात शेख उम्मेहनी अकबर ही ९०.२० टक्के मिळवून हायस्कूलमध्ये प्रथम आली. अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूलचा उर्दू माध्यमाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यात शेख अबुतालिब मोहम्मद नियाज हा ८८.४० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. अँग्लो उर्दू बॉईज हायस्कूलचा इंग्रजी माध्यमाचा निकाल ९१.११ टक्के लागला आहे. यात शाह अमिना इमामुद्दीन ही ९७. ६० टक्के मिळवून हायस्कूलमध्ये प्रथम आली आहे. एम.सी. ई.एस.इंग्लीश मिडीयम स्कुलचा निकाल शंभर टक्के लागला. हन्नुरे नोमान मोहम्मद शरीफने ९१.२० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ.पी. ए. इनामदार, उपाध्यक्षा आबेदा इनामदार, सचिव प्रा. इरफान शेख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मॉडर्न गर्ल्स हायस्कूलचा निकाल ९७.८१ टक्के

**पुणे** : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न गर्ल्स हायस्कूल प्रशालेचा दहावीचा निकाल ९७.८१% लागला आहे. प्रशालेत प्रथम क्रमांक जाधव श्रेया ९५.६० %, द्वितीय आढावे क्षितिजा, पासलकर अंकिता ९५.०० %, तृतीय देशमुख प्रिया ९३.८० % या विद्यार्थिनींनी प्रशालेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त केले. ९०% पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनी ०७ आहेत. ८०%च्या पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यर्थिनी ३२ आहेत. ७०%च्या पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनी ४३ आहेत. ६०%च्या पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनी १०१ आहेत. ५०%च्या पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनी ७२ आहेत. ३५%या पुढे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनी ५९ आहेत. कर्णबधिर युनिटमधील ४ विद्यार्थिनी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्या आहेत. जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजनेत ९१.८०% गुण मिळवून अंजली जाधव ही विद्यार्थिनी प्रथम आली.

प्रभात Sat, 18 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68690617

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# राणी लक्ष्मीबाई यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** झाशीची राणी लक्ष्मीबाई यांना स्मृतिदिनानिमित्त शनिवारी अभिवादन करण्यात आले. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौक येथे झालेल्या कार्यक्रमात महापालिका उपायुक्त विलास कानडे यांच्या हस्ते राणी लक्ष्मीबाई यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संघाचे अध्यक्ष मकरंद फणसळकर, पदाधिकारी, राष्ट्र सेवा समिती आणि मॉडर्न विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक या वेळी उपस्थित होते. मॉडर्न विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बँडवादन केले.

झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याची उभारणी सुरू असताना कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे एक तृतीयांश रक्कम लोकसहभागातून गोळा केली होती. त्यामुळे दरवर्षी या कार्यक्रमामध्ये महापौरांबरोबर संघाच्या अध्यक्षाला राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्यास हार घालण्याचा मान दिला जात असल्याची माहिती फणसळकर यांनी दिली.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sun, http

**लोकमत**

# ज्ञानसाधना विद्यामंदिर, मॉडर्न शाळेचे यश

**पुणे :** यशाची परंपरा राखत वडगाव बुद्रुक येथील ज्ञानसाधना विद्यामंदिर मराठी माध्यमाचा सलग सहाव्या वर्षी शंभर टक्के निकाल लागला आहे. यात प्रथम सुनीता चव्हाण, द्वितीय प्रीती निषाद, तर तृतीय क्रमांक वैभव कांबळे याचा आला आहे. दोन्ही माध्यमाचे मुख्याध्यापक शिवराम डोईफोडे, राजश्री बोबडे, वैशाली किजबिले व अनिल चौधरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

गणेशखिंड रोडवरील मॉडर्न हायस्कूलचा निकाल ९४ टक्के लागला आहे. यात तनुजा शेळके प्रथम, वेदांत दबडे द्वितीय; तर निधी माडेवर ही विद्यार्थिनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. त्यांना मार्गदर्शन कलाशिक्षक शीलरत्न बंगाळे, पर्यवेक्षक रूपाली जोशी यांचे लाभले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख या सर्वांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Hello Pune
Page No. 3 Jun 20, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

### आरोग्य वारी : 'सकाळ माध्यम समूह' आणि फिनोलेक्स केबल्सचा उपक्रम

# संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयांचा सहभाग

**पुणे, ता. २०** : आषाढी वारीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मंगळवारी (ता. २१) आळंदी येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने सोमवारी देहू येथून प्रस्थान ठेवले आहे. दोन्ही सोहळे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात येणार आहेत. त्यात सहभागी होऊन वारकऱ्यांसमवेत आरोग्याचा संदेश देणारा 'साथ चल' उपक्रम 'सकाळ माध्यम समूह' व फिनोलेक्स केबल्स यांच्यातर्फे राबविण्यात येणार आहे. या 'आरोग्य वारी'त पिंपरी-चिंचवडमधील संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत.

'वारी विठुरायाची आणि आरोग्य संगोपनाची' ही 'साथ चल'ची संकल्पना आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी चौक, एचए कंपनी वसाहत भुयारी मार्ग आणि पुणे शहरातील पुलगेट अशा तीन ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मोरवाडी चौक ते एचए वसाहतीपर्यंत वारीत सहभागी होऊन दोन पावले चालावीत, आपल्या निरोगी आयुष्याकडे लक्ष द्यावे, असा संदेश दिला जाणार आहे.

### पिंपरीतील शाळा, महाविद्यालये

श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोसरी, लोकमान्य विद्यालय आणि खिंवसरा शाळा वाकड, इंदिरा कॉलेज ताथवडे, अलार्ड कॉलेज वाकड, टीएसएफ वाकड, प्रज्ञा विद्या मंदिर वाकड, आयबीएमआर, डॉ. डी. वाय. पाटील आर्टस् कॉमर्स सायन्स कॉलेज पिंपरी, डॉ. डी. वाय. पाटील फार्मसी, आरएमडी फार्मसी, संघवी-केसरी कॉलेज चिंचवड स्टेशन, एटीएसएस कॉलेज चिंचवड, प्रतिभा इन्स्टिट्यूट चिंचवड, एमयुसी कॉलेज, नॉव्हेल इन्स्टिट्यूट, महापालिका आयटीआय मोरवाडी, महात्मा फुले कॉलेज पिंपरी, गेंदीबाई चोपडा स्कूल व ज्युनिअर कॉलेज, फतेचंद जैन स्कूल,

### सामाजिक संस्था, संघटना

पुणे जिल्हा मतदान मानव अधिकार संघ, स्वराज हाउसिंग सोसायटी मोशी, रणजित कलाटे फाउंडेशन वाकड, जय शिवाजी मित्र मंडळ कासारवाडी. मोरवाडी ज्येष्ठ नागरिक संघ, अजमेरा मासुळकर कॉलनी ज्येष्ठ नागरिक संघ, संत तुकारामनगर ज्येष्ठ नागरिक संघ, पोलिस नागरिक संघटना, सोहम योग केंद्र, झुम्बा महिला ग्रुप एम्पायर स्क्वेअर, प्रगती महिला मंडळ, प्राधिकरण नागरी कृती समिती, विश्व सिंधी समाज महासंघ, अग्रसेन ट्रस्ट, संस्कार प्रतिष्ठान, निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटल, निमा संघटना, सांगवीतील सीझन सोशल वेल्फेअर ट्रस्ट, मधुबन मित्र मंडळ, शिवजिजाऊ महिला प्रतिष्ठान, फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशन, ज्येष्ठ नागरिक संघ सांगवी, डोनेट एड सोसायटी, सांगवी परिसर ज्येष्ठ नागरिक संघ, संत गजानन महाराज मंदिर ट्रस्ट, ह्यूमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशन, तनिष्का महिला व्यासपीठ, बालाजी महिला प्रतिष्ठान, ज्येष्ठ नागरिक संघ एम्पायर इस्टेट, ज्येष्ठ नागरिक महासंघ, पतंजली, अँथिया ज्येष्ठ नागरिक संघ, मानव सेवा विकास ट्रस्ट, सार्थ आयुर्वेदिक चिकित्सालय, मराठवाडा जनविकास संघ, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती, ओम साई फाउंडेशन, भैरवनाथ ज्येष्ठ नागरिक संघ, आडियाल क्लब, डोळस सोशल फाउंडेशन, नमो प्रतिष्ठान, राजीव गांधी प्रतिष्ठान.

SAATH CHAL — सकाळ presents, powered by Finolex Cables

### इथे नोंदवा सहभाग...

व्हॉटस्‌अॅप : ८४८४९७३६०२
ई-मेल : editor.pune@esakal.com

### कुठे व किती वाजता सहभागी व्हाल?

- **बुधवार (ता. २२ जून)** : मोरवाडी चौक, फिनोलेक्स कंपनी प्रवेशद्वार ते एचए कॉलनी प्रवेशद्वार भुयारी मार्गापर्यंत चालणे व दोन्ही ठिकाणी शपथ : १.२ किमी : सकाळी ६
- **शुक्रवार (ता. २४ जून)** : महात्मा गांधी बसस्थानक, पुलगेट, पुणे कॅम्प येथे शपथ : सकाळी ६.३०

### पुण्यात या संस्था, संघटना सहभागी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित महाविद्यालय, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी (एआयएसएसएमएस), सूर्यदत्त इन्स्टिट्यूट, एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ, स्टुडंटस हेल्पिंग हँडस, राष्ट्र सेवा दल अभ्यासिका, सुरेंद्र पठारे फाउंडेशन, कॅम्पफ्लाज, विश्व संवाद केंद्र, पुणे डॉक्टर्स असोसिएशन, विठ्ठल काटे, मकरंद टिल्लू संचलित नवचैतन्य हास्य योग परिवार, सोनल दळवी संचलित तृतीयपंथी परिवार, पुणे बार असोसिएशन, दि फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशन, श्री संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, शिक्षण महर्षी स्व. विलासराव तांबे फाउंडेशन, पीएमपीएमएल महाव्यवस्थापक सुबोध मेडशीकर, वेदांत सांस्कृतिक मंच (कर्वेनगर), क्रिडा भारती पुणे, ममता फाउंडेशन.

Pune, Main
21/06/2022 Page No. 3

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# निसर्गोपचार आश्रमातर्फे योग दिनी विविध उपक्रम

योग दिनानिमित्त निसर्गोपचार आश्रमातर्फे विविध कार्यक्रम आयोजित केले. मागील ३ महिन्यांपासून या योगासनांचे प्रात्याक्षिक आणि ऑनलाइन पद्धतीचे विनामूल्य योग सत्रांसह सुरू झाले. वर्षानुवर्षे योगाबद्दलची जागरुकता वाढत आहे आणि याकारणे संस्थेचा सहभागही वाढत आहे, त्यासाठी तरुणांमध्ये एक योग स्पर्धा आणि भाषण स्पर्धा घेण्यात आली. यात योगाचार्य डॉ. भगवती, वाडेकर, सतीश सोनवणे, तुषार जगदाळे, विजय गाडेकर यांनी कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यात प्रमुख भूमिका पार पाडल्या. डॉ. समृद्धी व्यास यांनी सूत्रसंचालन केले.

यावर्षी आश्रमाने प्रा. डॉ. सत्यलक्ष्मी (संचालक) यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी, पुणे यांच्यासोबत फुगेवाडी मेट्रो स्टेशनवर सामान्य लोकांसाठी, विविध शाळांमधील मुलांसाठी योग, उद्योगातील कर्मचारी, बचत गट यांच्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले. ज्यात १५ हजारांवर नागरिकांनी लाभ घेतला, असे आश्रमचे वैद्यकीय संचालक डॉ. अभिषेक देवीकर यांनी सांगितले. यावेळी वक्ते मनीष अडवाणी यांचे भक्ती योगावर भाषण पार पडले. यावेळी योगनृत्य, योग प्रात्यक्षिके, योगाचे खेळ, पारितोषिक वितरण आणि योगिक सात्विक आहार याद्वारे संपूर्ण योगिक अनुभूती १० ते ८३ वयोगटातील साधकांना घेता आली.

योग आणि निसर्गोपचार यावर मोफत सल्लामसलत आणि मार्गदर्शन करण्यासाठी निसर्गोपचार आश्रमाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. कुशन शाह यांच्यासह डॉक्टरांची एक टीम पदनियुक्त करण्यात आली आहे. व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे यांच्या नेतृत्वाखाली आश्रमाचे कार्य सुरू आहे. आश्रमाचे व्यवस्थापक प्रवीण कुंभार म्हणाले, 'आश्रमात ट्रस्टचे संस्थापक महात्मा गांधीजींचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या मोफत अशा सेवा समाजातील सर्व सामाजिक, आर्थिक गटांसाठी परवडणाऱ्या दरात आणि गरजू आणि गरीबांसाठी उपलब्ध आहेत.'



डॉ. ऋषिकेश काकांडीकर, प्रा. सुमित निकम, प्रा. ओंकार मोरे आदी उपस्थित होते.

**अनुयश आरोग्य प्रतिष्ठान**

प्रतिष्ठानतर्फे ऑनलाइन मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी गोव्यातील प्रसिद्ध योग अभ्यासक अंजू देसाई यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके दाखवून त्याविषयी सविस्तर माहिती दिली. तर ज्येष्ठ मधुमेह संशोधक डॉ. रवींद्र नांदेडकर यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन सत्रात अनुयश आरोग्य प्रतिष्ठानच्या सचिव रूपाली नांदेडकर, विश्वस्त विलास नेवपूरकर, प्रतिष्ठानचे समन्वयक विजय निंबाळकर आदी सहभागी झाले होते.

**मॉडर्न हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय**

गणेशखिंड रस्त्यावरील मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात उपमुख्याध्यापिका सुरेखा कामठे, पर्यवेक्षक शारदा साबळे, शीलरत्न बंगाळे यांच्या मार्गदर्शनानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी कमिंस इंडियामधील सेवानिवृत्त झालेले योगशिक्षक सुनील शास्त्री तसेच मनीषा नाडे यांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले. योगाचे महत्व प्रशालेतील शिक्षिका जया फुलपगार, हनुमंत तापकीर, तृप्ती वाव्हळ यांनी सांगितले.

प्रभात Wed, 22 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68761770

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## मॉडर्न गर्ल्स शाळेत योग

पुणे : शिवाजीनगर येथील पी. ई. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापिका अनिता बसाळे, संस्था समन्वयक माया नाईक यांनी विद्यार्थिनींना योगाचे महत्त्व सांगितले. पर्यवेक्षिका सुजाता तांबे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींकडून पूरक हालचाली; तसेच व्यायाम प्रकार घेण्यात आले. उभे आसन प्रकार, बैठे आसन प्रकार, पोटावरील व पाठीवरील आसने घेण्यात आली. प्राणायामाने योग दिनाची सांगता झाली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख, शाला समिती अध्यक्ष पल्लवी जाधव, शाला समिती व्हिजिटर उद्धव खरे, संस्थेच्या नियामक समितीच्या सदस्या मोनिका वैद्य यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले. योगदिनाच्या कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Maharashtra Times 22.6.2022

---

पुढारी

**मॉडर्न महाविद्यालय :** ग्रामीण बँकिंग साक्षरता अभियानाबाबत विद्यार्थी स्वयंसेवकांशी संवाद.
उपस्थिती : सुप्रिया सुळे, विद्याधर अनास्कर, गजानन एकबोटे.
**स्थळ :** मॉडर्न महाविद्यालयाचे गुरुवर्य शंकरराव कानिटकर सभागृह, शिवाजीनगर.
**वेळ :** दु. २.३०.

My Pune Edition
Jun 22, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

---

## संरक्षणशास्त्रात करिअरची संधी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देशासमोर सध्या सुरक्षेबाबत आव्हाने मोठी आहेत. पारंपरिक सुरक्षेबरोबरच दहशतवाद, नक्षलवाद, सायबर सुरक्षा, हवामान बदल अशा अपारंपरिक सुरक्षेचीही आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना संरक्षणशास्त्रात करिअरची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'संरक्षण व सामरिकशास्त्र' विषयात पदव्युत्तर स्तरावर अभ्यासक्रम शिकण्याची संधी आहे.

इतर पदविका अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. गणेशखिंड येथील मॉडर्न कॉलेज आणि वाडिया कॉलेज येथे पदवी स्तरावर हे विषय अभ्यासासाठी उपलब्ध आहेत.

**संरक्षणातील संधी**

- यूपीएससी व एमपीएससी परीक्षेसाठी पूरक अभ्यासक्रम
- विविध 'थिंक टँक'मध्ये संशोधक म्हणून संधी
- पीएचडी, नेट-सेटनंतर प्राध्यापक म्हणून संधी
- संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी
- पत्रकारिता : राष्ट्रीय सुरक्षेबाबत अभ्यासक आणि तज्ज्ञ

राष्ट्रीय सुरक्षेबाबत निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करताना देशाचा आतापर्यंतचा सामरिक इतिहास अभ्यासणे, सामरिक संस्कृती समजून घेणे, राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे काय, ते माहीत असणे गरजेचे आहे. देशासमोरील आव्हानांचा सामना करताना या बाबींमध्ये प्रावीण्य असेल, तर देशाचा सजग नागरिक होऊन महत्त्वाची भूमिका बजावता येते. त्यासाठी संरक्षणशास्त्र अत्यंत महत्त्वाचे आहे. आतापर्यंत देशभरात ७० विद्यापीठांत (केंद्रीय, राज्य आणि अभिमत) आणि ३०० संलग्न महाविद्यालयांत हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पदव्युत्तर स्तरावर, तर गणेशखिंड येथील मॉडर्न कॉलेज, वाडिया कॉलेज येथे पदवी स्तरावर संरक्षण व सामरिकशास्त्र विषय अभ्यासासाठी उपलब्ध आहे.

Maharashtra Times 24.6.2022

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

### 'मॉडर्न'मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

मॉडर्न विधी महाविद्यालयात नुकतेच रक्तदान शिबीर झाले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि जनकल्याण रक्तपेढी यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, समन्वयक डॉ. चिंतामणी घाटे, प्राचार्य डॉ. सुनीता आढाव, उपप्राचार्य डॉ. अनन्या बिबवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर झाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे केंद्र समन्वयक प्रा. अक्षय उगले या वेळी उपस्थित होते.

लोकसत्ता Thu, http

### 'मॉडर्न गर्ल्स' शाळेत ऑलिम्पिक दिन साजरा

**लाठी-काठी, दांडपट्टा, ढाल-तलवार खेळांचे प्रात्यक्षिक**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - शिवाजीनगर येथील पी.ई.एस.मॉडर्न गर्ल्स हायस्कूल येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या रुचिका भावे-कोल्हटकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका अनिता बसाळे, संस्था समन्वयक माया नाईक, पर्यवेक्षिका सुजाता तांबे यांनी प्रास्ताविक केले. सचिन शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजी व मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक विद्यार्थिनींनी सादर केले. सिद्धांती तिखे, दिव्या कराडे यांनी लाठी-काठी, दांडपट्टा, ढाल-तलवार खेळांचे प्रात्यक्षिक दाखवले.



**पुणे : शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या रुचिका भावे-कोल्हटकर यांचे स्वागत करताना मान्यवर.**

सूत्रसंचालन क्रीडा शिक्षिका जान्हवी ओळकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विनया परब यांनी करून दिला. क्रीडा शिक्षिका भाग्यश्री शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका प्रतिनिधी श्रीमती इंगळे यांनी आभार मानले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, शाळा समिती अध्यक्षा श्रीमती पल्लवी जाधव, व्हिजिटर उद्धव खरे, मोनिका वैद्य यांनी कौतुक केले. कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रभात Thu, 30 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68905392

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

## » मार्ग सर्जनशीलतेचे

प्रा. शामकांत देशमुख



# अॅनिमेशन : उत्तम व हटके पर्याय

अॅनिमेशन हा शब्द मुळात 'अॅनिमा' या लॅटिन शब्दापासून आला आहे. लॅटिन भाषेत अॅनिमा म्हणजे आत्मा-जीव. Inanimate म्हणजे निर्जीव.

एखाद्या निर्जीव गोष्टीत प्राण अथवा जीव ओतणे म्हणजे अॅनिमेशन. ही एक प्रभावी कला आहे. खरंतर ६४ कलामध्ये या नवीन कला प्रकाराचा समावेश करावा लागेल. या क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम निवडतांना चित्रकलेची आवड, रंगसंगतीचे ज्ञान, निरीक्षण क्षमता, कल्पनाशक्ती, भाषेवरील प्रभुत्व, संवाद कौशल्य तसेच तंत्रज्ञान व विविध सॉफ्टवेअर प्रणाली आत्मसाद करण्याची आवड हवी, तसेच नवनिर्मितीचा ध्यास व आस असणे आवश्यक आहे.

- अॅनिमेशन क्षेत्रामध्ये करिअर करतांना आपण एखाद्या प्रकल्पावर काम करीत असताना सांधिक काम करण्याची क्षमता, संघ भावना, खिलाडूवृत्ती, प्रसंगी अपयश पाचवण्याची ताकद हेही गुण अंगी असणे आपेक्षित असते. या अनिमेशन क्षेत्रात नोकरीच्या व स्वतः:चा व्यवसाय थाटण्याच्या नामी संधी आज उपलब्ध आहेत आणि भविष्यात देखील त्या वाढतच जाणार आहेत. ज्या गतीने मोबाईल फोनचा प्रसार, मोबाईल क्रांती झाली आहे, स्मार्ट मोबाईल फोनची दिवसेंदिवस वाढती मागणी या बाबी लक्षात घेता Gaming Application, Entertainment, Infotainment सारख्या प्रणाली, प्रकल्प विकसन करण्याच्या दृष्टीने अनेक संधी उपलब्ध आहेत.
- दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरील व्यंगचित्र, विडंब चित्र, हास्य चित्रपट (Cartoon) मालिका. उदा. छोटा भिम, पोकेमॉन, मिकी अॅण्ड माऊस, जय गणेश, मोगली इत्यादी अश्या प्रकारच्या मालिका विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज आहे. भविष्यात ती वाढतच जाणार आहे. पूर्वी अशा फिल्म तयार करतांना असंख्य चित्र हाताने काढावे लागत असत. ज्या गतीने दूरचित्रवाहिन्या निर्माण होत आहेत आणि कार्यरत आहेत, खरंतर या क्षेत्राला आवश्यक मनुष्यबळ निर्माण करणे हे देखील मोठे आव्हान आहे. विविध वाहिन्यांवरील कार्यक्रम, शीर्षक गीते, शीर्षके, दर्जेदार ग्राफिक्स, प्रभावी मांडणी, या सर्वांची योग्य जुळवाजुळव हे मोठे आकर्षण व कुतूहलाचा विषय होऊन बसले आहेत.
- जाहिरात, सिने-नाट्य, चित्रपटसृष्टीला, प्रिंट मिडियाला देखील कुशल अॅनिमेटर, ग्राफिक्स डिझायनर, व्हिडिओ व साऊंड एडिटर/इंजिनिअरची मोठी गरज आहे. सध्याच्या कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे E-content, E-learning, Teaching Learning and Evaluation तसेच E-commerce व M-Commerce क्षेत्रात प्रणाली व टेक्निकल कन्टेन्ट विकसित करणे, प्रभावीपणे मांडणी करणे, समर्पक ध्वनी व प्रकाश योजना व या सर्व बाबींचा योग्य परिणाम घडवून आणणे यासाठी कल्पकतेला आणि नावीन्यपूर्ण गोष्टींना मोठा वाव आहे.
- बारावी शास्त्र शाखेचे उत्तीर्ण विद्यार्थी हे बीएस्सी (अॅनिमेशन) या अभ्यासक्रमाची निवड करू शकतात, तर कला, वाणिज्य शाखेचे विद्यार्थी हे बी. व्होक (अॅनीमेशन) या अभ्यासक्रमाचा पर्याय आहे. काही विद्यार्थी दहावीनंतर लगेचच या क्षेत्राची निवड करू इच्छित असल्यास अॅनिमेशन संबंधीचे प्रमाणपत्र, पदविका अभ्यासक्रम देखील उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये प्रामुख्याने फ्लॅश (Flash), 2D, 3D-Animation, Maya, VFX(Visual Effects), Gaming, Basics of Design, Graphics Design, Video/ Audio Recording and Editing साठी लागणाऱ्या विविध प्रणाली शिकविल्या जातात जेणेकरून प्रवेशित विद्यार्थ्यांना नोकरी आणि स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत.
- अॅनिमेशन पर्याय निवडलेल्या अनेक विद्यार्थ्यांना चांगल्या नोकऱ्या देखील मिळाल्या आहेत, तर अनेकांनी लहान वयात स्वतः च्या कंपनी सुरू केल्या आहेत व विद्यार्थी अनेक प्रकल्पावर काम करीत आहेत. त्यामुळे अॅनिमेशन या क्षेत्राचा करिअर म्हणून उत्तम व हटके पर्यायाचा विचार केला पाहिजे. आपली आवड, कला व कुवत लक्षात घेऊन करिअरचा पर्याय निवडला, तसेच निवडलेल्या करिअरच्या पर्यायाला जिद्द, चिकाटी व कष्टाची जोड दिली तर यश निश्चितच आपल्या पदरी पडेल.



(लेखक मॉडर्न महाविद्यालयात उपप्राचार्य आहेत.)

Pune, Main
03/06/2022 Page No. 10

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# पदवीसाठी यंदा चुरस



बारावीचा निकाल लागला... झकास गुण मिळाले... मग आनंदाला पारावार राहणार कसा?



तुला किती मिळाले गं... मैत्रिणींच्या प्रश्नांना उत्तरं देणं आलंच!



अगं... माझे गुण बघ बरं...! (सर्व छायाचित्रे : यशवंत कांबळे)



कुणी घरी कळवतंय, तर कुणी अजून निकालच शोधतंय...!



निकाल लागल्यावर गप्पांचा फड रंगणारच ना राव...!

**पुणे :** शहरातील नामांकित विद्यालयांनी बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतरच तत्काळ पदवी प्रवेशाची प्रक्रिया सुरू केली आहे. गेल्या वर्षी १ लाख १८ हजार ६८० विद्यार्थी शर्यतीत होते, तर यंदा १ लाख १६ हजार ७६८ विद्यार्थी प्रवेशाच्या शर्यतीत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांची सीईटी यंदाही उशिरा आहे. त्यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चुरस वाढणार आहे.

## १,१६,७६८ विद्यार्थी शर्यतीत

पदवी प्रवेशाविषयी प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविद्यालयांमध्ये आता प्रवेशप्रक्रिया, समुपदेशनाची प्रक्रिया सुरू होईल. पुण्याबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. त्यामुळे गुणांच्या आधारे प्रवेशासाठी चुरस होणार आहे. पुणे परिसरातील महाविद्यालयांची माहिती घेऊन प्रवेशासाठी प्रयत्न केल्यास सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळेल. बारावीनंतर सर्वच विद्या शाखांमध्ये विविध नवे अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवीसाठी बरेच पर्याय उपलब्ध आहेत. परंतु, आजही वाणिज्य प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची स्पर्धा असते. त्याचबरोबर सनदी अधिकारी होण्यासाठी पाया पक्का व्हावा, यासाठी अनेक विद्यार्थी कला शाखेला प्रवेश घेतात. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाकडून (एनटीए) अभियांत्रिकी प्रवेशासाठीची संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई), वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीची राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षा (नीट) जुलैमध्ये होणार आहे. तर, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, वास्तुकला अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) द्यावी लागते. ही सीईटी ऑगस्टमध्ये घेतली जाणार आहे. या दोन्ही परीक्षा होऊन निकाल जाहीर झाल्यावर व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे यंदा पदवी प्रवेशासाठी चुरस राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## बारावीच्या गुणांवर प्रवेशप्रक्रिया

"पुण्यातील अनेक महाविद्यालयांनी बारावीच्या गुणांवर मेरीटच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून मेरीट फॉर्म भरून घेण्यास सुरुवात झाली असून पुढील १० दिवसांमध्ये त्यांची मेरीट लिस्ट लावण्यात येईल. बारावीच्या गुणांच्या आधारे ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया होणार असल्याने विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

## विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांच्या वेबसाईटवर ठेवावे लक्ष

शहरातील सर्व नामांकित महाविद्यालयांनी पदवी प्रवेशासाठी त्यांच्या वेबसाईट विकसित केलेल्या आहेत. या वेबसाईटवरूनच विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यात येतात. तसेच वेबसाईटवरच विद्यार्थ्यांची मेरीट लिस्ट लावली जाते. आणि विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित केले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी महाविद्यालयांच्या वेबसाईटवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. फर्ग्युसन महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय, स.प. महाविद्यालय, बीएमसीसी, एमएमसीसी महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईनच पार पडणार आहे.

## हम भी किसी से कम नहीं

बारावीच्या निकालात सामान्य मुलांची टक्केवारी ९३.२९ टक्के आहे. तर मुलींची टक्केवारी ९५.३५ टक्के आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांनी मात्र सामान्य मुलांपेक्षा वरचढ कामगिरी करत जवळपास मुलींएवढी ९५.२४ टक्केवारी मिळवली आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांनी 'हम भी किसी से कम नहीं' असा संदेश दिला आहे. या विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या निर्णयानुसार सर्व सोयीसुविधा दिल्या होत्या, अशी माहिती मंडळाने दिली. यंदा परीक्षेसाठी एकूण ६ हजार ३३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ हजार ३०१ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले. यातील ६ हजार १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, उत्तीर्णांचे प्रमाण ९५.२४ टक्के आहे. दरम्यान, या निकालातदेखील मुलींनी बाजी मारली असून, त्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९६.१५ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ९४.७५ टक्के आहे, अशी माहिती मंडळाने दिली आहे. सर्वाधिक १ हजार ५४७ विद्यार्थ्यांनी लोकोमोटर डिसॅबिलिटी प्रवर्गातून परीक्षेसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी १ हजार ४७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी ९५.५२ आहे. त्यानंतर ब्लाइंडनेस गटातून १ हजार १३६ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी १ हजार ६६ उत्तीर्ण झाले. हे प्रमाण ९४.७६ टक्के आहे. हिअरिंग इंपेरमेंट गटातून ८९९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी ८६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, हे प्रमाण ९६.६६ टक्के आहे. मंडळाने विद्यार्थ्यांची एकूण २२ दिव्यांग प्रकारच्या गटात परीक्षा घेतली. यातील ६ प्रकारातील निकाल १०० टक्के लागला आहे. तर १० प्रकारातील विद्यार्थ्यांचा निकाल ९५ टक्के लागला.

**राज्यात ९५.२४% दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण**

My Pune Edition
Jun 9, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

सकाळ

## बारावीचा निकाल : पुणे जिल्हा ९२.७०, तर नगर ९४.४१ टक्के

# पुणे विभागामध्ये सोलापूरची बाजी

**पुणे, ता. ८ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे विभागीय मंडळातून दोन लाख ४२ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली. त्यातील ९३.६१ टक्के म्हणजेच दोन लाख २७ हजार ०२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पुणे विभागीय मंडळात सोलापूर जिल्ह्यातील ९४.८३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, सोलापूरने बारावीच्या निकालात बाजी मारली आहे. पुणे जिल्ह्यातील ९२.७० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण निकालात विद्यार्थ्यांच्या तुलनेत विद्यार्थिनींच्या निकालाची टक्केवारी २.७७ टक्क्यांनी जास्त आहे.

या परीक्षेसाठी एकूण दोन लाख ४४ हजार ३०८ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षेस पाच हजार ४८८ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी पाच हजार ४७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून दोन हजार ६२३ विद्यार्थी (४७.९१ टक्के) उत्तीर्ण झाले आहेत. एकूण नियमित व पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांपैकी ९२.६१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विभागीय मंडळातून बारावीची परीक्षा दिलेल्या ९५.१५ टक्के विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. तर ९२.३८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, अशी माहिती विभागीय अध्यक्ष डॉ. वंदना वाहूळ यांनी दिली.

### जिल्हानिहाय निकाल (नियमित विद्यार्थी)

| जिल्हा | नोंदणी केलेले | परीक्षा दिलेले | उत्तीर्ण झालेले | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पुणे | १,२६,७९५ | १,२५,९५९ | १,१६,७६८ | ९२.७० टक्के |
| नगर | ६३,६६७ | ६३,००४ | ५९,४८६ | ९४.४१ टक्के |
| सोलापूर | ५३,८४६ | ५३,५३३ | ५०,७६८ | ९४.८३ टक्के |

### पुण्यातील नामांकित महाविद्यालये

| महाविद्यालये निकालाची टक्केवारी | विज्ञान | कला | वाणिज्य |
|---|---|---|---|
| फर्ग्युसन महाविद्यालय | ९७.६ | ९४.४ | --- |
| लक्ष्मणराव आपटे प्रशाला | ९९.६० | --- | ९७.४३ |
| बीएमसीसी | -- | -- | ९७.१४ |
| स. प. महाविद्यालय | ८६.९० | ९१.८८ | ९२.१६ |
| मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर | ८२.३६ | ७६.९४ | ९२.६७ |

### पुणे विभागातील शाखानिहाय निकाल

| शाखा | नोंदणी केलेले | परीक्षा दिलेले | उत्तीर्ण झालेले | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| विज्ञान | १,१७,१५४ | १,१६,८१३ | १,१४,७९९ | ९८.२७ टक्के |
| कला | ५६,३८७ | ५५,४४६ | ४८,२३२ | ८६.९८ टक्के |
| वाणिज्य | ६३,०९९ | ६२,७१७ | ५७,२९९ | ९१.३६ टक्के |
| व्यवसाय अभ्यासक्रम | ७,४३२ | ७,२८५ | ६,५५७ | ९० टक्के |

### जिल्ह्यातील तालुकानिहाय निकाल

| तालुका | परीक्षा दिलेले | उत्तीर्ण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंबेगाव | २,६४४ | २,५३२ | ९५.७६ टक्के |
| बारामती | ७,५२७ | ६,८५८ | ९१.११ टक्के |
| भोर | २,००२ | १,९३३ | ९६.५५ टक्के |
| दौंड | ४,३२६ | ४,२०६ | ९७.२२ टक्के |
| हवेली | १०,१७० | ९,५२१ | ९३.६१ टक्के |
| इंदापूर | ५,७९८ | ५,५७६ | ९६.१७ टक्के |
| जुन्नर | ५,२४८ | ४,८४४ | ९२.३० टक्के |
| खेड | ४,७९५ | ४,३७० | ९१.१३ टक्के |
| मावळ | ४,०५० | ३,६६८ | ९०.५६ टक्के |
| मुळशी | २,५५१ | २,४०८ | ९४.३९ टक्के |
| पुणे शहर (पश्चिम) | २७,५९१ | २४,७१६ | ८९.५७ टक्के |
| पुरंदर | २,५८४ | २,३८६ | ९२.३३ टक्के |
| शिरूर | ५,५२४ | ५,२३३ | ९४.७३ टक्के |
| वेल्हा | ४७१ | ४५५ | ९६.६० टक्के |
| पुणे शहर (पूर्व) | २२,९७४ | २१,३०६ | ९२.७३ टक्के |
| पिंपरी-चिंचवड | १७,७०४ | १६,७५६ | ९४.६४ टक्के |

Pune, Main
09/06/2022 Page No. 2

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

### प्रवेशाचा कट ऑफ : विद्यार्थ्यांमध्ये असणार पहिल्या यादीतील प्रवेशासाठी मोठी स्पर्धा

# पदवी अभ्यासक्रमासाठी रंगणार चुरस!

पुणे, ता. ९ : बारावीच्या निकाल गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा घटल्याने पुण्यातील नामांकित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेशाचा कट ऑफ देखील काहीसा खाली येण्याची चिन्हे आहेत. मात्र, तरीही पहिल्या यादीतील प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चांगलीच चुरस रंगणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी बारावीची परीक्षा झाली नाही. त्यामुळे अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल जाहीर केला. परिणामी संपूर्ण राज्यासह पुणे विभागीय मंडळाचा निकालातही वाढ झाली होती. परंतु यंदा बारावीच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार ऑफलाइन घेतल्या. त्यामुळे यंदा निकाल ५.४९ टक्क्यांनी कमी झाला. त्याचा परिणाम यंदा प्रवेश प्रक्रियेवरही उमटण्याची शक्यता आहे.

### कट-ऑफ कमी होण्याची शक्यता

गेल्यावर्षी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळासह केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), आयसीएसई आणि अन्य मंडळातील बारावी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली होती. त्यामुळे मागील वर्षी महाविद्यालयाचा कट-ऑफ काहीसा उंचावला होता. या तुलनेत यंदा कट-ऑफ दोन ते तीन टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.

### नव्वद पेक्षा अधिक टक्क्यांची गरज

यंदाही ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच नामांकित महाविद्यालयात पहिल्या यादीत प्रवेश मिळविण्याचा मार्ग मोकळा होऊ शकणार आहे. त्यामुळे ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चांगलीच स्पर्धा रंगणार आहे.

> विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा पाहायला मिळेल. परंतु यंदा महाविद्यालयाचा कट-ऑफ काहीसा कमी असेल. बी.एस्सीमध्ये कॉम्प्युटर सायन्स, गणित, रसायनशास्त्र याकडे विद्यार्थ्यांचा कल असेल. तर कला शाखेत मानसशास्त्राला वाढती मागणी आहे.
>
> - डॉ. सविता दातार,
> प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय

> बारावीच्या निकालाची एकूण टक्केवारी पाहता यंदा सगळ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. सध्या वाणिज्य शाखेत औद्योगिक क्षेत्राच्या मागणीनुसार अभ्यासक्रम आखल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांचा अधिक चांगल्याप्रकारे फायदा होऊ शकणार आहे. त्यामुळे विद्यार्थी-पालकांनी पदवी शिक्षणासाठी पारंपारिक विचार न करता करियरच्या वेगळ्या वाटाही निवडण्याच्यादृष्टीने विचार करावा.
>
> - डॉ. एन. उमराणी, प्राचार्य, गरवारे महाविद्यालय

> पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या यादीचा 'कट-ऑफ' हा २०२०च्या प्रमाणे असण्याची शक्यता आहे. परंतु गेल्या काही वर्षातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा कल पाहता विज्ञान शाखेपेक्षा वाणिज्य शाखेतील प्रवेशाचा कल वाढताना दिसत आहे. त्याशिवाय इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांचा पर्यायही विद्यार्थी निवडत आहेत.
>
> - राजेंद्र झुंजारराव, मॉडर्न महाविद्यालय

### प्रथम वर्षाच्या प्रवेशातील नवे ट्रेंड...

- विज्ञान शाखेत कॉम्प्युटर सायन्स, गणित, संख्याशास्त्र, रसायनशास्त्राला पसंती
- इंटिग्रेटेड कोर्सेसला विद्यार्थ्यांकडून प्राधान्य
- वाणिज्य शाखेला वाढती मागणी
- कला शाखेत मानसशास्त्रातून पदवी करण्याचा कल वाढतोय
- डिस्टन्स लर्निंगच्या माध्यमातून शिकणाऱ्यांच्या संख्येत वाढ

### गेल्यावर्षीचा 'कट ऑफ'

- गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स : बी.कॉम - ९० टक्के
- मॉडर्न महाविद्यालय : बी.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स)- ९२ टक्के, बी.कॉम-९५ टक्के, बी.ए-९०.८३ टक्के
- स. प. महाविद्यालय : बी.एस्सी- ९० टक्क्यांपेक्षा पुढे, बी.कॉम-९२.८३ टक्के

Pune, Main
10/06/2022 Page No. 2

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# अकरावीच्या प्रवेशांसाठी चुरस, पात्रता गुण वाढण्याची शक्यता

### पुणे विभागाचा निकाल ९६.९६ टक्के, विभागातील पाच विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण



> यंदा अकरावी प्रवेशांमध्ये विज्ञान, कला शाखा इंग्रजी माध्यम आणि वाणिज्य शाखेसाठी पात्रता गुण एक ते दोन टक्के वाढतील असा अंदाज आहे. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने, वसतिगृह उपलब्ध झाल्याने करोना काळात गावी गेलेले विद्यार्थी पुन्हा परतून येण्याची शक्यता आहे. त्याचाही पात्रता गुणांवर परिणाम होऊ शकतो.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

> अकरावी प्रवेशासाठी पात्रता गुण वाढण्याची शक्यता वाटते. गेली काही वर्षे सातत्याने पात्रता गुण वाढतच आहेत. त्यामुळे या वर्षीही पात्रता गुणांमध्ये साधारणपणे एक ते दोन टक्क्यांनी वाढ होईल असे वाटते.
>
> **- भारती रणपिसे,** उप प्राचार्या, स. प. महाविद्यालय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्याचा समावेश असलेल्या पुणे विभागाचा दहावीचा निकाल ९६.९६ टक्के लागला. पुणे विभागातील पाच विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवले असून, विभागात सोलापूर जिल्ह्याने सर्वाधिक ९७.७४ टक्क्यांसह विभागात आघाडी मिळवली. गेल्या वर्षीच्या निकालाच्या तुलनेत यंदाचा निकाल घटला असला, तरी अकरावीच्या प्रवेशासाठीचे पात्रता गुण (कट ऑफ) चढेच राहून पसंतीचे महाविद्यालय मिळण्यासाठी चुरस होणार असल्याचे चित्र आहे.

पुणे विभागीय मंडळाच्य अध्यक्ष वंदना वाहूळ आणि सचिव अनुराधा ओक यांनी पुणे विभागाच्या निकालाची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. पुणे विभागात २ लाख ६८ हजार ६८८ नियमित विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या २ लाख ६६ हजार ४०० विद्यार्थ्यांपैकी २ लाख ५८ हजार ३१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाची टक्केवारी ९६.९६ टक्के आहे. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ९ हजार ४२० पुनर्परीक्षार्थ्यांपैकी १ हजार ११० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर ७ हजार ३०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पुनर्परीक्षार्थींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.१८ टक्के आहे.

पुणे जिल्ह्यातून १ लाख ३३ हजार ९३० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षा दिलेल्या १ लाख ३२ हजार ८४७ विद्यार्थ्यांपैकी १ लाख २८ हजार ५६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पुणे जिल्ह्याचा निकाल ९६.७७ टक्के लागला. नगर जिल्ह्यातून नोंदणी केलेल्या ६९ हजार ५०५ विद्यार्थ्यांपैकी ६८ हजार ९०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ६६ हजार ५४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नगर जिल्ह्याचा निकाल ९६.५८ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्यातील ६५ हजार २५३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षा दिलेल्या ६४ हजार ६५२ विद्यार्थ्यांपैकी ६३ हजार १९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सोलापूर जिल्ह्याने ९७.७४ टक्क्यांसह पुणे विभागात अग्रस्थान प्राप्त केले. पुणे विभागातील पाच विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण, तर १३ हजार १३३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले.

शिक्षण विभागाकडून अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया या पूर्वीच सुरू केली आहे. त्यात प्रवेश अर्जाचा भाग एक भरण्याची मुभा विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. तर दहावीचा निकाल जाहीर झाल्यावर प्रवेश अर्जाचा भाग दोन आणि महाविद्यालयाचे पसंतीक्रम नोंदवण्याची सूचना दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा अकरावीची प्रवेश प्रक्रिया थोडी लवकर सुरू करण्यात आल्याने येत्या काही दिवसांत प्रवेशाची पहिली फेरी जाहीर होईल. यंदाचा निकाल गेल्या वर्षीच्या तुलनेत घटला आहे. मात्र गेल्या काही वर्षांतील हा विक्रमी निकाल असल्याने नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठी पात्रता गुण नव्वदीपार राहण्याची शक्यता आहे.

लोकसत्ता Sat, 18 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68679964

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

## अकरावी प्रवेश : नामांकित महाविद्यालयातील प्रवेशासाठी चुरस

# वाढता वाढे 'कट ऑफ'!

**पुणे, ता. १८ :** गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा दहावीच्या निकाल घटला असला तरीही, अकरावीच्या प्रवेशाचा 'कट-ऑफ' वाढण्याची शक्यता आहे. त्याशिवाय, पसंतीचे महाविद्यालय मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चुरस रंगण्याची शक्यता आहे. विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा कट-ऑफ दीड ते दोन टक्क्यांनी, तर कला (इंग्रजी माध्यम) शाखेचा कट-ऑफ एक ते दोन टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व्यक्त करत आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्यावर्षी अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे दहावीचा निकाल जाहीर झाला होता. त्यामुळे उत्तीर्णतेची टक्केवारी यंदापेक्षा अधिकच होती. परंतु २०२० च्या निकालाशी तुलना करता यंदाचा निकाल वाढला आहे. पुणे विभागीय मंडळात यंदा दहावीच्या निकालात तब्बल १३ हजार १३३ विद्यार्थ्यांना ९० टक्के आणि त्यापेक्षा जास्त गुण आहेत. तसेच, प्रथम श्रेणी आणि त्यापुढे गुण असणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची संख्या दोन लाख पाच हजार १५८, तर पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची संख्या दोन हजार ६४ आहे. पुणे जिल्ह्यात प्रथम श्रेणी आणि त्यापुढे गुण मिळविलेले नियमित आणि पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची संख्या ९८ हजार ९५३ आहे.

यंदा दहावीच्या उत्तीर्णतेची टक्केवारी आणि विद्यार्थ्यांना मिळालेले चांगले गुण पाहता सर्व विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश मिळेल, परंतु पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेशासाठी मोठ्या स्पर्धेला सामोरे जावे लागण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

### गतवर्षीचा नामांकित महाविद्यालयांतील पहिल्या नियमित फेरीतील कट-ऑफ (टक्केवारीत)

| महाविद्यालयाचे नाव | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| लक्ष्मणराव आपटे कनिष्ठ महाविद्यालय | शाखा नाही | ८३.८ टक्के | ९७ टक्के |
| फर्ग्युसन महाविद्यालय | ९७ टक्के (इंग्रजी) | शाखा नाही | ९६.४ टक्के |
| बीएमसीसी | शाखा नाही | ९५.२ टक्के | शाखा नाही |
| मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर | ८९.८ टक्के (इंग्रजी) | ८७.८ टक्के | ९२.८ टक्के |
| स. प. महाविद्यालय | ९३.४ टक्के (इंग्रजी) | ८९.६ टक्के | ९२.८ टक्के |
| गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | शाखा नाही | ९१.२ टक्के | शाखा नाही |
| सिंबायोसिस महाविद्यालय | ९३.४ टक्के | ९१ टक्के | शाखा नाही |
| आबासाहेब गरवारे महाविद्यालय | ६८ टक्के (मराठी माध्यम) | शाखा नाही | ९१.६ टक्के |

**अकरावी प्रवेशाचा 'कट-ऑफ' वाढण्याची कारणे...**

1. दहावीच्या निकालात उत्तीर्णतेच्या टक्केवारीत झालेली वाढ
2. नव्वदीपार गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांची जास्त असणारी संख्या
3. प्रथम श्रेणी आणि त्यापुढे गुण मिळालेले विद्यार्थी अधिक
4. बाहेरगावाहून पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा वाढत असलेला ओघ

**दहावीच्या एकूणच निकालात उत्तीर्णतेच्या टक्केवारीत वाढ झाल्याने अकरावी प्रवेशातील विशेषत: विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा कट-ऑफ वाढणार आहे. विज्ञान आणि वाणिज्य शाखेचा साधारणत: दीड ते दोन टक्क्यांनी कट ऑफ वाढण्याची शक्यता आहे, तर कला इंग्रजी माध्यमाचा कट-ऑफ हा नेहमीच वरचढ असतो, तो यंदाही दोन टक्क्यांपर्यंत वाढेल, असा अंदाज आहे.**
**- डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय (शिवाजीनगर)

**अकरावी प्रवेशाचा कट-ऑफ यंदा साधारणत: दोन ते तीन टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय गेल्या दोन वर्षांत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना राहून देण्यास परवानगी नव्हती. त्यामुळे बाहेरगावाहून पुण्यात शिक्षणासाठी येण्याचा ओघ कमी झाला होता. यंदा बाहेरगावाहून शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही नेहमीप्रमाणे असणार आहे. त्यामुळेही प्रवेशासाठी चुरस वाढेल.**
**- डॉ. सविता दातार,**
प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय

**दहावीच्या गेल्या वर्षीच्या (२०२१) आणि आताच्या (मार्च-एप्रिल २०२२) परीक्षांच्या निकालांची तुलना केल्यास अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे जाहीर झालेला २०२१ चा निकाल या वर्षापेक्षा जास्त आहे. परंतु या वर्षी विशेष गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहेत. यंदा पुणे विभागीय मंडळातही प्रथम श्रेणी आणि त्या पुढील गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दोन लाख पाच हजार १५८ इतकी आहे. त्यामुळे नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी विशेष चुरस असेल. नामांकित महाविद्यालयांचा अकरावी प्रवेशाचा 'कट-ऑफ' या वर्षी वाढण्याची शक्यता आहे. सर्व विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश नक्की मिळतील, पण मनासारखे महाविद्यालय मिळणे कठीण दिसत आहे.**
**- दिलीप रावडे,** पर्यवेक्षक, न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग

Pune, Pune-Today
19/06/2022 Page No. 1

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

टेक करिअर

प्रा. श्यामकांत देशमुख



# संगणक क्षेत्रात करिअरच्या संधी

सध्याच्या संगणक, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे. आपला पाल्य घरातील संगणक व मोबाईल सहजगत्या हाताळतो, त्यावरील विविध गेम्स, अप्लिकेशन्सचा वापर करतो म्हणजे तो भविष्यात निश्चितच संगणक क्षेत्रात चांगले करिअर करेल व त्या पाल्याचा या क्षेत्राकडे जाण्याचा कल आहे, असे आराखडे बांधले जातात. संगणक व संगणकावरील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ संगणक क्षेत्रात उत्तम करिअर करता येईल असा होत नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे. संगणक, माहितीतंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात संगणक वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे हे क्रमप्राप्त झाले आहे. दहावीनंतर संगणक क्षेत्रात कल असणाऱ्या पाल्यांपुढे कोणते पर्याय असू शकतात ते आपण थोडक्यात जाणून घेऊ.

दहावीनंतर डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग किंवा डिप्लोमा इन इन्फॉर्मिशन टेक्नॉलॉजी या दोन अभ्यासक्रमांचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर असतो. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो व त्याचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने 'डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन'मार्फत केले जातात. अनेक पालक विद्यार्थ्यांना दहावीला जास्त गुण मिळाल्यास तसेच इतरांच्या अनुभवावरून अकरावी-बारावी (सायन्स) जेईई/एमएच-सीईटी प्रवेश परीक्षा त्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांवर डिप्लोमा, इंजिनिअरिंगचा पर्याय निवडतात. डिप्लोमानंतर मात्र बीई अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळतो. त्यासाठी डिप्लोमा अभ्यासक्रमास ७० टक्क्यांहून अधिक गुण असल्यास चांगल्या महाविद्यालयाचा पर्याय मिळतो. तुलनेने द्वितीय वर्षाच्या जागा अभियांत्रिकी महाविद्यालयात कमी उपलब्ध असतात व त्या महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाचा निकालांवरून ठरतात. त्यामुळे काही वेळेस डिप्लोमाला चांगले गुण मिळूनही पसंतीचे/आवडीचे महाविद्यालय मिळणे अवघड जाते. अशा प्रसंगी काही विद्यार्थी बी.ई.च्या दुसऱ्या वर्षात प्रवेश न घेता प्रथम वर्षाच्या पर्यायाचा विचार करतात. त्यामध्ये त्यांचे एक वर्ष वाया जाते वा जास्तीचे लागते. डिप्लोमानंतर बी.एस्सी. कॉम्प्युटर, ''बीसीए''चा पर्याय देखील पदवीधर होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असतात.

दहावीनंतर परंपरागत अकरावी, बारावी करण्याचा पर्याय निवडल्यास विज्ञान शाखेअंतर्गत कॉम्प्युटर किंवा इन्फॉर्मिशन टेक्नॉलॉजी द्विलक्षी अभ्यासक्रमाचे पर्याय असतात. वाणिज्य शाखे अंतर्गत इन्फॉर्मिशन टेक्नॉलॉजी हा एक विषय निवडता येतो. बारावी विज्ञान शाखेतील संगणक, इलेक्ट्रॉनिक शास्त्र हे पर्याय विषय निवडल्यास बारावी नंतर डिप्लोमा, डिग्रीच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश घेता येतो. अकरावी व बारावी करत असताना वरील पर्याय निवडल्यास वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित सर्व पर्याय बंद होतात.

संगणक क्षेत्रात करिअर करताना अकरावी व बारावी विज्ञान शाखेतूनच करावे असे नाही. बारावी विज्ञान, वाणिज्य व कला यानंतरचे पर्याय आपण जाणून घेऊ.

बारावी विज्ञान शाखेअंतर्गत पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्राशी संबंधित बी.ई (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), बी.ई (इन्फॉर्मिशन टेक्नॉलॉजी), बीएस्सी (कॉम्प्युटर सायन्स), बी. एस्सी (ॲनिमेशन), बीसीए (सायन्स) या अभ्यासक्रमांचे पर्याय असतात. संगणकशास्त्र व गणित या दोन्ही विषयांचा अतिशय जवळचा संबंध असतो. पाल्यांचा कल लक्षात घेऊन वरीलपैकी अभ्यासक्रम निवडणे योग्य ठरते. बी.एस्सी. (ॲनिमेशन) या अभ्यासक्रमातून जाहिरात, मोबाईल गेम्स, मोबाईल ॲप्स, ई-लर्निंग, ग्राफिकल डिझाईन या क्षेत्रामध्ये चांगल्या संधी उपलब्ध आहेत. चित्रकलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना हा चांगला पर्याय उपलब्ध असू शकतो. वरील सर्व अभ्यासक्रम हे पुणे विभागाचा विचार करता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असतात. आपल्यात असलेले कौशल्यगुण, क्षेत्रातील ज्ञान या गोष्टी नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. बारावी वाणिज्य व कला या शाखेअंतर्गत पूर्ण केल्यानंतर बीबीए या अभ्यासक्रमाचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर खुला असतो.

संगणक क्षेत्राशी संबंधित बी. ई. (कॉम्प्युटर/आयटी) हे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एम.ई., एम.एस., एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), एम.सी.ए, एम.बी.ए (सिस्टिम) हे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे पर्याय उपलब्ध असतात. बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), बी.एस्सी. (ॲनिमेशन), बीसीए (सायन्स) हे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एमएस्सी (कॉम्प्युटर सायन्स), एमसीए (इंजिनिअरिंग, मार्केटिंग), एम.बी.ए. (सिस्टिम), एम.एस्सी. (ॲनिमेशन) हे पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध असतात. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संशोधनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. पूर्ण करून संशोधनाच्या संधीदेखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

विविध क्षेत्रांतील संगणकीकरण, भ्रमणध्वनीमुळे झालेली क्रांती, जागतिकीकरणामुळे झालेले बदल, कालानुरूप बदल, ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा, समाजातील आव्हाने, व सेवा क्षेत्रात तसेच यासंबंधीच्या गरजेप्रमाणे लागणाऱ्या संगणक प्रणाली विकसित करणे व त्याचे व्यवस्थापन क्षेत्रात तसेच यासंबंधीच्या गरजेप्रमाणे लागणाऱ्या संगणक प्रणाली विकसित करणे व त्याचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची नितांत गरज आहे व दिवसेंदिवस ती वाढतच जाणार आहे.

**(मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य आहेत)**

Sakaal 22.6.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

## सीए कोर्ससंदर्भातील योजनेबाबत उद्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

पुणे : इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या (डब्ल्यूआयआरसी ऑफ आयसीएआय) पुणे शाखेतर्फे सीए कोर्समधील अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणाशी निगडित प्रस्थापित योजनेबाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम शुक्रवारी (ता. २४) शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या सभागृहात दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत असणार आहे. हा कार्यक्रम म्हणजे कमिटी फॉर रिव्ह्यू ऑफ एज्युकेशन अँड ट्रेनिंगसाठी (क्रेट) पुढाकार म्हणून आयोजित केला आहे. कार्यक्रमाचे नेतृत्व आयसीएआय दिल्लीचे बोर्ड ऑफ स्टडीजचे (अॅकेडमिक्स) अध्यक्ष दयानिवास शर्मा, उपाध्यक्ष विशाल दोशी यांच्याबरोबर 'आयसीएआय'चे केंद्रीय मंडळाचे व बोर्ड ऑफ स्टडीजचे सदस्य चंद्रशेखर चितळे आदी मान्यवर करणार आहेत. हा कार्यक्रम विद्यार्थी, शिक्षक, उद्योग, 'आयसीएआय'चे सदस्य यांच्यासह सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.

Pune, Main
23/06/2022 Page No. 3

## सीए प्रशिक्षणाशी निगडित कार्यक्रम

पुणे : 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या (डब्ल्यूआयआरसी) पुणे शाखेतर्फे सीए कोर्समधील अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणाशी निगडित योजनेबाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

हा कार्यक्रम आज, शुक्रवारी (२४ जून) शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेजच्या सभागृहात दुपारी अडीच वाजता आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला व मोफत आहे. या कार्यक्रमात 'आयसीएआय'चे केंद्रीय मंडळाचे व 'बोर्ड ऑफ स्टडीज'चे सदस्य चंद्रशेखर चितळे, डॉ. एम. एस. जाधव, यशवंत कासार, 'आयसीएआय'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष काशिनाथ पठारे, विकासाच्या अध्यक्षा मोशमी शहा, ऋता चितळे, पुणे शाखेचे व्यवस्थापन समिती सदस्य आणि विविध महाविद्यालयांचे प्रतिनिधी करतील.

Maharashtra Times 24.6.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

## प्रवेश घ्या अन् थेट परीक्षेलाच या!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी तसेच पदवी अभ्यासक्रमासाठी काही महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊन थेट परीक्षेलाच बसण्याची संधी दिली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

दहावी, बारावीचा निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांची प्रवेशाची लगबग सुरू आहे. गुणवत्ता जोपासणाऱ्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. मात्र, काही महाविद्यालयांवर विद्यार्थी शोधण्याची वेळ आली आहे. त्यातील काही महाविद्यालये असे आमिष दाखवत आहेत.

**काही महाविद्यालयांत नियमबाह्य सवलत**

नोकरी, व्यवसाय अथवा खासगी संस्थेमध्ये कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे तसेच विविध प्रवेश परीक्षांचा अभ्यास करीत महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. अशा विद्यार्थ्यांना आकर्षित करून त्यांना प्रवेशित करण्याचे काम काही महाविद्यालयांकडून सुरू आहे.

प्रवेश घ्यायचा अन् थेट परीक्षेलाच महाविद्यालयात जायचे, असा प्रकार वाढत आहे. याला आळा घालण्यासाठी पिटपडताळणी तपासणी मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे.

### उपस्थितीची अनिवार्यता नावालाच...

परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. मात्र, महाविद्यालय पातळीवर कागदोपत्री सर्व काही मॅनेज करून विद्यार्थ्यांची योग्य उपस्थिती दाखविण्यात येते आणि विद्यार्थी परीक्षेला बसतात. त्यामुळे उपस्थितीची अनिवार्यता नावालाच असल्याचे चित्र आहे.

> स्वायत्त महाविद्यालयांमध्ये वर्षभरात दोन मुख्य परीक्षा तसेच अंतर्गत मूल्यमापनाच्या तीन परीक्षा, यासह साधारण आठ परीक्षा होतात. तर, पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये देखील तीन ते चार परीक्षा होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता महाविद्यालयांमध्ये उपस्थित राहण्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

My Pune Edition
Jun 27, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

**वेगळ्या वाटा**

**प्रा. मानसी ठाकूर**

## फॅशन डिझाईन शिक्षणासाठी नवीन मार्ग



भारतीय फॅशन इंडस्ट्रीला शाश्वत उद्योग उभारण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. फॅशन उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीसाठी असलेली विविध कौशल्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. भारत सरकारने स्किल इंडिया उपक्रमाद्वारे तरुणांना उपजीविकेच्या विकासासाठी प्रशिक्षित करण्यासाठी अनेक नवीन योजना आखल्या आहेत. भारत सरकारने नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) आणि यूसीजी (युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन) च्या मदतीने विविध ट्रेडमधील व्यावसायिक प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे. लोकप्रिय कोर्सपैकी एक म्हणजे बॅचलर ऑफ व्होकेशनल (बी.व्होक) इन फॅशन टेक्नॉलॉजी अँड अ‍ॅपेरल डिझायनिंग. यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून स्थानिक विद्यापीठांशी संलग्न हा कोर्स विविध संस्था चालवत आहेत.

**B.Voc (बॅचलर ऑफ व्होकेशनल प्रोग्रॅम)चे ठळक मुद्दे :**

- कौशल्यावर आधारित पदवी शिक्षण मिळवून मनुष्यबळ विकसित करण्याचा केंद्रसरकारचा हा एक अतिशय यशस्वी उपक्रम आहे.
- अभ्यासक्रमाची रचना नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार NSQF level लक्षात घेऊन तयार केली आहे.
- कोर्समध्ये सिंगल एंट्री अँड मल्टिपल एक्झिटचा पर्याय आहे. एखादी व्यक्ती एक वर्षानंतर डिप्लोमासह बाहेर पडू शकते. दोन वर्षानंतर अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा आणि तीन वर्षे पूर्ण करून पदवी प्राप्त करू शकते.
- हा कोर्स कौशल्यावर आधारित असल्यामुळे अभ्यासक्रमामध्ये ६० टक्के प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) आणि ४० टक्के थेअरी असे प्रमाण असते.
- इंडस्ट्री एक्स्पर्ट, व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे अधिकारी यांची व्याख्याने, तसेच, गारमेंट इंडस्ट्री भेटींसह इंटर्नशिपला देखील प्रोत्साहन दिले जाते.
- पदवी अभ्यासक्रमानंतर कौशल्यावर आधारित स्वत:चा व्यवसाय/उद्योग सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवते.
- कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी B Voc कोर्स साठी पात्र असतो.
- बी.व्होक पदवीनंतर विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण M Voc करू शकतात.
- बी.व्होक पदवी घेतल्यानंतर विद्यार्थी एम.बी.ए, विविध स्पर्धा परीक्षांसाठी देखील पात्र ठरतात.

भारत सरकार योग्य रोजगार निर्माण करण्यासाठी कौशल्यावर आधारित अशा उपक्रमांना प्रोत्साहन देऊन, लोकांना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी मदत करत आहे. फॅशन उद्योग हे असेच एक क्षेत्र आहे ज्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्या आहेत. आपल्याकडे (व्यावसायिक अभ्यासक्रम) व्होकेशनल कोर्सेसमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना कौशल्यपूर्ण आणि ज्ञानपूर्ण बनवलं जातं. याचा फायदा म्हणजे हे विद्यार्थी होतात. पारंपारिक शैक्षणिक अभ्यासक्रमासारखे केवळ सैद्धांतिक शिक्षण यात नसतो , तर कामाचं प्रत्यक्ष प्रशिक्षण (प्रॅक्टिकल नॉलेज) व्होकेशनल कोर्सेसमध्ये दिलं जातं. बरेचसे विद्यार्थी पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष काम करण्यात अधिक सक्षम असतात.

पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज आहे. या प्रकारचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिक्षण पद्धतीचा लाभ प्रथम वर्षापासूनच मिळण्यास सुरुवात होते. अभ्यासक्रमात ६० टक्के भर हा प्रात्यक्षिकांवर असल्यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढते व आत्मनिर्भरतेकडे पहिले पाऊल टाकण्यास मदत होते. स्वत:च्या हिमतीवर काम करण्यास ते प्रवृत्त होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

बॅचलर ऑफ व्होकेशन (B.Voc) फॅशन टेक्नॉलॉजी अँड अ‍ॅपेरल डिझायनिंग अभ्यासक्रमामध्ये विविध पॅटर्न्स, स्टीचिंग, एम्ब्रॉयडरी, फॅशन इलस्ट्रेशन, कॉम्पुटर एडेड डिझायनिंग, कम्युनिकेशन, स्टायलिंग, मार्केटिंग, क्वालिटी चेकिंग, पॅकिंग, अ‍ॅडव्हर्टायझिंग अशा विविध विषयांचा अंतर्भाव आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी त्यांच्या इंटर्नशिपचा एकभाग म्हणून विविध संस्थांसोबत काम करतात. हा या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. हे सर्व विषय शिकल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन व्यवसाय निर्माण व त्याची वाढ करण्यास चांगलीच मदत होते. प्रॅक्टिकल शिक्षणावर आधारित विषय असल्याने विद्यार्थी शिक्षणाचा आनंद घेतात. अशा विद्यार्थ्यांना फॅशनशी संबंधित विविध संस्थांमध्ये नोकऱ्या मिळवण्याची किंवा गारमेंट उद्योगात स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याची संधी उपलब्ध होते. बी. व्होक. (B. Voc) फॅशन टेक्नॉलॉजी आणि अ‍ॅपेरल डिझायनिंग कोर्सने विद्यार्थ्यांना उपजीविका विकास कौशल्य देण्याचा नवीन मार्ग खुला केला आहे.

**(लेखिका मॉडर्न महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत)**

सकाळ Pune, Main
06/2022 Page No. 9

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

लोकमत

# हजारो विद्यार्थ्यांची नावे डबल; शिक्षकही ठरणार अतिरिक्त !

## पडताळणीत एक लाख नऊ हजार विद्यार्थी ठरले मिसमॅच

स्पेशल रिपोर्ट

ज्ञानेश्वर भंडारे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची सरल प्रणाली अंतर्गत स्टुडंट पोर्टलमध्ये आधार क्रमांकानुसार नोंदणी झाल्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत शहरात १ लाख ९ हजार ९ विद्यार्थांचे मिसमॅच आढळले आहेत. या विद्यार्थ्यांच्या नावात, जन्मतारखेत बदल झाला आहे. दरम्यान, आतापर्यंत ११६६ दुबार नावे डिलीट करण्यात आली असून,काही अजूनही बाकी आहेत. दुसरीकडे विद्यार्थ्यांची असलेली संख्याच पटसंख्या म्हणून गृहित धरली जाणार आहे.

शहरात इयत्ता पहिली ते बारावीच्या २ लाख ५ हजार १२१ विद्यार्थ्यांनी आधारकार्ड अपलोड केले आहे. तर काही विद्यार्थ्यांनी अजूनही आधार सरल पोर्टलवर अपलोड केलेले नाही. दरम्यान, आधार नोंदणी झाल्यानंतर त्यांची पडताळणी केली होती. त्यात शहरात १ लाख ९ हजार ९ विद्यार्थ्यांच्या आधार कार्डमध्ये त्रुटी आढळल्या. पडताळणी करून ती दुबार नोंद स्टुडंट पोर्टलमधून रद्द करावी. अशा सूचना केल्या आहेत.






### २० हजार विद्यार्थ्यांच्या नावात बदल

१ शहरात इयत्ता पहिली ते बारावीच्या २ लाख विद्यार्थ्यांनी आतापर्यंत सरल पोर्टलवर आधारकार्डची नोंदणी केली आहे. त्यापैकी २० हजार ६९२ विद्यार्थ्यांच्या नावात बदल आहे. अशा विद्यार्थ्यांना आधारकार्ड अपलोड करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

### १७ हजार विद्यार्थ्यांचे लिंग बदल नावे वगळली

२ आधार कार्ड व शाळेत नोंद असलेल्या १७ हजार ८९८ विद्यार्थ्यांच्या लिंग बदलात तफावत आढळली आहे. एकाच विद्यार्थ्याचे दोन शाळांमध्ये नाव तर काही आधारकार्ड अपडेट नसल्यामुळे शिक्षण आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानुसार दुबार नावे डिलीट करण्याच्या सूचना केल्या होत्या. आतापर्यंत नावे डिलीट केली आहे. उर्वरित नावे डिलीट करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांना तपासणीच्या सूचना

दरम्यान, मागील महिन्यात प्रत्येक तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांना त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती शाळास्तरावरून तपासणी करून सरल प्रणालीमध्ये अद्ययावत करण्यासाठी तसेच आपल्या तालुक्यातील माहिती शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी केल्या होत्या.

### अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन

विद्यार्थी बोगस आढळल्यास शिक्षक अतिरिक्त होतील. परिणामी त्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येईल. शासनाच्या आदेशानुसारच शिक्षण विभाग काम करेल. असे शिक्षण विभागांतील अधिकाऱ्यांनी सांगितले.



# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी बारावीच्या गुणांनाही समान महत्त्व

### प्रवेशासाठी 'सीईटी'सह ५० टक्के गुण यंदापासून ग्राह्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राज्यातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश देताना बारावी आणि सीईटीच्या प्रत्येकी ५० टक्के गुणांचा विचार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सीईटीची संख्या कमी करून, प्रवेश प्रक्रिया १ जुलैपासून सुरू करण्याचे नियोजन करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली.

ते म्हणाले, सीईटी सेलकडून राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी सीईटी परीक्षा घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संपूर्ण लक्ष सीईटीवर केंद्रित झाले असून, बारावीच्या वर्गांमध्ये विद्यार्थीच नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार झालेल्या बैठकीत व्यावसायिक *(पान ४ वर)*



#### निर्णय का?

विद्यार्थ्यांचे संपूर्ण लक्ष सीईटीवर केंद्रित झाले असून, बारावीच्या वर्गांमध्ये विद्यार्थीच दिसत नाहीत. बारावीच्या गुणांवरून व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आत्तापर्यंत प्रवेश मिळत नव्हता. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावी आणि सीईटी यांचे समसमान गुण प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

#### शैक्षणिक वेळापत्रक सांभाळण्यासाठी...

शैक्षणिक वर्ष वेळेत आणि सुरळीत सुरू करण्याच्या दृष्टीने सीईटीचा निकाल १ जुलैपर्यंत जाहीर करून, प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न राहणार आहे. जेईई आणि नीट परीक्षांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या सीईटी परीक्षा ऑगस्टमध्ये होणार आहेत. या परीक्षांचा निकाल हा परीक्षा झाल्याच्या दिवसापासून दहा दिवसांत जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 01 June 2022 https://epaper.loksatta.com/c/68368550

# व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी बारावीच्या गुणांनाही समान महत्त्व

*(पान १ वरून)* पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावी आणि सीईटीच्या गुणांना प्रत्येकी ५० टक्के महत्त्व देण्याच्या निर्णयापर्यंत आलो आहोत. साधारण २०१२ मध्ये या पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचप्रमाणे सीईटींची संख्या कमी करण्यात येईल. जेईई मेनची परीक्षा दोन टप्प्यात होते. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांना गुण मिळवण्याची संधी मिळण्यासाठी पुन्हा एकदा सीईटीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**चंद्रकांत पाटील यांना टोला**

यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेच्या अंतिम निकालात महाराष्ट्रातून ६० पेक्षा अधिक उमेदवार उत्तीर्ण झाले असून ही संख्या कौतुकास्पद आहे. यातील २७ विद्यार्थ्यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचा सत्कार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत करण्यात येईल. यंदाच्या उत्तीर्णांमध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीय असल्याने त्यांचे विशेष अभिनंदन करायला हवे. या कामगिरीमुळे महिलांवर टिपणी करणाऱ्या काही लोकांच्या डोळ्यात अंजन गेले आहे, असा टोला सामंत यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना लगावला.

#### परीक्षांचा निर्णय विद्यापीठे आणि कुलगुरूंचा



राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीत सत्र परीक्षा प्रत्यक्ष घेण्याचा निर्णय झाला. हा निर्णय सर्व कुलगुरूंनी घेतला होता. मात्र, काही ठिकाणी प्रचलित पद्धतीनुसार, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परीक्षा पद्धतीत एकसमानता येण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. माने यांनी बैठक घेऊन निर्णय घ्यायचा आहे. या निर्णयाबाबत हस्तक्षेप करायचा झाल्यास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री म्हणून करेन. राज्यातील विद्यापीठांनी देखील विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर करण्यासाठी, परीक्षांबाबत घेतलेला निर्णय राबवावा. परीक्षांच्या निर्णय कुलगुरूंनी घेतला असून, सरकार म्हणून दबाव आणला नाही किंवा कामकाजात कोणताही हस्तक्षेप केलेला नाही, असे सामंत यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 01 June 2022 https://epaper.loksatta.com/c/68368582

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# अकरावी प्रवेशासाठीची नोंदणी प्रक्रिया सुरू

## कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी ६ जूनपर्यंत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेत कनिष्ठ महाविद्यालयांना नोंदणीसाठी ६ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली असून, कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य आणि महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया राबवणारी व्यक्ती यांच्यासाठी बुधवारी (१ जून) फडके हौद येथील गुजराथी हायस्कूल येथे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

केंद्रीय अकरावी समितीच्या सदस्य सचिव मीना शेंडकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. आतापर्यंत दहावीचा निकाल जाहीर झाल्यावर अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येत होती. मात्र, निकाल जाहीर झाल्यावर प्रवेश प्रक्रिया लांबू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन अर्ज, महाविद्यालय नोंदणी ही तांत्रिक प्रक्रिया दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच सुरू करण्यात आली आहे. त्या दृष्टीने शिक्षण विभागाने वेळापत्रक जाहीर करून विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची माहिती होण्यासाठी सरावाची संधीही उपलब्ध करून दिली होती.

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी https://11 thadmission. org. in या संकेतस्थळावर जाऊन आपला विभाग, दहावीच्या परीक्षेचा बैठक क्रमांक, वैयक्तिक आणि शैक्षणिक माहिती, आरक्षण हा तपशील भरायचा आहे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करून शुल्क भरायचे आहे. त्यानंतर अर्ज अंतिम करून पडताळणी करून घ्यायची आहे. कनिष्ठ महाविद्यालयांना ६ जूनपर्यंत नोंदणी करता येईल. कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ७ ते १७ जून या कालावधीत गुजराथी हायस्कूल येथे माहिती प्रमाणित करण्यासाठीचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 01 June 2022 https://epaper.loksatta.com/c/

---

**सामना**

# बारावी-सीईटीचे प्रत्येकी ५० टक्के गुण ग्राह्य धरण्याचे विचाराधीन

## पुढील वर्षी प्रवेशप्रक्रिया १ जुलैपासून सुरू करणार

पुणे, दि. ३१ (प्रतिनिधी) - 'पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राज्यातील पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देताना बारावी आणि सीईटीच्या प्रत्येकी ५० टक्के गुणांचा विचार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 'सीईटीं'ची संख्याही कमी करून प्रवेशप्रक्रिया १ जुलैपासून सुरू करण्याचे नियोजन करण्यात येईल,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने उपस्थित होते. सामंत म्हणाले, 'विद्यार्थ्यांचे संपूर्ण लक्ष हे सीईटींवर केंद्रित झाले असून, बारावीच्या वर्गांमध्ये विद्यार्थीच बसत नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक बैठक घेतली. या बैठकीत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावी आणि सीईटीच्या गुणांना प्रत्येकी ५० टक्के वेटेज देण्याच्या निर्णयापर्यंत आम्ही पोहोचलो आहोत. 'जेईई मेन'ची परीक्षा दोन टप्प्यांत होते. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांना गुण स्कोअर करण्याची संधी मिळण्यासाठी पुन्हा एकदा सीईटीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'जेईई' आणि 'नीट' परीक्षांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या सीईटी परीक्षा ऑगस्टमध्ये होत असल्या, तरी त्यांचा निकाल परीक्षा झाल्याच्या दिवसापासून १० दिवसांत जाहीर करण्यात येईल,' अशी माहिती सामंत यांनी दिली.

'राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीत सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय झाला. हा निर्णय सर्व कुलगुरूंनी घेतला होता. मात्र, काही ठिकाणी प्रचलित पद्धतीनुसार, तर काही ठिकाणी ऑफलाइन 'एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा होत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परीक्षापद्धतीत एकसमानता येण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. माने यांनी बैठक घेऊन निर्णय घ्यायचा आहे. राज्यातील विद्यापीठांनीदेखील विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर करण्यासाठी परीक्षांबाबत घेतलेला निर्णय राबवावा. परीक्षांचा निर्णय कुलगुरूंनी घेतला असल्याचे सामंत यांनी सांगितले.

### डेक्कन कॉलेजला १० कोटींचा निधी

डेक्कन कॉलेजला मोठा इतिहास आहे. येथील संग्रहालयाचे काम पूर्ण झाले आहे. संग्रहालयासाठी १० कोटींचा निधी देणार असून, डेक्कन कॉलेज शनिवार-रविवार पर्यटकांसाठी खुले करणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

### एसएनडीटी विद्यापीठाला १५ कोटी

'एसएनडीटी विद्यापीठाला १५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. कर्वे यांच्या पर्णकुटीची डागडुजी करून त्याचा विकास करण्यात येईल. एसएनडीटीतील विद्यार्थांसोबत नागरिकांना महर्षी धोंडो केशव कर्वे आणि बाया कर्वे या महान व्यक्तींची माहिती मिळण्यासाठी अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे,' असेही सामंत यांनी सांगितले.

### महिलांवर टिप्पणी करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन

'यूपीएससी' परीक्षेत यंदाच्या उत्तीर्णांमध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीय असून, त्यांचे विशेष अभिनंदन करायला हवे. महिलादेखील सर्वच क्षेत्रांत अग्रेसर राहू शकतात, हे गेल्या दोन-तीन दिवसांमध्येच दिसले. या कामगिरीमुळे महिलांवर टिप्पणी करणाऱ्या काही लोकांच्या डोळ्यांत अंजन घातले गेले आहे,' असा अप्रत्यक्ष टोला सामंत यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना लगावला आहे.

Pune Edition
Jun 1, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# बारावीच्या गुणांचाही विचार

## व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी बारावी, सीईटीच्या समान गुणांना महत्त्व मिळणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राज्यातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश देताना बारावी आणि सीईटीच्या प्रत्येकी ५० टक्के गुणांचा विचार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सीईटींची संख्या कमी करून, प्रवेशप्रक्रिया एक जुलैपासून सुरू करण्याचे नियोजन आहे,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली.

सामंत पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने उपस्थित होते. 'सीईटी सेलकडून राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी सीईटी परीक्षा घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संपूर्ण लक्ष सीईटीवर केंद्रित झाले असून, बारावीच्या वर्गामध्ये विद्यार्थीच नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठक घेतली. या बैठकीत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावी आणि सीईटीच्या गुणांना प्रत्येकी ५० टक्के महत्त्व देण्याच्या निर्णयापर्यंत आम्ही पोहोचलो आहोत,' असे सामंत यांनी स्पष्ट केले. २०१२मध्ये अशा पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली होती. जेईई मेनची परीक्षा दोन टप्प्यांत होते. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांना गुण स्कोअर करण्याची संधी मिळण्यासाठी पुन्हा सीईटीची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी सीईटींचा निकाल एक जुलैपर्यंत जाहीर करण्याचा प्रयत्न राहणार आहे, असेही सामंत म्हणाले.

### 'परीक्षांचा निर्णय कुलगुरूंचा'

'राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीत सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय झाला. मात्र, काही ठिकाणी प्रचलित पद्धतीनुसार आणि काही ठिकाणी ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होत आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परीक्षा पद्धतीत एकसमानता येण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. माने यांनी बैठक घेऊन निर्णय घ्यायचा आहे. या निर्णयाबाबत हस्तक्षेप करायचा झाल्यास मंत्री म्हणून मी करीन. राज्यातील विद्यापीठांनीही विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर करण्यासाठी, परीक्षांबाबत घेतलेला निर्णय राबवावा. परीक्षांचा निर्णय कुलगुरूंनी घेतला असून, सरकारने दबाव टाकला नाही किंवा हस्तक्षेप केलेला नाही,' असेही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

"जेईई आणि नीट परीक्षांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या सीईटी ऑगस्टमध्ये होणार आहेत. परीक्षांचा निकाल त्या झाल्याच्या दिवसापासून दहा दिवसांत जाहीर करण्यात येईल.



\- उदय सामंत,
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

### चंद्रकांत पाटील यांना टोला

'केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या अंतिम निकालात राज्यातून ६०पेक्षा अधिक अधिक उमेदवार उत्तीर्ण झाले असून, ही संख्या उल्लेखनीय आहे. पैकी २७ विद्यार्थ्यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतले आहे. यांचा सत्कार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत लवकरच करण्यात येईल. यंदाच्या उत्तीर्णांमध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीय असून, त्यांचे विशेष अभिनंदन करायला हवे. महिलादेखील सर्व क्षेत्रांत अग्रेसर राहू शकतात, हे गेल्या दोन ते तीन दिवसांमध्ये दिसले. या कामगिरीमुळे महिलांवर टिप्पणी करणाऱ्या काही मंडळींच्या डोळ्यात अंजन गेले आहे,' असा टोलाही सामंत यांनी नाव न घेता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना लगावला.

Maharashtra Times 1.6.2022

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education



# State to consider Std XII & CET scores for admissions

## New Criteria To Get Pupils To Colleges For Lectures

**Hemali Chhapia, Swati Shinde Gole & Ardhra Nair** | TNN

**THREE-YEAR HIGH IN REGISTRATIONS**

More than six lakh candidates registered for the MHT-CET for admissions to engineering, pharmacy and agriculture courses

- Educators said there were more registrations this year because of a big demand for technical skills and a growth in the pharmaceutical and technology industries

**REGISTRATIONS**

| 2022 | 2021 | 2020 |
|---|---|---|
| 6,04,870 | 5,17,132 | 5,30,000 |

| | REGISTERED | CONFIRMED |
|---|---|---|
| MHT CET | 6,89,496 | 6,06,142 |
| BHMCT-CET | 1,269 | 967 |
| B Planning CET | 54 | 32 |
| Fine Arts CET | 6,025 | 3,994 |

**WHAT TO EXPECT?**

- **The questions will be based on the syllabus of the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education**
- While setting the question paper, approximately 20% will be allotted to Std XI curriculum and 80% for Std XII curriculum
- There will be no negative marking, however, the difficulty level will be as per the JEE (Main) for mathematics, physics, chemistry while, the difficulty level for biology will be as per the NEET examinations
- **The CET cell stated that the questions will be mainly application-based**
- The mock test link for the online (CBT-Computer Based Test) examination of MHT-CET 2022 will be available on https://mhtcet2022.mahacet.org

**DATES OF ENTRANCE TESTS**

**AUGUST 5 TO 20, 2022**

- FOR ENGINEERING | **AUGUST 5 TO AUGUST 11**
- FOR PHARMACY AND AGRICULTURE | **AUGUST 12 TO AUGUST 20**
- Dates were postponed when they clashed with the Joint Entrance Examination Main exams and the National Eligibility cum Entrance Test, NEET 2022 for UG admissions into medical colleges

**Mumbai/Pune:** Students entering Std XII in 2022 and aspiring to join a professional course will have to pay as much importance to high school performance as to their entrance exam results. That apart, changes such as a minimum cut-off in CET are in the offing.

From the coming academic year, entry to undergraduate professional programmes in Maharashtra will be conducted based on both Std XII scores and CET marks; they will be given equal weightage of 50%. While the decision has been approved in principle, the state is yet to declare details of how it would bring parity between Std XII scores of students across various boards.

What is also unclear is whether the overall score of all subjects in Std XII would be considered or just marks in sciences and maths, as all school boards do not have the same number of subjects at Std XII level.

"Students are (currently) not attending Std XII lectures as they are busy preparing only for CET. Today, students are merely getting one mark in CET and joining engineering programmes. We are overhauling the entire admission process for the next year and a detailed policy on the same will be ready soon," higher and technical education minister Uday Samant told TOI. He held a meeting with officials and other ministers including finance minister Ajit Pawar before drawing up this policy.

The CET results will be declared on July 1 and the academic year will kickstart on September 1. There could be a possibility of the CET being held multiple times a year like the JEE (main), allowing candidates to better their scores without wasting a year.

**Reconsider, say educators**

The announcement seems to overlook the landmark Supreme Court judgement of 2016 which had struck down the 60-40 weightage rule for Std XII board exams and JEE Main on the grounds that normalisation of Std XII marks of students across different boards is impossible, some said.

Durgesh Mangeshkar, director of IITian's Prashikshan Kendra, said there have been several attempts by the state in the past to introduce weightage for Std XII board marks but they have failed in the light of the apex court's judgment.

"The state government must therefore reconsider this decision as it will create needless confusion in the interim period. All state boards, CBSE and CISCE board students' marks cannot be normalised and the matter may land up in court and shall meet the same fate like the 60-40 rule. Till such time that the country has only one board and one board exam, no weightage can technically be given to Std XII board marks for admission to professional courses. Admission must happen only on the basis of common entrance exams," he added.

**A level playing field**

Arun Jain, Pune centre head of Allen, another coaching class, said the decision will be good for students who concentrate equally on board exams as this would generate a level playing field for students from rural areas as they are deprived of coaching. "Students would equally focus on school apart from coaching," he added.

**Unfair and unequal**

Students felt these decision should come well in advance. "The government should review it for the next academic year, Omkar Lad, a Std XII student, said.

Parent Siva N said the whole point of an entrance exam is to give students a common platform to compete.

"The moment we introduce Std XII marks, it becomes unequal. Some boards may give more marks, some schools may give more internal marks, there can be favouritism, and other things. Hence, Std XII marks should not be considered," he added.

Madhuri Khambete, principal of Cummins College of Engineering for Women, said, "Students who do well in CET tend to do well in board exams too. If implemented next year, students will get enough time to prepare for both exams."

The Times of India 1.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# बारावी, 'सीईटी'चे प्रत्येकी ५० टक्के गुण धरणार ग्राह्य



**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१** - बारावीनंतर केवळ 'सीईटी'च्या गुणांवर प्रवेश प्रक्रिया होत आहे. मात्र पुढील शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच २०२३-२४ पासून पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देताना बारावी आणि 'सीईटी'च्या प्रत्येकी ५० टक्के गुण ग्राह्य धरण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत मंगळवारी दिली.

सामंत म्हणाले की, 'सीईटी' सेलकडून राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी 'सीईटी' घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संपूर्ण लक्ष हे 'सीईटी'वर केंद्रीत झाले असून, बारावीच्या वर्गामध्ये विद्यार्थीच बसत नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक बैठक घेतली. यात व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी बारावी आणि सीईटीच्या गुणांना प्रत्येकी ५० टक्के गुण देण्याच्या निर्णयापर्यंत आम्ही पोहचलो आहे. साधारण २०१२ मध्ये या पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचप्रमाणे 'सीईटी'ची संख्या कमी करण्यात येईल. जेईई मेनची परीक्षा दोन टप्प्यात होते. त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांना गुण स्कोअर करण्याची संधी मिळण्यासाठी पुन्हा 'सीईटी'ची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष वेळेत आणि सुरळीत सुरू करण्याच्या दृष्टीने 'सीईटी'चा निकाल १ जुलैपर्यंत जाहीर करून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न राहणार आहे. 'जेईई' आणि 'नीट'च्या पार्श्वभूमीवर यंदाच्या सीईटी ऑगस्टमध्ये होत असल्या, तरी त्यांचा निकाल परीक्षा झाल्याच्या दिवसापासून दहा दिवसांत जाहीर करण्यात येईल, अशी माहिती सामंत यांनी दिली.

**पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश**

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीत सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय झाला. हा निर्णय सर्व कुलगुरूंनी घेतला होता. मात्र, काही ठिकाणी प्रचलित पद्धतीनुसार, तर काही ठिकाणी ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परीक्षा पद्धतीत एकसमानता येण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. माने यानी बैठक घेऊन निर्णय घ्यायचा आहे. या निर्णयाबाबत हस्तक्षेप करायचा झाल्यास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री म्हणून करीन. राज्यातील विद्यापीठांनीदेखील विद्यार्थ्यांमधील संभ्रम दूर करण्यासाठी, परीक्षांबाबत घेतलेला निर्णय राबवावा. परीक्षांच्या निर्णय कुलगुरूंनी घेतला असून, सरकार म्हणून आम्ही कोणताही दबाव आणला नाही किंवा कामकाजात कोणताही हस्तक्षेप केलेला नसल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

प्रभात Wed, 01 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68380395

---

सकाळ

## शिक्षणमंत्री : बारावी व सीईटीच्या टक्क्यांवरून ठरेल मेरिट

# 'व्यावसायिक'साठी ५०-५० फॉर्म्युला

**पुणे, ता. ३१ :** "राज्यात विविध व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी फक्त 'सीईटी' परीक्षेतली मेरिट ग्राह्य धरले जात असल्याने विद्यार्थ्यांची बारावीतील टक्केवारी घसरत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून बारावीच्या गुणांची सरासरीचे ५० टक्के आणि सीईटीचे ५० टक्के यावरून मेरिट लावण्यात येईल. त्यामुळे बारावीचा पाया भक्कम होऊ शकेल," असे सूतोवाच उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.

पुण्यातील काही शैक्षणिक संस्थांना भेटी आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी सामंत हे पुणे दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकाराशी संवाद साधला. ते म्हणाले, "उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार एक बैठक घेतली होती. त्यात पुढील वर्षापासून ५० टक्के बारावीचे गुण आणि ५० टक्के सीईटीतील स्कोअर ग्राह्य धरून मेरिट लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय, राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या 'सीईटी' परीक्षांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करत आहोत. पुढील वर्षी जेईईप्रमाणे सीईटी परीक्षा एकदा झाल्यानंतर आठ दिवसांनी विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी देता येईल का?, याबाबत विचार सुरू आहे. तसेच पुढील वर्षी प्रवेश प्रक्रिया एक जुलैपासून सुरू करण्यात येईल."

सामंत म्हणाले, "राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसमवेत झालेल्या बैठकीत सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय झाला. हा निर्णय सर्व कुलगुरूंनी घेतला होता. मात्र, काही ठिकाणी प्रचलित पद्धतीनुसार, तर काही ठिकाणी ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होत आहे. परीक्षा पद्धतीत एकसमानता येण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने बैठक घेऊन उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणीसाठी पावले उचलतील."

### काय म्हणाले उदय सामंत...

- डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्थेतील (अभिमत विद्यापीठ) संग्रहालयाच्या कामासाठी ८ ते १० कोटी देणार
- राज्याचे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्याशी चर्चा करून डेक्कन कॉलेज पर्यटनासाठी खुले करण्याचा विचार
- डेक्कन कॉलेजमधील वेतन थकीत न होण्याची ग्वाही
- एसएनडीटी महिला विद्यापीठाला पुढील तीन वर्षांत १५ कोटी देणार

> केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालात ६८५ पैकी ६० विद्यार्थी म्हणजेच जवळपास १० टक्के विद्यार्थी हे महाराष्ट्रातील आहेत. या परीक्षेत राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या वाढावी यासाठी राज्य सरकार विशेष प्रयत्न करत आहे. दिल्लीतील जुने महाराष्ट्र सदन ताब्यात घेऊन तिथे यूपीएससीचा अभ्यास करण्यासाठी जाणाऱ्या राज्यातील गरजू विद्यार्थ्यांची राहण्याची आणि अभ्यासिकेची सोय करण्याचा प्रस्ताव दिल्लीतील आयुक्तांना दिला आहे. त्यावर महिन्याभरात निर्णय होईल.
> - **उदय सामंत**, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

### महाविद्यालये 'स्वायत्तते'वर अतिक्रमण नको

राज्य सरकारने स्वायत्त महाविद्यालयांना पूर्णतः स्वायत्त दिले आहे. या महाविद्यालयांना काही विद्यापीठांमध्ये प्रचंड सहकार्य केले जाते. मात्र, काही विद्यापीठांकडून सहकार्य मिळत नाही. याबाबत सर्वात जास्त तक्रारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाबाबत आहे. महाविद्यालयांना राज्य सरकारने स्वायत्तता दिली आहे, त्यात विद्यापीठांनी अतिक्रमण करू नये. याबाबत येत्या १५ दिवसांत सर्व कुलगुरू आणि सर्व संस्थाचालकांची बैठक घेण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

Pune, Main
01/06/2022 Page No. 3

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### प्रभारी प्र-कुलगुरुपदी डॉ. संजीव सोनवणे



पुणे, ता. ३१ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. संजीव सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सोनावणे हे बुधवारी (ता. १) पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाळ १८ मे रोजी संपला. त्याचवेळी विद्यापीठाचे तत्कालीन प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांचाही कार्यकाळ संपला. आपला कार्यकाळ संपल्यानंतर डॉ. उमराणी यांनी दुसऱ्याच दिवशी गरवारे महाविद्यालयात प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विद्यापीठतील प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी डॉ. कारभारी काळे यांच्याकडे सोपविली. दरम्यान, गेल्या १३ दिवसांपासून विद्यापीठातील प्र-कुलगुरू पद रिक्त होते. आता ही जबाबदारी डॉ. सोनावणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. विद्यापीठाकडून प्र-कुलगुरू पदासाठी तीन नावे राज्यपालांकडे पाठविण्यात आली. त्यातील डॉ. सोनवणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत राज्यपालांनी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू पदाची जबाबदारी सोपविली आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

Sakaal 1.6.2022

### प्रा. डॉ. सोनवणे यांची प्र-कुलगुरूपदी नियुक्ती



**पुणे, दि. ३१ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागातील प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा. सोनवणे हे बुधवारी (दि. १) प्र-कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांचा कार्यकाल संपुष्टात आला होता. त्यानंतर राज्यपालांनी प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. कारभारी काळे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविला, परंतु प्र-कुलगुरूपद रिक्त होते. त्या ठिकाणी आता डॉ. संजीव सोनवणे हे प्र-कुलगुरू म्हणून सूत्रे हाती घेणार आहेत. विद्यापीठातील अधिष्ठाता पदाची नियुक्ती सोमवारी झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशीच प्र-कुलगुरूपदी डॉ. सोनवणे यांची निवड करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

प्रभात Wed, 01 June 2022 https://epaper.epr

लोकमत

### विद्यापीठ प्र-कुलगुरुपदी डॉ. संजीव सोनवणे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजीव सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सोनवणे हे येत्या बुधवारी (दि. १) प्र-कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.



विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या सेवानिवृत्तीनंतर प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांचा कार्यकाल संपुष्टात आला होता. त्यानंतर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला. परंतु, प्र-कुलगुरू पद रिक्त होते. तसेच पूर्वी आंतरविद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदाची जबाबदारी डॉ. संजीव सोनवणे यांच्याकडे होती. त्यांच्याऐवजी शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दीपक माने यांच्याकडे आंतरविद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला. तर सोनवणे यांच्याकडे प्र-कुलगुरू पदाची सूत्रे देण्यात आली.डॉ. सोनवणे हे विद्यापीठातील ज्येष्ठ प्राध्यापक आहेत.

Hello Pune
Page No. 1 Jun 01, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

# 48 foreign univs interested in UGC's twinning initiative

## Some Keen To Set Up Satellite Campuses Here

Manash.Gohain
@timesgroup.com

Getty Images




While University of Glasgow expressed its interest to discuss the potential for academic collaboration, Deakin University, Australia, said NEP 2020 would help the university establish new relations with Indian institutions

**New Delhi:** Giving a boost to the government's effort towards internationalisation of Indian higher education, 48 foreign universities responded to University Grants Commission's (UGC) new regulations and guidelines for twinning, joint degree, and dual degree programmes between Indian and foreign universities.

While University of Glasgow, Scotland, expressed its interest to discuss the potential for academic collaboration, Deakin University, Australia, in its communication to India's higher education regulator stated that the National Education Policy (NEP) 2020 is a progressive policy which would help the university establish new relations with Indian institutions. In fact, there are many higher education institutions which expressed interest in setting up satellite campuses in India in response to UGC reaching out to them.

In April 2020, UGC notified its regulations for Indian universities to collaborate with their foreign counterparts to offer joint, twinning or dual degrees. As per the regulations, students will be able to earn a dual degree conferred by Indian and foreign higher educational institutions, separately and simultaneously.

The University of Queensland, Australia, is meeting UGC officials in August for potential collaboration, while according to UGC sources, a university from France has committed to set up a satellite centre in India soon. The University of Tokyo in its response to UGC stated the proposal is attractive and should not be just restricted to it but should be taken up as a common interest among all the universities and institutions in Japan. University of Cambridge too wrote to UGC stating that it has been following the developments of the "NEP with great interest," and apart from existing partnerships is looking for new ones.

M Jagadesh Kumar, chairperson, UGC, is going to meet ambassadors, starting with from Australia from next week to further the discussions. "Recently there has been a lot of discussion between the PMs of India and Australia. Education is one of the important topics," said Kumar.

Bangor University, Wales, stated that it's a good time for further collaborations. SOAS University of London said it is looking forward towards collaborations as per the new regulations. While officials from University of Manchester visiting India this week proposed a meeting with the UGC head "to discuss UGC Policy and support for twinning arrangements".

Similar responses were received from Universität Jena, Germany, and Durban University of Technology, South Africa, among others.

The Times of India 1.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education



City | Pune Times Mirror | Thursday, June 2, 2022 | 3

# Teachers get basics wrong, need to do their homework!

**As many as 1,800 of 93K staffers fail to fill in own names, email IDs, phone numbers while registering for SCERT training module**

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

What could be more ironic than teachers failing to do something as simple as writing out their names, email ids and phone numbers — and, mind you, these are the hands shaping our future generations. This was highlighted when a registration was underway for the State Council of Education and Training's (SCERT) module wherein 93,117 teachers registered and as many as 1,800 fumbled while writing down their basic credentials.

The schedule for the said training has been postponed because extra time has to be provided to rectify the laughable errors.

One of the teachers, Sharad Patil, said they are burdened with administrative work due to which they did not get time to fill up the online form properly. "Most of the teachers filled in wrong digits and email IDs by mistake. We were only given eight days to correct the mistakes. However, it is true that teachers should be careful and prompt while filling up an online form," he added.

Another teacher, Yashwant Holkar, complained of poor internet connectivity in the rural areas and cited that as a major reason for such mistakes. "This SCERT website can't be accessed on mobile phones. Thus, we have to go to the school and fill in the online form on desktops. We accept our mistakes, but it is also true that most teachers are not technologically adept and definitely require training," he added.

Mahendra Ganpule, the state spokesperson of the Maharashtra Principal Federation, said the training is mandatory for teachers who have completed 12 years in the profession. "During the training period, the National Education Policy (NEP) 2020 teaching methods will be imparted through audio-visual methods, besides dispensing information on the multiple-choice questionnaires. The teachers will receive certificates after completion of the training", he said.

Vikas Garad, deputy director, SCERT, said that most teachers had made unpardonable spelling errors in their names and email IDs, besides giving wrong mobile numbers. "This not just reflects their carelessness, but is also scary since it is very basic. We had provided time for correcting these major errors last month. We have reviewed the fresh corrected data and will start the training session soon."

AL Deshmukh, a veteran education expert, highlighted the characteristics of a good teacher — seriousness, promptness and being responsible. He said, "It is unfortunate and shameful to hear that these teachers made mistakes in writing their names, email IDs and mobile numbers. This mistake shows a lack of discipline among them. They must work on changing their attitude."

> **We had provided time for correcting these major errors last month. We have reviewed the fresh data and will start the training session soon**
> –Vikas Garad, SCERT

The schedule for the said training has been postponed because extra time has to be provided to rectify the errors

Pune Mirror 2.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

सकाळ

### ग्रंथपाल भरतीसाठी लाक्षणिक उपोषण

**पुणे, ता. २ :** वरिष्ठ महाविद्यालयांतील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदांची भरतीप्रक्रिया तातडीने सुरू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.

अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांतील या भरतीसाठी शासन निर्णय काढावा म्हणून, पुणे येथील उच्च शिक्षण संचालनालय कार्यालयासमोर हे उपोषण करण्यात आले. यावेळी महासंघाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भदाने, सचिव डी. एस. हिलाले, डॉ. कुलदीप पवार, मधुकर तोगम, संजय सूर्यवंशी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
03/06/2022 Page No. 1

सकाळ

### सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष एक जुलैपासून

**पुणे, ता. २ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नवीन शैक्षणिक वर्ष (२०२२-२३) येत्या १ जुलैपासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ प्रशासनाने संकुलातील विभागांच्या या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक परिपत्रकाद्वारे जाहीर केले.

या वेळापत्रकानुसार आता प्रथम वर्ष वगळता सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष येत्या १ जुलैपासून सुरू होणार असून १५ मे २०२३ रोजी ते संपणार आहे. प्रथम सत्रांच्या वर्गांना १ जुलै रोजी प्रारंभ होणार आहे. १० डिसेंबरला प्रथम सत्र संपणार आहे. तर, दुसऱ्या सत्राला २ जानेवारी २०२३ पासून प्रारंभ होणार असून १५ मे रोजी दुसरे सत्र संपणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्य विद्याशाखा, आंतरविद्याशाखा, वाणिज्य आणि व्यवस्थापन अशा चार विद्याशाखांमधील अभ्यासक्रमांसाठी हे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक लागू राहणार आहे.

प्रथम वर्षाचे प्रवेश होण्याला थोडा अवधी असल्याने, प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक वर्षासाठी वेळापत्रक जाहीर होणार असल्याची माहिती परिपत्रकाद्वारे विद्यापीठाने दिली. तसेच, हे वेळापत्रक केवळ विद्यापीठांच्या शैक्षणिक विभागांसाठी लागू राहणार आहे. विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांच्या सत्र परीक्षा अजूनही सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे या महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष सप्टेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे.

Pune, Main
03/06/2022 Page No. 2

### ग्रंथपाल महासंघाचे पदभरतीसाठी उपोषण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात साधारण ३०० ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक पदे रिक्त असल्याने महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा खालावत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ही भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी तातडीने निर्णय प्रसिद्ध करण्याच्या मागणीसाठी राज्य ग्रंथपाल महासंघाच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालय कार्यालयासमोर एकदिवसीय लक्षवेधी उपोषण करण्यात आले.

'नॅक' मूल्यांकन आणि इतर दृष्टीने महाविद्यालयात ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक ही पदे असणे आवश्यक आहे. महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा सरकारचा उद्देश पूर्ण करण्यामध्ये ग्रंथपालाची भूमिका महत्त्वाची असते. मात्र, ही महत्त्वाची पदे रिक्त असल्याचे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे तातडीने निर्णय घेऊन पदभरती करण्याची मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

**आश्वासन हवेतच**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी २७ जून २०२१ला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. या बैठकीत आठ दिवसांत पदभरतीचा निर्णय काढण्यात येईल असे, आश्वासन दिले होते. मात्र, वर्ष होऊनही कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे राज्य ग्रंथपाल महासंघाच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालय कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

Maharashtra Times 3.6.2022

सकाळ

### अकरावी प्रवेशासाठी २४ हजारांची नोंदणी

**पुणे, ता. २ :** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतर्गत ऑनलाइन नोंदणी व प्रवेश अर्जाचा एक भाग भरण्याची प्रक्रिया सोमवारपासून (ता. ३० मे) सुरू झाली होती. या प्रक्रियेतर्गत गुरुवारी (ता. २ जून) सायंकाळपर्यंत २४ हजार ५७१ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी ही केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. यात गुरुवारी सायंकाळपर्यंत ऑनलाइन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचा आकडा जवळपास २५ हजारांपर्यंत पोहोचला होता. यामधील सुमारे १० हजार ३३५ विद्यार्थ्यांनी अर्जाचा एक भाग भरून पडताळणीसाठी पाठवला आहे. तर, त्यातील ७ हजार ४४३ विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी झाली आहे.

Pune, Main
03/06/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### शैक्षणिक वर्ष एक जुलैपासून

#### विद्यापीठाकडून वेळापत्रक जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक विभागांचे २०२२-२३ हे शैक्षणिक वर्ष १ जुलैपासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम वर्ष वगळता सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष १ जुलै ते १५ मे २०२३ असे राहणार असून, संलग्न महाविद्यालयांसाठीचे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रकही लवकरच जाहीर करण्यात येईल.

विद्यापीठ प्रशासनाने संकुलातील शैक्षणिक विभागांच्या शैक्षणिक वर्षासंदर्भातील माहिती परिपत्रकाद्वारे जाहीर केली. त्यानुसार १ जुलै ते १० डिसेंबर असे प्रथम सत्र असेल, तर २ जानेवारी ते १५ मे २०२३ असे द्वितीय सत्र असेल. विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्य विद्याशाखा, आंतरविद्याशाखा, वाणिज्य आणि व्यवस्थापन अशा चार विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांसाठी हे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक लागू असेल. प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याचे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या उन्हाळी सत्र परीक्षा अद्याप झालेल्या नाहीत. त्यामुळे संलग्न महाविद्यालयांसाठीच्या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक स्वतंत्रपणे येत्या काही दिवसांत जाहीर होईल.

विद्यापीठातील शैक्षणिक विभागांच्या शैक्षणिक वर्षाचे नियोजन करोनापूर्व काळाप्रमाणेच करण्याचा प्रयत्न होता. त्याच धर्तीवर आता संलग्न महाविद्यालयांसाठीच्या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे. पुढील काही दिवसांत ते जाहीर केले जाईल, असे प्रभारी प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी सांगितले.

लोकसत्ता Fri, http

### विद्यापीठ परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने ऑफलाइन घ्यावी

**प्रभात वृत्तसेवा**

**विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण संचालकांच्यासमोर मांडली भूमिका**

**पुणे, दि. २** - राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा पद्धतीत एकसमानता राहण्यासाठी 'एमसीक्यू' पद्धतीने ऑफलाइन परीक्षा घ्यावीत आणि विद्यार्थ्यांना प्रश्न संचाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्यासमोर मांडली. परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मागण्यांची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिले जाणार आहे. त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या परीक्षा पद्धतीवर राज्याचे उच्च व शिक्षणमंत्री उदय सामंत हे काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने विद्यापीठांच्या एकसमान परीक्षा पद्धतीसाठी याचिकाकर्त्यांची भूमिका विचारात घेण्याबाबतचे आदेश दिले होते. त्यानुसार डॉ. माने यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यात बालुशा बासल, कल्पेश यादव, विश्वंभर भोपळे, अनुभा सहाय उपस्थित होते.

निकाल लवकर जाहीर करून, नवे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी राज्यातील काही विद्यापीठांनी ऑफलाइन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. मात्र, त्याच वेळी काही विद्यापीठे प्रचलित पद्धतीनुसार लेखी परीक्षा (ऑफलाइन) घेत आहेत. अशा परिस्थितीत एमसीक्यू पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल चांगला लागू शकतो, तर प्रचलित लेखी पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना गुण कमी मिळणार आहे. त्यामुळे कमी गुण मिळवणारे विद्यार्थी शैक्षणिक स्पर्धेतून बाद होणार आहे. त्यामुळे परीक्षा पद्धतीत एकसमानता हवी, अशी भूमिका प्रतिनिधींनी मांडली.

प्रभात Fri, 03 June 2022 https://epaper.eprabhat.net/

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

### SAVITRIBAI UNIV VICE-CHANCELLOR APPOINTS TWO DEANS

HT Correspondent

puneletters@htlive.com

**PUNE:** The new vice-chancellor (V-C) of Savitribai Phule Pune University (SPPU), professor Karbhari Vishwanath Kale, appointed two deans for the various streams in the varsity.

As the tenure of the earlier deans ended last week, two new deans have been appointed while two others have been retained, as per Savitribai Phule Pune University officials.

Prof Vijay Khare, director of Savitribai Phule Pune University's international centre, has been appointed dean, faculty of humanities and Prof Deepak Mane, has been appointed dean, faculty of interdisciplinary studies. While Prof Manohar Chaskar has been retained as dean of the faculty of science and technology and Prof Parag Kalkar is dean of the faculty of commerce and management.

Professor Kale took over as the new vice-chancellor of Savitribai Phule Pune University on May 18 this year after former V-C, Professor Nitin Karmalkar, retired from the post.

Professor Kale had said, "After taking charge as vice-chancellor of SPPU, the first thing I did was held a meeting with the examination department officials and understood the current position of conducting exams. Soon, they are going to submit to me a report containing the schedule of the forthcoming semester exams. Our priority is to conduct exams in a transparent manner and without any errors this time," he said.

Hindustan Times 3.6.2022

### Education quality focus of draft on new NAAC norms

#### Suggestions On Proposal Sought Till June 15

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** A white paper draft proposing revised assessment and accreditation norms for higher education institutes and universities uploaded on National Assessment and Accreditation Council (NAAC) website on Wednesday focuses on evaluation of the institutes based on the learning they provide rather than the infrastructure and other norms

Chairman of NAAC's executive committee Bhushan Patwardhan and former Indian Institute of Science Education and Research, Pune professor KP Mohanan are the principal authors of the paper. It has many co-authors and has been reviewed by experts in three layers. Suggestions to the draft can be sent till June 15.

The current assessment is mostly a structural summative assessment system based on a fixed time-point, data entry, and peer team visit. "Most questions are yes-and-no questions that do not reflect the quality of teaching or research in the university. We want to change it to a pragmatic, formative, functional, real-time technology-enabled, outcome-based approach," Patwardhan added.

He said they hope to put these changes into practice step-by-step by 2030. "Educational outcomes do not mean high marks in a particular subject or employment. We want the student, no matter which course he or she graduates from, to be aware, to have critical thinking, to have a scientific temperament, to be rational, to have ethical intelligence, and also be a global citizen with sustainable living imbibed," he added.

The draft proposes assessment and accreditation of an HEI in two categories__accredited or not accredited, without grading. If the institute wants it, individual programmes can be graded.

So if an engineering institute applies, it will either be accredited or not accredited based on the parameters. But if it wants its computer and mechanical departments to be graded, NAAC can assess, accredit and grade them based on parameters.

The draft also proposes a national test for students from institutions approaching accreditation. "This would set a national standard for higher-order cognition, and pre-empt "inflated" evidence of achieving higher-order abilities," it said.

Colleges can change their examination pattern to have 10% marks for critical thinking which can be increased to a higher percentage later. Patwardhan said these are preliminary ideas to assess outcomes of education and actual implementation will require more thought.

National entry-level tests for independent learning, critical reading, critical thinking, and reasoning for students and faculties are among the proposed ideas.

#### WHAT'S LIKELY TO CHANGE

■ Current Framework ■ Proposed Framework

**FUNCTION**
- ■ Monitoring of quality compliance
- ■ Quality enhancement
- ■ Quality maintenance
- ■ Assessment and accreditation

**CLASSIFICATION OF HEI**
- ■ General universities
- ■ Autonomous colleges
- ■ Affiliated / constituent colleges
- ■ Open universities
- ■ Dual mode universities
- ■ Health science institutions
- ■ Super-specialty health science institutions
- ■ Law universities
- ■ Law UG colleges
- ■ Law PG colleges
- ■ Sanskrit universities
- ■ Sanskrit dual mode universities
- ■ Sanskrit colleges
- ■ Yoga institutions
- ■ Vocational education universities
- ■ Non-autonomous HEIs
- ■ Autonomous HEIs

**ACCREDITATION TYPE**
- ■ Graded accreditation of HEIs
- ■ Binary accreditation of HEIs and graded accreditation of academic programs/ constituent units

**ASSESSMENT NATURE**
- ■ Gap Analysis
- ■ **Progressive:** Continued improvement

**ASSESSMENT & ACCREDITATION**
- ■ Systems and practices that will facilitate achieving learning outcomes
- ■ Learning Outcomes

**CRITERIA**
- ■ Curricular Aspects
- ■ Teaching-Learning and Evaluation
- ■ Research, Innovations, and Extension
- ■ Infrastructure and Learning Resources
- ■ Student Support and Progression
- ■ Governance, Leadership, and Management;
- ■ Institutional Value and Best Practices.
- ■ Function & Outcome-based
- ■ General educatedness
- ■ Skills/abilities for specialized education
- ■ Contribution to research/ innovation

**DATA**
- ■ HEI supplied
- ■ Real-time technology-enabled data collection



The Times of India 3.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### शिक्षकांच्या कार्याचे होणार मूल्यमापन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षकांचे कार्यमूल्यमापन करण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने समितीची स्थापना केली आहे. शिक्षकांच्या कार्य मूल्यमापनासंदर्भातील अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने धोरणाचा अभ्यास करून शिफारसी सादर करण्यासासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली होती. या समितीच्या शिफारसींना अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत शिक्षकांच्या शैक्षणिक कालावधीतील कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.

प्रभात Sat, 04 June 2022 https://epaper.epra

### रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात सुमारे ३०० ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदे रिक्त असल्याने महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा खालावत आहे. ही भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी शासन निर्णय प्रसिद्ध करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाने उच्च शिक्षण संचालनालय कार्यालयासमोर लक्षवेधी उपोषण केले.

नॅक मुल्यांकनासाठी महाविद्यालयात ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक ही पदे असणे आवश्यक आहे. महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा शासनाचा उद्देश पूर्ण करण्यात ग्रंथपाल महत्त्वाची भूमिका बजावत असतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये मैदानी खेळाची आवड निर्माण करून दर्जेदार खेळाडू निर्माण करण्याची जबाबदारी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक पार पाडत असतात. मात्र, महाविद्यालयातील एवढे महत्त्वाचे ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक ही पदे रिक्त असल्याचे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तातडीने निर्णय घेउन पदांची भरती करावी, अशी मागणी महासंघाने केली आहे.

प्रभात Sat, 04 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68

### उच्च शिक्षण रुळावर येणार का?

**नियोजन सुरू : पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष यंदा १ जुलै ते १५ मे २०२३**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे २०२२-२३ हे शैक्षणिक वर्ष एक जुलैपासून सुरू होणार आहे. त्यानुसार प्रथम वर्ष वगळता सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष एक जुलैपासून सुरू होतील. तर १५ मे २०२३ ला शैक्षणिक वर्ष संपणार आहे. हे वेळापत्रक केवळ विद्यापीठांच्या शैक्षणिक विभागांसाठी लागू राहणार आहे.



पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने संकुलातील विभागांचे शैक्षणिक वर्षाबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या वेळापत्रकानुसार विद्यापीठाने विस्कटलेले शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक रुळावर आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यानुसार प्रथम सत्रांचे शैक्षणिक वर्ग एक जुलैला सुरू होणार असून, १० डिसेंबरला प्रथम सत्र संपणार आहे. दुसऱ्या सत्राला दि. २ जानेवारी २०२३ रोजी सुरुवात होईल, तर १५ मे २०२३ रोजी दुसरे सत्र संपणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्य विद्याशाखा, आंतरविद्याशाखा, वाणिज्य आणि व्यवस्थापन अशा चार विद्याशाखांमधील अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक लागू राहणार आहे. प्रथम वर्षाचे प्रवेश होण्याला थोडा अवधी असल्याने, प्रथम वर्ष अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर शैक्षणिक वर्षासाठी वेळापत्रक जाहीर होणार आहे, अशी माहिती परिपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

**महाविद्यालये सुरू होण्यास विलंब**

विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांच्या सत्र परीक्षा अजूनही सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे या महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक जाहीर होण्यास काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

प्रभात Sat, 04 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68437481

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# महाविद्यालयांकडील अनामत रक्कम तपासा

## उच्च शिक्षण सहसंचालकांकडून अहवाल सादर करण्याचे आदेश

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४ -** राज्यातील सर्व उच्च शिक्षण महाविद्यालयातील शिल्लक अनामत रकमांची तपासणी करून त्याचा अहवाल तत्काळ सादर करा, असे आदेश उच्च शिक्षण संचालनालयातील सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना बजाविले आहे.

महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून काही रक्कम तारण अनामत रक्कम घेतली जाते. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयातून बाहेर पडतो, त्यावेळी ही रक्कम त्या विद्यार्थ्यांना तत्काळ परत देणे अपेक्षित आहे. काही वेळा विद्यार्थ्यांना ही रक्कम परत दिली जात नसल्यामुळे ती महाविद्यालयाकडे पडून राहते. त्या रक्कमेचा विनियोग गरजू इबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करणे आवश्यक आहे. ईबीसी विद्यार्थी पैसे अभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आर्थिक सहकार्य करणे अपेक्षित आहे.

शिल्लक असलेल्या एकूण अनामत रकमेच्या ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याबाबतचे परिपत्रक तत्काळ काढून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची मागणी कॉप्स विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्याकडे केली आहे. उच्च शिक्षण विभागातील ५४ महाविद्यालयांनी १४ कोटी रुपयांची अनामत रक्कम विद्यार्थ्यांना परत केली नसल्याची बाबही उघडकीस आलेली आहे. विद्यार्थ्यांनी परत न घेतलेल्या अनामत रकमेबाबत संस्थांकडून कोणती कार्यवाही करण्यात येते याची माहिती घेऊन निवेदनाच्या अनुषंगाने अभिप्राय संचालनालयास त्वरित सादर करण्याबाबतही डॉ. प्रकाश बच्छाव यांनी सूचना दिलेल्या आहेत.

प्रभात Sun, 05 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68453161

The Times of India 5.6.2022

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

TIMES NATION

# UGC panel to frame equivalence rules

## Move Part Of Twinning With Foreign Univs

Manash.Gohain
@timesgroup.com

**New Delhi:** With foreign and Indian institutions reaching out to partner in offering twinning programmes and dual/joint degrees, and talks with some foreign universities now at advance stages for setting up campuses in the Gujarat International Finance Tec-City (GIFT-City), Gandhinagar, the University Grants Commission has set up a committee to work on regulations pertaining to recognition

### DEGREES ON PAR

and equivalence of degrees obtained from foreign institutions. So far the equivalence has been decided by the Association of Indian Universities (AIU) on a case to case basis. A four-member committee set up by the UGC will submit the report by the end of this month which will then be shared in public domain for feedback.



A 4-member committee will frame the equivalence rules

In its notification on the setting up of the committee the UGC said, "...In line with the vision of National Education Policy, 2020, UGC has taken a number of initiatives for internationalisation of higher education. These initiatives are efforts towards promoting India as a global study destination... In the interests of students, it is desirable to have a set of regulations related to the grant of equivalence."

The terms of reference is "to frame the UGC Regulations on Recognition and Equivalence of Qualifications obtained from foreign higher educational institutions including determinations of criteria, application procedure, approval mechanism, etc".

Even though the institutions to be set up in the GIFT City are going to be out of the ambit of Commission's regulations, according to UGC chairperson M Jagadesh Kumar, the regulatory authority is working as a facilitator for foreign institutions in India and these regulations will be applicable to all foreign institutions partnering or setting up campuses in India.

The UGC recently notified the regulations for Indian higher education institutions to partner with foreign counterparts to offer twinning/dual/joint degrees as well as for top ranked foreign institutions to set up campuses in India.

"The committee which was set up on May 26, 2022 consists of three senior professors from different Indian Institutes of Technology and a coordinating officer from UGC. It may take about four to six weeks for them to draft the recommendations. We shall then put these recommendations for stakeholders feedback. So far the equivalences are given by AIU. Once these recommendations are approved UGC will be giving the equivalences," said Kumar.

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# काश्मिरी पंडितांसाठीच्या कोट्यात होणार वाढ

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५** - काश्मिरी पंडितांच्या मुलांना महाराष्ट्रात शिक्षण घेण्यासाठी राखीव कोटा ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला होता. आता हा प्रश्न अधिक चिघळल्याने या मुलांसाठी कोटा वाढविण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून नवीन फॉर्म्युला ठरविण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कार्यक्रमानंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सामंत म्हणाले, सध्या काश्मिरी पंडितांचा प्रश्न अतिशय बिकट झाला आहे. येथील मुलांना राज्यात कुठेही शिक्षण हवे असेल तर ते पुरविण्याची जबाबदारी राज्य शासनाची असेल. काश्मिरी पंडितांच्या मुलांसाठी राखीव कोटा ठेवण्याचा निर्णय सरकारने दोन वर्षांपूर्वीच घेतला. यामध्ये वाढ करण्यात

### प्रचलित पद्धतीने परीक्षा होतील : उदय सामंत



करोना रुग्ण वाढल्यानंतर मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांनी बैठक घेऊन गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरण्याचे व काळजी घेण्याचे आवाहन केले. विद्यापीठाने परीक्षांबाबत कुठलीही भूमिका जाहीर केलेली नाही. परीक्षा या ठरल्यानुसार ऑफलाइन पद्धतीनेच होतील, विद्यार्थ्यांनी कुठल्याही संभ्रमात पडू नये, असे आवाहन सामंत यांनी केले.

प्रभात Mon, 06 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68465993

---

### यंदाच्या परीक्षा 'एमसीक्यू'ऐवजी ऑफलाइन व प्रचलित पद्धतीनेच होणार

# लेखी परीक्षेसाठी मिळणार अतिरिक्त वेळ

- दोन पेपरमध्ये दोन दिवसांचे अंतर
- प्रश्नसंचही विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५** - विद्यापीठाच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनेच होणार असल्याचे उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले. त्यानंतर त्वरित विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने परिपत्रक प्रसिद्ध करीत विद्यापीठाच्या परीक्षा प्रचलित पद्धतीने होणार असल्याचे स्पष्ट



केले. या लेखी परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक तासामागे १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ वाढवून दिला जाणार आहे.

याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी आज प्रसिद्ध केले. उच्च व तंत्रशिक्षण उदय सामंत आणि सर्व अकृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंसोबत महाविद्यालयीन व विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने परीक्षा विभागाने पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांची होतील, असे स्पष्ट केले आहे. विद्यापीठाच्या परीक्षा २० जूनपासून सुरू हाणेणार आहे. नियमित सत्राच्या परीक्षेमधील दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. लेखी परीक्षेसाठी प्रत्येक तासामागे १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ वाढवून देण्यात येणार आहे. विद्यार्थी ज्या पॅटर्नमध्ये परीक्षा देणार आहेत, त्याच पॅटर्नमधील प्रश्नसंच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. दिवसभरातील सलगच्या दोन पेपरमध्ये एक तासाचे अंतर असेल.

### एकसमान परीक्षा पद्धतीवर याचिकाकर्ते ठाम

राज्यातील तीन विद्यापीठाने ऑफलाइन परंतु बहुपर्यायी स्वरुप अर्थात एमसीक्यू पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला. यात एकसमानता यावी, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर न्यायायालने राज्य सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले होते. मात्र अजूनही सर्वच विद्यापीठाच्या परीक्षा पद्धतीत एकसमानता दिसत नाही. पुणे विद्यापीठानेही पारंपरिक पद्धतीने परीक्षेचा निर्णय घेतला आहे. याबाबत उद्या (दि.६) भूमिका जाहीर केले जाईल, असे याचिकाकर्ते कल्पेश यादव सांगितले.

प्रभात Mon, 06 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68465157

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# पुणे विद्यापीठ आवारात सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक

## पुरेसा निधी देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

### जलतरण तलावाचे कामही लवकरच

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारात सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी आणि जलतरण तलावासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यापीठाच्या कार्यक्रमात केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुलातील पॅव्हेलिअन इमारत, इनडोअर हॉल आणि अद्ययावत सिंथेटिक ट्रॅकच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, तंत्र शिक्षण संचालक अभय वाघ आणि क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे संचालक डॉ. दीपक माने उपस्थित होते. पवार म्हणाले, 'बालेवाडीतील क्रीडा सुविधाप्रमाणे विद्यापीठातदेखील अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासनाचे सहकार्य राहील. राज्याच्या हितासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी शासन भक्कमपणे पाठीशी उभे राहील. डेक्कन कॉलेज आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्मारकासाठी देखील सहकार्य करण्यात येणार आहे. प्रास्ताविकात राजेश पांडे यांनी 'क्रीडा संकुलाचा परिपूर्ण वापर करण्यासाठी विद्यापीठ लवकरच धोरण ठरविणार आहे,' असे सांगितले.



पुणे : पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुलातील शुटिंग रेंज पाहणीवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नेमबाजीचेही प्रात्यक्षिक केले.

### 'आम्ही तुम्हाला किती पगार देतो...'

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी क्रीडा संकुलातील पॅव्हिलियन इमारत, अद्यावत सिंथेटिक ट्रॅक व इनडोअर हॉल इमारतीच्या उद्घाटनापूर्वी त्याची बारकाइने पाहणी केली. शुटिंग हॉलच्या सिलिंगच्या उंचीत त्रुटी असल्याचे अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून दिली. 'आम्ही तुम्हाला किती पगार देतो, हे काय काम केले,' अशी विचारणा केली. त्यावर विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी अंजली भागवत यांनी तशा सूचना केल्याचे सांगितले. अंजली भागवत यांनी तुम्हाला चांगलीच सूचना केली. मात्र, तुम्ही ती उंची चुकीची केली त्याबाबत मी सांगत आहे. काहीही कारणे सांगतात, असे म्हणत अजित पवारांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

### विद्यापीठाला मिळणार १३ कोटींचे अनुदान

पुण्यातील अपूर्ण शिक्षण प्रकल्प पूर्ण करून देशपातळीवर लौकीक वाढविण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्याला सक्षम करणारे शिक्षण विद्यापीठात मिळायला हवे यासाठी विद्यापीठ आणि शासनाला मिळून काम करावे लागेल.

राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी १३ कोटी ३३ लाख रुपये मंजूर करण्यात येत असल्याची माहिती उदय सामंत यांनी यावेळी दिली.

प्रभात Mon, 06 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68465959

# विद्यापीठ परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना वाढीव वेळ

## दोन पेपरदरम्यान सुट्ट्या, परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उन्हाळी सत्राच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार, म्हणजेच ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय रविवारी जाहीर केला. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना वाढीव कालावधी आणि दोन पेपरमध्ये सुट्टी दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना साधारण २० जूनपासून लेखी पद्धतीनेच परीक्षा द्यावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा एकसमान पद्धतीने होण्याबाबत उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सूचना केल्या आहेत. त्यानुसार उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसोबत चर्चा करून त्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिली आहे. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होतील, असे रविवारी जाहीर केले. तसेच पुणे विद्यापीठानेही रविवारीच ऑफलाइन परीक्षेबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले.

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच होणार आहेत. परीक्षेमध्ये दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवले जाईल. प्रत्येक पेपरला तासामागे पंधरा मिनिटांचा कालावधी वाढवून दिला आहे. विद्यार्थी ज्या पॅटर्नची परीक्षा देणार आहेत, त्या परीक्षांचे प्रश्नसंच उपलब्ध करून दिले जातील. त्याची माहिती येत्या काही दिवसांत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. एखाद्या विद्यार्थ्याचे राहिलेले विषय (बॅकलॉग) आणि चालू सत्राचे विषय एकाच दिवशी येत असतील, तर दोन पेपरमध्ये एका तासाचे अंतर ठेवण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

लोकसत्ता Mon, 06 June 2022 https://epaper.loksatta.com/c/684

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

पुढारी

संक्षिप्त

### महाविद्यालयांतील शिल्लक अनामत रक्कमेची तपासणी करण्याच्या सूचना

**पुणे :** उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेल्या शुल्कातील अनामत रक्कम शिल्लक असल्याबाबत तपासणी करावी, अशा सूचना उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी उच्च शिक्षण संचालनालयाच्या विभागीय सहसंचालकांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. कॉप्स विद्यार्थी संघटनेने शिक्षण विभागातील ५४ महाविद्यालयांकडे १४ कोटींची अनामत रक्कम पडून असल्याचा तपशील माहिती अधिकार अर्जातून प्राप्त केला. त्यानंतर राज्यातील शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित १ हजार ८०० महाविद्यालयांकडे शिल्लक असलेल्या एकूण अनामत रकमेच्या ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याचे निवेदन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांना दिले होते. विद्यार्थ्यांनी परत न नेलेल्या अनामत रकमेबाबत संबंधित संस्थांकडून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल घ्यावा, असे यात नमूद केले आहे.

Pune Edition
Jun 6, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# 'नॅक'च्या मूल्यांकन प्रक्रियेत बदल प्रस्तावित

## श्वेतपत्रिकेवर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी १५ जूनची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकन प्रक्रियेत आमूलाग्र बदल प्रस्तावित केले आहेत. त्यात नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया विद्यार्थीकेंद्रित, परिणामाधिष्ठित करण्यासह तंत्रज्ञानाचा वापर करून रिअल टाइम मूल्यांकन, एकाच संस्थेवर अवलंबून न राहता अधिक संस्थांकडून मूल्यांकन प्रक्रिया राबवण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले असून, या बदलांसंदर्भातील श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून त्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी १५ जूनची मुदत देण्यात आली आहे.

शिक्षण प्रक्रियेत गुणवत्ता वाढवण्यासाठी देशभरातील उच्च शिक्षण संस्थांचे राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून मूल्यांकन केले जाते. त्यात उच्च शिक्षण संस्थांतील सोयीसुविधा, प्राध्यापक-विद्यार्थ्यांची संख्या, संशोधन, माजी विद्यार्थी आदी निकषांचा समावेश असतो. मात्र अद्याप अनेक उच्च शिक्षण संस्था नॅक मूल्यांकन प्रक्रियेपासून दूर आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने नॅक मूल्यांकनाची पुनर्रचना करण्याची गरज व्यक्त करणारी श्वेतपत्रिका नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन आणि प्रा. के. पी. मोहनन यांनी शिक्षणतज्ज्ञांच्या सहकार्याने तयार केली आहे. या श्वेतपत्रिकेचा मसुदा नॅकच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. त्यावर शिक्षण क्षेत्रातील विविध भागधारकांकडून हरकती-सूचना मागवण्यात आल्या आहेत.

अलीकडेच नॅककडून महाविद्यालयांचे तात्पुरते मूल्यांकन (पॅक) ही योजना सादर करण्यात आली होती. मात्र या योजनेमुळे गुणवत्तेचे निकष कमी होण्याचा धोका वर्तवत तात्पुरते मूल्यांकन योग्य नसल्याचे या श्वेतपत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. नॅकची स्थापना होऊन पुढील वर्षी तीस वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत देशातील शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. या अनुषंगाने केलेल्या सर्वेक्षणात ८० टक्के भागधारकांनी नॅक प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांचे चिकित्सक पद्धतीने मूल्यांकन होण्यासाठी, शिक्षण व्यवस्था परिणामकारक होण्यासाठी पथदर्शी अशी श्वेतपत्रिका तयार करण्यात आली. त्यात महाविद्यालय स्तरावर प्रश्नपत्रिकांच्या रचनेत बदल करून चिकित्सक विचारांना चालना देणारे किमान १० टक्के प्रश्न विचारले जावेत, असेही सुचवण्यात आले आहे.

### प्रक्रियेतील प्रस्तावित बदल

- नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शाश्वत विकास ध्येय २०३० यांच्या अनुषंगाने असावी
- मूल्यांकनाच्या प्रक्रियेत व्यक्तिगत, सामाजिक, राष्ट्र आणि जगाच्या कल्याणाच्या घटकांचा विचार असावा
- मूल्यांकनामध्ये सर्वसाधारण शिक्षण आणि विशेष शिक्षणातील आकलन तपासणी, बहुविद्याशाखीय संकल्पनांची तपासणी व्हावी
- उच्च शिक्षण संस्थातील विभाग आणि अभ्यासक्रम अशा दुहेरी पद्धतीने मूल्यांकन करावे
- मूल्यांकनाचा दृष्टिकोन माहिती घेण्यापुरता मर्यादित न ठेवता परिणामाधिष्ठित मूल्यांकन करण्याचा असावा
- उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनाचा नॅकवरील ताण कमी करण्यासाठी अन्य संस्थांची मदत घेण्याचे प्रारूप विकसित करावे
- 'रिअल टाइम' मूल्यांकनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा
- अन्य देशांना मूल्यांकन सेवा पुरवठादार होण्याचे नॅकने उद्दिष्ट ठेवावे

लोकसत्ता Mon, 06 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68464203

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

पुढारी

# पुणे विद्यापीठाला १० कोटी

### अजित पवार यांची घोषणा; सावित्रीबाई फुले स्मारकासह जलतरण तलावासाठी निधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाच्या विकासकामासाठी आणि जलतरण तलावासाठी १० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल,' अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

विद्यापीठातील पै. खाशाबा जाधव क्रीडासंकुलातील पॅव्हेलियन इमारत, इनडोअर हॉल आणि अद्ययावत सिंथेटिक ट्रॅकच्या उद्घान प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, तंत्रशिक्षण संचालक अभय वाघ, विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दीपक माने, क्रीडासंकुल समितीचे अध्यक्ष राजेश पांडे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'विद्यापीठात अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. राज्यातल्या कुठल्याही भागात समाजहितासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी शासन भक्कमपणे पाठीशी उभे राहील. डेक्कन कॉलेज आणि महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या



क्रीडा संकुलामध्ये शूटिंग रेंजची पाहणी करून अजित पवार यांनी अचूक नेम धरला.

स्मारकासाठी देखील सहकार्य करण्यात येईल. पुढच्या पिढीला अभिमान वाटेल असे विद्यापीठ घडविण्याचा प्रयत्न सर्वांनी मिळून करावा. विद्यापीठाबाबतीत आपलेपणाच्या भावनेने सर्वांनी जबाबदारीचे भान ठेवून काम करावे. प्रत्येक विद्यार्थी आपला असल्याची भावना अधिकारी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी दाखवावी.'

सामंत म्हणाले, 'पुण्याच्या शैक्षणिक पंढरीत अपूर्ण शिक्षण प्रकल्प पूर्ण करून पुण्याला देशपातळीवर लौकिक वाढविण्याचा प्रयत्न आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना सक्षम करणारे शिक्षण विद्यापीठात मिळायला हवे. यासाठी विद्यापीठ आणि शासनाला मिळून काम करावे लागेल. राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी १३ कोटी ३३ लाख रुपये मंजूर करण्यात येत आहेत.'

डॉ. काळे यांनी विद्यापीठ कामकाजाचा आढावा घेतला. पांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमादरम्यान शाहू लक्ष्मी कला क्रीडा अकादमीच्या युवक-युवतींनी मर्दानी खेळ दांडपट्टा, लाठीकाठी आणि तलवारबाजीचे प्रात्यक्षिक सादर केले.

#### विद्यापीठात बोलवत नसल्याची खंत

'उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या आग्रहाखातर विद्यापीठात आलो, नाहीतर मला बोलवत नाहीत त्या ठिकाणी मी बळंच चला चला म्हणत जात नाही. तो माझा स्वभाव नाही,' असे म्हणत अजित पवारांनी विद्यापीठातील कार्यक्रमांना बोलविले जात नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. बोलवत नाही, तरी विद्यापीठाचे कोणतेही काम थांबविले नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासाठी आवश्यक परवानग्या पाच मिनिटांत मिळवून दिल्याचेदेखील त्यांनी स्पष्ट केले.

#### अजित पवारांनी अधिकाऱ्यांना सुनावले

अजित पवार विकासकामांमधील गुणवत्तेबाबत आग्रही असल्याचा अनुभव विद्यापीठातदेखील आला. एका ठिकाणी हॉलच्या सीलिंगच्या उंचीत फरक दिसल्यानंतर पवारांनी तो अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिला. तसेच, 'आम्ही तुम्हाला किती पगार देतो, हे काय काम केले?' अशी विचारणाही केली. त्यावर अधिकाऱ्यांनी, 'अंजली भागवत यांनी तशा सूचना केल्या,' असे सांगितले. 'अंजली भागवतने तुम्हाला चांगलीच सूचना केली. मात्र, तुम्ही ती उंची चुकीची केली. त्याबाबत मी सांगत आहे,' असे म्हणत पवारांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

My Pune Edition
Jun 6, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# परदेशी विद्यापीठाची पदवी आता देशात राहूनच मिळवा

### विद्यापीठ अनुदान आयोगाची खास योजना

**मुंबई :** आर्थिक, आरोग्य वा अन्य कारणांमुळे जे विद्यार्थी परदेशात जाऊ उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत अशांना आता भारतात राहूनच परदेशांतील विद्यापीठाची पदवी प्राप्त करणे सहज शक्य होणार आहे. यासंदर्भात एक खास योजना विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने आखली आहे.

यासाठी एका विशेष मंडळाची स्थापना केली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ परदेशी विद्यापीठाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा अशी अटही नाही. जर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील काही भाग परदेशी विद्यापीठाकडून पूर्ण करायचा असेल तर त्यांना तशी मुभाही दिली जाणार आहे. विशेष म्हणजे त्याचे क्रेडिटस् येथे ग्राह्य धरले जातील, असे आयोगाने म्हटले आहे.

Pune Edition
Jun 6, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# शिष्यवृत्तीसाठी अर्जाचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शाहनी ॲकॅडेमिक ॲंड ग्लोबल एम्पॉवरमेंट फाउंडेशनने करोनामुळे फटका बसलेल्या अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थिनींसाठी 'किशोर शाहनी शिष्यवृत्ती' देण्यात येणार आहे. थाडोमल सेंटर फॉर मॅनेजमेंटने देऊ केलेल्या बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा यात पीजी डिप्लोमा; बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा यात व्यावसायिक डिप्लोमा; डिजिटल मार्केटिंगमध्ये व्यावसायिक डिप्लोमा; किंवा बिझनेस इंग्लिशमध्ये प्रमाणपत्र अशा अभ्यासक्रमांसाठी २०० इच्छुकांना शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल. ही शिष्यवृत्ती फाउंडेशनचे माजी संचालक कै. किशोर शाहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू करण्यात आली आहे.

या शिष्यवृत्तीसाठी वय वर्षे २२ ते २६ वयोगटातील विद्यार्थिनी अर्ज करण्यास पात्र आहेत, त्यासाठी csr1@shahanigroup.com वर त्यांनी ई-मेल करावा किंवा ९१७२२९३८४२ या क्रमांकावर संपर्क करावा.

### येथे साधा संपर्क

- या शिष्यवृत्तीसाठी वय वर्षे २२ ते २६ वयोगटातील विद्यार्थिनी अर्ज करण्यास पात्र आहेत.
- त्यासाठी csr1@shahanigroup.com वर त्या विद्यार्थिनींनी ई-मेल करावा.
- याशिवाय ९१७२२९३८४२ या क्रमांकावरही संपर्क साधता येईल.

बीएफएसआय अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडे मान्यताप्राप्त संस्थेची पदवी असणे आवश्यक आहे, तर डिजिटल मार्केटिंग किंवा इंग्लिश अभ्यासक्रमासाठी इच्छुक उमेदवारांनी मान्यताप्राप्त संस्थेतून बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांना कुटुंबाच्या उत्पन्नाच्या पुरावाच्या स्वरूपात कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक असेल. पात्र उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीसाठी आमंत्रित केले जाईल, असे फाउंडेशनकडून सांगण्यात आले.

Maharashtra Times 6.6.2022



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिंथेटिक ट्रॅक, व्यायामशाळा आणि शूटिंग रेंजची पाहणी केली. त्या वेळी निशाणा साधताना पवार.

# विद्यापीठामध्ये सिंथेटिक ट्रॅक

### स्मारक आणि तलावासाठी १० कोटी रुपये

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी आणि जलतरण तलावासाठी १० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल,' अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी केली.

विद्यापीठातील पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुलातील पॅव्हेलियन इमारत, इनडोअर हॉल आणि अद्ययावत सिंथेटीक ट्रॅकच्या उद्घानप्रसंगी ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, क्रीडा व शारीरिक शिक्षणाचे संचालक डॉ. दीपक माने, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'बालेवाडीप्रमाणेच विद्यापीठातही अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. डेक्कन कॉलेज आणि एसएनडीटी विद्यापीठात महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्मारकासाठीदेखील सहकार्य करण्यात येईल. खेळाडूंच्या क्षमतेला वाव देताना पायाभूत सुविधा निर्माण करून देत प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे. विद्यापीठाला कुठलीही समस्या असल्यास ती सोडविण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. खेळाडूंवर भार न टाकता क्रीडा संकुलाची देखभाल करण्यासाठी योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थी आपला असल्याची भावना अधिकारी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी दाखवावी,' असे आवाहन पवार यांनी केले. सामंत म्हणाले, 'पुण्याच्या शैक्षणिक पंढरीत अपूर्ण शिक्षण प्रकल्प पूर्ण करून पुण्याला देशपातळीवर लौकिक वाढविण्याचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानासाठी १३ कोटी ३३ लाख रुपये मंजूर करण्यात येत आहेत.'

पांडे यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा संकुलाचा परिपूर्ण वापर करण्यासाठी विद्यापीठ लवकरच धोरण ठरविणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मर्दानी खेळ दांडपट्टा, लाठीकाठी, मल्लखांबचे आणि तलवारबाजीचे प्रात्यक्षिक सादर केले.

### 'शूटिंग रेंज'मधील कामाबाबत नाराजी

शूटिंग रेंज असणाऱ्या इमारतीत खिडक्या आणि दरवाजांची उंची कमी-जास्त असल्याचे अजित पवार यांना दिसले. याबाबत त्यांनी 'आम्ही तुम्हाला किती पगार देतो, हे काय काम केले' अशा शब्दांत खडसावले. विद्यापीठात पथदिवे दिवसा सुरू असल्याचे आढळल्यावर, याबाबतचा समाचारही पवार यांनी घेतला. 'टायमर'सारख्या यंत्रणांचा वापर करण्याच्या सूचना पवार यांनी केल्या.

Maharashtra Times 6.6.2022

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

पुणे

# परीक्षा ऑफलाइनच

## पुणे विद्यापीठाकडून परीक्षेसाठी वाढीव कालावधी, सुट्ट्याही देणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार म्हणजेच ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय रविवारी जाहीर केला असून, विद्यार्थ्यांना वाढीव कालावधी आणि दोन पेपरमध्ये सुट्टी देण्याचे नियोजन जाहीर केले आहे. त्यामुळे विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना साधारण २० जूनपासून लेखी पद्धतीनेच परीक्षा द्यावा लागणार आहे. परीक्षा पद्धतीवरून चाललेल्या गोंधळावर पुणे विद्यापीठाने पडदा टाकला आहे.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा एकसमान होण्याबाबत उच्च न्यायालयानेही राज्य सरकारला सूचना केल्या आहेत. त्यानुसार उच्च शशिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसोबत चर्चा करुन, त्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिली आहे. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी ऑफलाइन परीक्षा होतील, असे रविवारी जाहीर केले. योगायोगाने पुणे विद्यापीठानेही रविवारी सुट्टीच्या दिवशी ऑफलाइन परीक्षेबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध करून, विद्यार्थ्यांना माहिती आहे.

पुणे विद्यापीठाच्या निर्णयानुसार पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सत्र परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच होणार आहेत. त्याचप्रमाणे नियमित सत्राच्या परीक्षेत दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेची सवय झाली आहे. ही सवय लक्षात घेऊन प्रत्येक पेपरला तासामागे पंधरा मिनिटांचा कालावधी वाढवून दिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिताना फायदा होणार आहे. या परीक्षांसाठी प्रश्नसंच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याची माहिती येत्या काही दिवसांत विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येईल. एखाद्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉग आणि चालू सत्राचे विषय एकाच दिवशी येत असतील, तर दोन पेपरमध्ये एका तासाचे अंतर ठेवण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे. वेळापत्रकाची माहिती विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वेबसाइचवर पाहता येईल. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या सविस्तर माहितीबाबत विद्यापीठाच्या वेबसाइटला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### 'प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी'

'सत्र परीक्षा ऑफलाइन होणार आहेत. त्यामुळे याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना द्यावी. परीक्षा पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना काही शंका किंवा प्रश्न असल्यास, त्याचे निरसन प्राचार्य, प्राध्यापकांनी आणि अधिकाऱ्यांनी करावी,' असे आवाहन काकडे यांनी प्राचार्यांना केले आहे.



प्रातिनिधिक छायाचित्र

Maharashtra Times 6.6.2022

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

# शिवशक राजदंड स्वराज्य गुढी पुढील वर्षापासून प्रत्येक महाविद्यालयात आणि विद्यापीठात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुढील वर्षांपासून शिवशक राजदंड स्वराज्य गुढी प्रत्येक महाविद्यालयात आणि विद्यापीठात उभारली जाईल. प्रत्येक वर्षी एका गडावर विद्यार्थ्यांसह हा शासनातर्फे सोहळा साजरा केला जाईल. त्याबाबतचा शासन निर्णय लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली.

एसएसपीएम विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित शिवस्वराज्य दिन कार्यक्रमावेळी सामंत बोलत होते. या कार्यक्रमात ५१ फुटी शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारण्यात आली. अमित गायकवाड, किरण साळी, सौजन्य निकम आदी या वेळी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र नव्या पिढीसमोर दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे असावे यासाठी शिवस्वराज्य दिन साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविद्यालयातदेखील हा दिन साजरा करण्याला मान्यता दिली आहे. छत्रपती शिवरायांप्रति आदराची भावना व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयात शिवशक राजदंड स्वराज्य ध्वज लावल्यास महाराजांच्या कार्याची प्रेरणा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळेल.



## स्वराज्याचा विचार आत्मसात करावा

विद्यार्थ्यांनी आत्मचिंतनाबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्याचा विचार आत्मसात करायला हवा. काम करण्याची इच्छाशक्ती असेल तर त्याचे रूपांतर महोत्सवात होते, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले. एरंडवणे येथील यशवंतराव मोहिते महाविद्यालयात 'आम्ही भारती'य या संकल्पनेवर आधारित स्वराज्य, स्वातंत्र्य आणि सुराज्य मोहिमेची सांगता शिवस्वराज्य दिनाद्वारे झाली, त्या वेळी सामंत बोलत होते. राज्याचे कृषी - सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा विजयमाला कदम, सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, डॉ. एम. एस. सगरे, कुलसचिव जयकुमार, प्र प्राचार्य डॉ.विवेक रणखांबे, व्ही. व्ही. अडसूळ उपस्थित होते. प्रा. नितीन बानुगडे पाटील यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले.

लोकसत्ता Tue, 07 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68483508

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### विद्यार्थ्यांमध्ये अन्यायाची भावना

- एकसमान परीक्षा पद्धत राबविण्याची मागणी
- पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी
- राज्यातील तीन विद्यापीठांत एमसीक्यू, तर पुणे विद्यापीठात पारंपरिक पद्धतीने परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६** - राज्यातील तीन विद्यापीठांत एमसीक्यू पद्धतीने ऑफलाइन परीक्षा होत आहेत, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा या पारंपरिक पद्धतीने होणार आहेत. त्याचा परिणाम पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या निकालांवर, पुढील शिक्षणातील प्रवेशांवर व नोकरीवर होणार असल्याचे विद्यार्थी संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे या परीक्षा पद्धतीत स्पष्ट धोरण राज्य शासनाने जाहीर करावे, अशी मागणी होत आहे.

याबाबतचे निवेदन युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी उच्च व तंत्रशिक्षण उदय सामंत यांना दिले. त्यात उच्च न्यायालयाने सर्वच परीक्षा पद्धतीत एकसमान असावी, असे निर्देश देऊन त्यानुसार कार्यवाही होत नसल्याचे नमूद केले आहे. विद्यार्थी हिताचा विचार करून पुणे विद्यापीठाला एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेण्याचे आदेश द्यावे, अशी मागणी यादव यांनी केली आहे.

दरम्यान, राज्यात परीक्षा पद्धती एक असावी, वेगवेगळ्या परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ शकते. दोन वेगवेगळ्या परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये तफावत निर्माण होऊ शकते. याचा परिणाम नोकरी व पुढील शिक्षणावर होईल, असे युक्रांदचे शहराध्यक्ष सचिन पांडुळे यांनी सांगितले.

प्रभात Tue, 07 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/684909

### विद्यार्थ्यांनी स्वराज्याचा विचार आत्मसात करायला हवा

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सामंत यांचे प्रतिपादन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६** - काम करण्याची



इच्छाशक्ती असेल तर त्याचे रूपांतर महोत्सवात होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आत्मचिंतनाबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्वराज्याचा विचार आत्मसात करायला हवा, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले.

एरंडवणे येथील यशवंतराव मोहिते महाविद्यालयात 'आम्ही भारतीय' या संकल्पनेवर आधारित स्वराज्य, स्वातंत्र्य आणि सुराज्य मोहिमेची सांगता शिवस्वराज्य दिन साजरा करून झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, प्र-कुलगुरू व राज्याचे कृषी, सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा विजयमाला कदम, प्रा. नितीन बानुगडे-पाटील, सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, डॉ. एम. एस. सगरे, कुलसचिव जयकुमार, चित्रा जैन, प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे, व्ही. व्ही. अडसूळ उपस्थित होते. प्रा. नितीन बानुगडे पाटील यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले.

**प्रा. बानुगडे पाटील यांचे शिवचरित्रावर व्याख्यान**

डॉ. कदम म्हणाले, भारती विद्यापीठ शिक्षणाबरोबर समाजाशीही जोडले गेले आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकीचा संस्कार ते अशा उपक्रमातून नेहमीच जपत असते. विजयमाला कदम म्हणाल्या, युवापिढीने आपला देदीप्यमान इतिहास समजून घेतला तर शिवराय समजतील आणि त्यातून संघर्षाची प्रेरणा मिळेल. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत तीन मोहिमा पार पडल्या पहिल्या मोहिमेत गड किल्ल्यावर आरोहण व बीजारोपण करण्यात आले. दुसऱ्या मोहिमेत एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थिनी सिंहगडावर गेल्या तर तिसऱ्या मोहिमेत सायकल स्वारांची 'सिंहगड ते रायगड' अशी रॅली काढली काढण्यात आली.

प्रभात Tue, 07 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांची नियुक्ती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. मनोहर चासकर यांच्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान, डॉ. पराग काळकर यांच्याकडे वाणिज्य आणि व्यवस्थापन, डॉ. विजय खरे यांच्याकडे मानवविज्ञान, तर डॉ. दीपक माने यांच्याकडे आंतरविद्याशाखीय शाखेचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

विद्यापीठ कायद्यानुसार डॉ. नितीन करमळकर यांचा कुलगुरूपदाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यावर प्र कुलगुरू आणि अधिष्ठाता यांचाही कार्यकाळ संपुष्टात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. त्यानंतर डॉ. संजीव सोनावणे यांच्याकडे प्र कुलगुरू पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. तर अधिष्ठात्यांच्या रिक्त जागांचा प्रश्न होता. या पार्श्वभूमीवर अधिष्ठात्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सोमवारी प्रसिद्ध केले.

आधीच्या अधिष्ठात्यांपैकी डॉ. चासकर आणि डॉ. काळकर यांना कायम ठेवण्यात आले आहे. तर शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. दीपक माने यांच्याकडे आंतरविद्याशाखीय, सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांनी अतिरिक्त कार्यभार स्वीकारल्याचे स्पष्ट करण्यात आले.

लोकसत्ता Tue, http

---

पुढारी

# बारावीचा निकाल याच आठवड्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल याच आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे. हा निकाल ८ किंवा ९ जून रोजी जाहीर होण्याची शक्यता असल्याचे राज्य मंडळातील सूत्रांनी सांगितले.

राज्य मंडळाने यंदा परीक्षा घेण्यावर ठाम राहत दहावी-बारावीच्या परीक्षा घेतल्या. काही तांत्रिक कारणांमुळे परीक्षेच्या वेळापत्रकात बदलदेखील करावे लागले. त्यामुळे दहावीच्या परीक्षा १५ मार्च ते ४ एप्रिल, पान ६ वर»

> बारावी निकालाची अधिकृत तारीख सांगता येणार नाही. मात्र, निकालाची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून, निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.
>
> **- शरद गोसावी,** अध्यक्ष, शिक्षण मंडळ

Pune Edition
Jun 7, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

---

पुढारी

### बारावीचा निकाल याच आठवड्यात

**(पान १ वरून)** तर बारावीची परीक्षा ४ मार्च ते ७ एप्रिलदरम्यान पार पडली. दहावी परीक्षेला राज्यभरातून तब्बल१६लाख३९हजार१७२विद्यार्थी बसले होते. तर, बारावीच्या परीक्षेला १४ लाख ८५ हजार ८२६ विद्यार्थी बसले होते.

बारावीचानिकाल१०जूनलाजाहीर करण्यात येईल, असे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले होते. परंतु, राजकीय दबावापोटी त्याच तारखेला निकाल जाहीर करणे शक्य होणार नाही. त्यामुळे निकाल एक किंवा दोन दिवस अगोदरच जाहीर करण्यात येणार आहे. निकाल जाहीर करण्याचे श्रेय घेण्यासाठी तारखेत बदल करण्यात येणार असून, तारीख शालेय शिक्षणमंत्र्यांकडून जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासन आणि राजकीय श्रेयवादाची लढाई रंगणार असली, तरी निकाल मात्र याच आठवड्यात जाहीर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बारावीचा निकाल लागल्यानंतर पुढील पंधरा दिवसांमध्ये दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचेदेखील सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Jun 7, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# बारावीचा निकाल तयार करणे अंतिम टप्प्यात




प्रभात वृत्तसेवा

> इयत्ता बारावीच्या परीक्षेच्या निकालाचे काम शेवटच्या टप्प्यात आलेले आहे. त्यामुळे काम पूर्ण झाले की निकालाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. आताच नक्की तारीख सध्या सांगता येणार नाही.
>
> **- शरद गोसावी,**
> अध्यक्ष, राज्य मंडळ

**पुणे, दि. ६ -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेच्या निकालाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. निकालाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता बारावीची परीक्षा ४ मार्च ते ७ एप्रिल या कालावधीत घेण्यात आली. परीक्षा पारंपारिक ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात आली. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षण घेत होते, त्याच ठिकाणी केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. परीक्षेसाठी १४ लाख ८५ हजार ८२६ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. यात ८ लाख १७ हजार ६११ मुले तर ६ लाख ६८ हजार ८८ मुलींचा समावेश होता.

प्रभात Tue, 07 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68490986

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षकांचे कार्यमूल्यमापन

## अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षकांचे कार्यमूल्यमापन करण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने समितीची स्थापना केली आहे. शिक्षकांच्या कार्य मूल्यमापनासंदर्भातील अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने धोरणाचा अभ्यास करून शिफारशी सादर करण्यासासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली होती. या समितीच्या शिफारशींना अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०अंतर्गत शिक्षकांच्या शैक्षणिक कालावधीतील कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये तंत्रशिक्षणच्या पुणे विभागाचे सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रा. एस. टी. इंगळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. सुप्रिया पाटील, नागपूरच्या कमला नेहरू महाविद्यालयातील प्रा. सुभाश्री मुखर्जी, पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातील डॉ. समीर तेरदाळकर, भिवंडीच्या बी. एन. एन महाविद्यालयातील डॉ. सुधीर निकम, पुण्याच्या शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. विठ्ठल बांदल यांचा समावेश आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अधिसूचनांचा अभ्यास करून मार्गदर्शक सूचना तयार करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी कार्यमूल्यमापनासाठी कोणत्या घटकांचा समावेश करावा या बाबतच्या शिफारशी करणे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची भूमिका आणि कक्ष अधिक सक्षम करण्याच्या उपाययोजना करणे अशी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

लोकसत्ता Tue, 07 June 2022
https://epaper.loksatta.com/c,

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

सकाळ

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : परिपत्रक जाहीर

# विद्यार्थ्यांना परीक्षेस वाढीव वेळ

पुणे, ता. ६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उन्हाळी सत्राच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार, म्हणजेच ऑफलाइन पारंपरिक पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना वेळ वाढवून मिळणार असून, दोन पेपरमध्ये अंतर ठेवण्यात येणार आहे.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा एकसमान पद्धतीने होण्याबाबत उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सूचना केल्या आहेत. त्यानुसार उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसोबत चर्चा करून त्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिली आहे. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरूंसमवेत महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय परीक्षेच्यासंदर्भात चर्चा झाली. कुलगुरूंशी चर्चा केल्यानंतर परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होतील, असे सामंत यांनी जाहीर केले. त्यानुसार पुणे विद्यापीठाने ऑफलाइन पारंपरिक पद्धतीने परीक्षा घेणार असल्याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले.

या परिपत्रकानुसार पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सम सत्र आणि इतर परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच होणार आहेत. नियमित सम सत्राच्या परीक्षेमधील दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. त्याशिवाय लेखी परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक तासामागे १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ वाढवून देण्यात येईल. विद्यार्थी ज्या पॅटर्नमध्ये परीक्षा देणार आहेत, त्याच पॅटर्नमधील प्रश्नसंच विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच दिवसभरातील सलगच्या दोन पेपरमध्ये एक तासाचे अंतर ठेवण्यात येणार आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

**प्राचार्य, परीक्षा अधिकाऱ्यांना आवाहन...**

**विद्यापीठाने सत्र परीक्षा ऑफलाइन पारंपरिक पद्धतीने घेण्याबाबत जाहीर केलेल्या सूचनांनुसार महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकाचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. महेश काकडे यांनी या परिपत्रकाद्वारे महाविद्यालयीन प्राचार्य, संचालक, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना केले आहे.**

Pune, Main
07/06/2022 Page No. 11

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांच्या श्रेयांक हस्तांतराला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

# अंमलबजावणीचा चेंडू विद्यापीठांच्या अंगणात

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने केलेल्या सर्वेक्षणात देशभरातील ३३८ विद्यापीठांतील १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांचे श्रेयांक हस्तांतरीत करण्याची इच्छा प्रकट केली आहे. त्यात महाराष्ट्रातील खासगी, अभिमत आणि राज्य विद्यापीठे मिळून ३० विद्यापीठांतील ८८८ विद्यार्थ्यांना श्रेयांक हस्तांतरामध्ये रस असल्याचे स्पष्ट झाले असून, स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांच्या श्रेयांक हस्तांतराबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) श्रेयांक हस्तांतर आराखडा स्वीकारण्याची सूचना यूजीसीने देशभरातील विद्यापीठांना केली आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी या संदर्भात देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र दिले आहे. यूजीसीने ‘क्रेडिट फ्रेमवर्क फॉर ऑनलाइन लर्निंग कोर्सेस थ्रू स्टडी वेब्स ऑफ ॲक्टिव्ह लर्निंग ऑफ यंग ॲस्पायरिंग माईंड्स नियमावली २०२१’ लागू केली आहे. या नियमावलीअंतर्गत अभ्यासक्रमाच्या एका सत्रात स्वयम् संकेतस्थळाच्या माध्यमातून ४० टक्के ऑनलाइन अभ्यासक्रमांची परवानगी उच्च शिक्षण संस्थांना देण्यात आली आहे.

या अनुषंगाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्यासाठी फेब्रुवारीमध्ये सर्वेक्षण केले. त्याचा अहवाल मेमध्ये जाहीर करण्यात आला. या सर्वेक्षणात २९ राज्यांतील ३३८ विद्यापीठांतील १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांचे श्रेयांक हस्तांतरण घेण्यात रस असल्याचे नमूद केले. स्वयम संकेतस्थळामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याची आणि प्रमाणपत्र मिळवण्याची संधी मिळते. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी यूजीसीने तयार केलेली श्रेयांक हस्तांरणाचा आराखडा स्वीकारण्याबाबत पत्रात नमूद करण्यात आले आहे.

#### करोनाकाळात प्रतिसादात मोठी वाढ

स्वयम् संकेतस्थळाद्वारे २०१७ मध्ये ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले. ७ हजार ११५ अभ्यासक्रमांसाठी आतापर्यंत २ कोटी ७२ लाख विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तर ११ लाखांहून अधिक प्रमाणपत्रे या संकेतस्थळाद्वारे देण्यात आली. करोना काळात स्वयम् संकेतस्थळाच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे यूजीसीने नमूद केले आहे.

लोकसत्ता Tue, 07 June 2022 https://epaper.loksatta.com/c/68479016

---

### कनिष्ठ महाविद्यालयांसाठी मार्गदर्शन शिबिर

पुणे, दि. ६ - पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या वतीने इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबत नोंदणी करणे, माहितीत बदल करणे यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ७ ते १७ जून या कालावधीत आझम कॅम्पस येथे मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे.

केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने अकरावीची प्रवेश प्रक्रिया होणार आहे. प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. ज्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या माहितीत बदल नाही त्या महाविद्यालयांनी मागील वर्षाच्या व्हेरीफाईड कॉपीसह स्वयंघोषणापत्र अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या माहितीत बदल आहे त्या महाविद्यालयांनी बदल करण्यापूर्वी संकेतस्थळावरील माहितीची प्रिंट काढावी लागणार आहे. आवश्यक बदल करून बदलाबाबतचे सर्व आदेश अपलोड करावे लागणार आहेत. बदलानंतरच्या माहितीची प्रिंट काढावी लागेल.

प्रभात Tue, 07 https://

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# बारावीचा निकाल आज ऑनलाइन जाहीर होणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल बुधवारी (दि.८) दुपारी १ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना निकालाची उत्सुकता लागली आहे.

इयत्ता बारावीची परीक्षा ही ४ मार्च ते ७ एप्रिल या कालावधीत पारंपरिक पद्धतीनेच झाली होती. **या परीक्षेला राज्यातून** १४ लाख ८५ हजार ८२६ विद्यार्थ्यांनी **नोंदणी** केली होती. यात ८ लाख १७ हजार ६११ मुले तर ६ लाख ६८ हजार ८८ मुलींचा **समावेश** होता. परीक्षेसाठी **राज्यातील** १० हजार २७८ **कनिष्ठ** महाविद्यालयांची **नोंदणी झाली** होती. २ हजार ९९६ **मुख्य केंद्र व** ६ हजार ६३९ उपकेंद्र अशा एकूण ९ हजार ६३५ केंद्रांवर परीक्षा झाल्या. दरवर्षीप्रमाणे यंदाही शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी ट्विट करून निकालाची तारीख जाहीर केली आहे. त्यानंतर राज्य मंडळाने लेखी पत्रक काढले.

परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण संकेतस्थळावरून उपलब्ध होणार असून त्या माहितीची प्रिंट आऊटही घेता येणार आहे. www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालासोबत निकालाबाबतची इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होणार आहे. www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर

### आज दुपारी १ वाजेनंतर पाहता येणार निकाल

कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रिका त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयात १७ जून रोजी दुपारी ३ वा.वितरित करण्यात येणार आहेत.

गुण पडताळणीसाठी १० ते २० जून, छायाप्रतीसाठी १० ते २९ जून या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा लागणार आहे. **त्याबाबतचे शुल्कही** ऑनलाइनद्वारे **भरता येणार** आहे. मार्च-एप्रिल २०२२ **च्या** परीक्षेस सर्व **विषयांसह** प्रविष्ठ होऊन **उत्तीर्ण होणाऱ्या** नियमित **विद्यार्थ्यांसाठी** लगतच्या **दोन संधी** श्रेणी किंवा **गुणसुधार** योजनेअंतर्गत **उपलब्ध होणार** आहेत.

**जुलै-ऑगस्ट** २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी १० जून पासून राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज भरता येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे, असे राज्य मंडळाचे प्रभारी सचिव माणिक बांगर यांनी स्पष्ट केले आहे.

**निकाल पाहण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ**
www.mahresult.nic.in
www.hscresult.mkcl.org
https://hsc.mahresults.org.in

प्रभात Wed, 08 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68502654

# उन्हाळी सत्र परीक्षांबाबत विद्यापीठाकडून मार्गदर्शक सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या लेखी परीक्षा येत्या २० जूनपासून १०० टक्के अभ्यासक्रमांवर सुरू होणार आहेत. परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल, एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे परीक्षा होईल, विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या अर्ध्या तासापूर्वी परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहावे लागणार असल्याने विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. आता जवळपास अडीच वर्षानंतर विद्यापीठाच्या परीक्षा पारंपरिक पद्धतीने होणार आहेत. काही दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात लेखी परीक्षांच्या दरम्यान गोंधळ निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परीक्षांसाठीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. परीक्षांमध्ये एका बाकावर एक विद्यार्थी बसणार असल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था करावी. अपंग विद्यार्थ्यांच्या परीक्षेची व्यवस्था तळमजल्यावर करावी, अपंग विद्यार्थ्यांना अतिरिक्त वीस मिनिटे दिली जातील. परीक्षांमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा भरारी पथकांची नेमणूक करण्यात येईल. विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षात कोणतेही इलेक्ट्रॉनिक साधन किंवा मोबाईल नेता येणार नाही. परीक्षेत एखाद विद्यार्थी गैरप्रकार करतांन आढळल्यास त्याच्यावर कारवा



करण्यात येणार असल्याचे नमू करण्यात आले आहे.

विद्यार्थी ज्या पॅटर्नमध्ये परीक्ष देणार आहेत, त्याच पॅटर्नमधील प्रश्नसंच विद्यापीठाच्य संकेतस्थळावर उपलब्ध करू देण्यात आले आहेत. प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या मार्च/एप्रिल २०२२ या उन्हाळी सत्राच्या परीक्षा य समकक्ष विषयानुसार होतील विद्यार्थ्यांनी समकक्ष विषय जाणू घेऊन त्याप्रमाणे अभ्यास करुन परीक्ष द्यावी. परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना द तासामागे पंधरा मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. काही प्रथम व अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्याल स्तरावर होणार असल्याचेही स्प करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 08 June 2022 https://epaper.loksatta.com/c

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

# शंभर टक्के अभ्यासक्रमांवर परीक्षा

## विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्र त्यांच्याच महाविद्यालयात

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लेखी परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमांवर होणार आहे. एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे परीक्षेची बैठक व्यवस्था राहील. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या अर्ध्या तासापूर्वी परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिकत आहेत, त्याच महाविद्यालयात परीक्षा होणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर जवळपास अडीच वर्षांनंतर पुणे विद्यापीठाची लेखी परीक्षा पारंपरिक म्हणजेच ऑफलाइन पद्धतीने २० जूनपासून सुरू होत आहे. या परीक्षेला साधारण ७ लाख विद्यार्थी बसणार आहेत. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून परीक्षांसाठी मार्गदर्शक नियमावली जाहीर करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात लेखी परीक्षांच्या दरम्यान गोंधळ निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाने खबरदारी घेत, परीक्षेची नियमावली प्रसिद्ध केली आहे. या परीक्षांमध्ये एका बाकावर एक विद्यार्थी बसणार असल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था करावी. तशी सुविधा नसेल, तर त्या पद्धतीने व्यवस्था करावी, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

परीक्षा केंद्रांवर बॅग ठेवण्याची, पाण्याची व्यवस्था करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तळमजल्यावर परीक्षेला बसण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. परीक्षांमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा भरारी पथके नेमण्यात आली आहेत. परीक्षेत एखादा विद्यार्थी गैरप्रकार करताना आढळल्यास त्याच्यावर कारवाई होणार आहे. परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी प्रश्नसंच हे पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना पॅटर्ननुसार प्रश्नसंच उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ते आवश्यकतेप्रमाणे डाऊनलोड करता येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे दिली.



### टप्प्याटप्प्याने वेळापत्रक प्रसिद्ध होणार

विद्यार्थ्यांनी समकक्ष विषय जाणून घेऊन त्याप्रमाणे परीक्षेला सामोरे जावे. काही प्रथम वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर होणार आहे. त्याची माहिती संकेतस्थळावर देण्यात आली. सर्व अभ्यासक्रमांचे परीक्षांचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येतील, अशी माहितीही परीक्षा विभागाने दिली आहे.

- **एका बाकावर एक विद्यार्थी बैठक व्यवस्था**
- **परीक्षेचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध होणार**
- **विद्यापीठाच्या परीक्षा २० जूनपासून**
- **परीक्षांसाठी मार्गदर्शक नियमावली जाहीर**

प्रभात Wed, 08 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68503557

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना मानधन वाढ

## 'यूजीसी'च्या निकषांनुसार राज्य शासनाचा महत्त्वाचा निर्णय

- नॅक मानांकन असणाऱ्याच महाविद्यालयांना ५० टक्के पद भरतीला मान्यता
- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय



**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. ७ - राज्यातील महाविद्यालयांतून तासिका तत्त्वावर (सीएचबी) शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निकषानुसार वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. त्याचबरोबर विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देत 'नॅक' मानांकन असणाऱ्या महाविद्यालयांना ५० टक्के पद भरतीला मान्यता देण्यात येणार आहे.

वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती प्रक्रिया व तासिका तत्त्वावर (सीएचबी) कार्यरत प्राध्यापकांच्या दरमहा मानधनाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत, आमदार सुधीर तांबे, सतीश चव्हाण, विक्रम काळे, किरण सरनाईक, अमरसिंह पंडीत, संजय खोडके, सामान्य प्रशासन विभागाचे (सेवा) अप्पर मुख्य सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक धनराज माने, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशनचे (मुप्टा) सुनील मगरे उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून तासिका तत्त्वावरील प्राध्यापक वाढविण्याची मागणी होत होती. अतिशय तुटपुंजी मानधनावर सीएचबी प्राध्यापकांना अध्यापनाचे कार्य करावे लागत होते. आता अर्थमंत्री अजित पवार यांनी यूजीसीच्या निकषानुसार मानधन दिले जाणार असल्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो 'सीएचबी' तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांना होणार आहे.

### शिक्षणाच्या दर्जात तडजोड नको...

राज्यातील विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत. आकृतिबंध पूर्ण झालेल्या मात्र 'नॅक' मूल्यांकन केलेल्या महाविद्यालयांनाच ५० टक्के पदभरतीची परवानगी दिली जाणार आहे. एवढेच नव्हे तर राज्यातील महाविद्यालयीन शिक्षणाच्या दर्जात कोणत्याही परिस्थितीत तडजोड करता कामा नये, अशा सूचना अजित पवार यांनी यावेळी दिल्या.

प्रभात Wed, 08 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68509250

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

**सकाळ**

# 'तासिका' प्राध्यापकांना दिलासा

## 'यूजीसी' निकषानुसार मानधन देण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

सकाळ न्यूज नेटवर्क

**'नॅक' महाविद्यालयात पद भरतीला मान्यता**

**राज्यातील विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देताना आकृतिबंध पूर्ण झालेल्या मात्र 'नॅक' (राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद) मानांकन मिळविणाऱ्या महाविद्यालयातच ५० टक्के पदभरतीला मान्यता देण्यात येणार आहे. राज्यातील महाविद्यालयीन शिक्षणाच्या दर्जात कोणत्याही परिस्थितीत तडजोड करता कामा नये, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी दिल्या.**

मुंबई, ता. ७ : राज्यातील महाविद्यालयांत तासिका (सीएचबी) तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निकषानुसार वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आज घेण्यात आला. त्याचबरोबर विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देत 'नॅक' (राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद) मानांकन असणाऱ्या महाविद्यालयांना ५० टक्के पद भरतीला परवानगी दिली जावी, गुणवत्तापूर्ण शिक्षणात कोणतीही तडजोड करू नये, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो 'सीएचबी' तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांना होणार आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती प्रक्रिया व तासिका तत्त्वावर (सीएचबी) कार्यरत प्राध्यापकांच्या दरमहा मानधनाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. यावेळी 'व्हीसी'च्या माध्यमातून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, आमदार सुधीर तांबे आदी उपस्थित होते.

Pune, Main
08/06/2022 Page No. 4

**लोकमत**

# सीएचबी प्राध्यापकांना आता यूजीसी निकषानुसार मानधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालयातून तासिका (सीएचबी) तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निकषानुसार वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मंगळवारी घेण्यात आला.

त्याचबरोबर विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देत 'नॅक' मानांकन असणाऱ्या महाविद्यालयांना ५० टक्के पदभरतीला परवानगी दिली जावी, गुणवत्तापूर्ण शिक्षणात कोणतीही तडजोड करू नये, अशा सूचना पवार यांनी दिल्या.

मंत्रालयात झालेल्या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत हे ऑनलाइन उपस्थित होते. आ. सुधीर तांबे, आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. किरण सरनाईक यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनचे (मुप्टा) सुनील मगरे उपस्थित होते.

राज्यातील महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, तसेच महाविद्यालयांतून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना देत पवार यांनी राज्यातील तासिका तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो सीएचबी तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांना होणार आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांचे आकृतिबंध तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देताना आकृतिबंध पूर्ण झालेल्या, मात्र नॅक मानांकन मिळविणाऱ्या महाविद्यालयांतील ५० टक्के पदभरतीला मान्यता देण्यात येणार आहे.

Pune Main
Page No. 5 Jun 08, 2022
Powered by: erelego.com

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालयांतून तासिका (सीएचबी) तत्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निकषानुसार वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. त्याचबरोबर राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेचे (नॅक) मानांकन असणाऱ्या महाविद्यालयांना ५० टक्के पद भरतीला परवानगी देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती प्रक्रीया व तासिका तत्वावर कार्यरत प्राध्यापकांच्या दरमहा मानधनाबाबत पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, सामान्य प्रशासन विभागाचे (सेवा) अप्पर मुख्य सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी आदी उपस्थित होते. महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, तसेच महाविद्यालयातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना देत पवार यांनी तासिका तत्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निकषानुसार वाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो प्राध्यापकांना होणार आहे.

**लोकसत्ता** Wed, 08 June 2022
https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

**मटा अँकर** 'यूजीसी'च्या निकषानुसार मानधनवाढ; कॉलेजांना पदभरतीस परवानगी

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना दिलासा

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



अजित पवार

राज्यातील कॉलेजांमध्ये तासिका तत्त्वावर शिकणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात येत्या काळात वाढ होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार या प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांना हिरवा कंदील दर्शविला आहे. याशिवाय नॅक मानांकन असणाऱ्या कॉलेजांना ५० टक्के पद भरतीला परवानगी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी मंगळवारी घेतला.

### सरकारचे निर्णय काय?

- तासिका तत्त्वावर (सीएचबी) शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात 'यूजीसी'च्या निकषानुसार वाढ
- राज्यातील हजारो 'सीएचबी' तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांना होणार आहे.
- 'नॅक' मानांकन मिळविणाऱ्या कॉलेजांना ५० टक्के पद भरतीला मान्यता.

कॉलेजांमधील प्राध्यापकांच्या भरती प्रक्रिया आणि तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाच्या प्रश्नासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी 'व्हीसी'च्या माध्यमातून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, आमदार सुधीर तांबे, आमदार सतीश चव्हाण, महाराष्ट्र अंडर प्रीव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनचे (मुप्टा) सुनील मगरे यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होता. त्या वेळी वरील निर्णय घेण्यात आला.

राज्यातील कॉलेजातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी; तसेच कॉलेजातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील तासिका तत्त्वावर (सीएचबी) शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निकषानुसार वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयाचा फायदा राज्यातील हजारो 'सीएचबी' तत्त्वावर शिकविणाऱ्या प्राध्यापकांना होणार आहे. राज्यातील विद्यापीठांचे आकृतीबंध तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देताना आकृतिबंध पूर्ण झालेल्या मात्र 'नॅक' (राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद) मानांकन मिळविणाऱ्या कॉलेजांनाच ५० टक्के पद भरतीला मान्यता देण्यात येणार आहे. राज्यातील कॉलेजातील शिक्षणाच्या दर्जात कोणत्याही परिस्थितीत तडजोड करता कामा नये, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी दिल्या.

Maharashtra Times 8.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

Wednesday, June 8, 2022 6

# Now, DHE seeks report on funds lying in colleges

**Joint directors told to gather details of refundable money with non-professional colleges; 30 per cent of unclaimed money to be spent on welfare of EBC students**



**It is the responsibility of college management to return refundable money to students after they graduate.** FILE PHOTO

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Taking a cue from the directorate of technical education (DTE), the directorate of higher education (DHE) has issued directives to all the joint directors to collect year-wise data on refundable caution money sitting idle in the coffers of aided and unaided colleges – offering graduate and post-graduate degrees – under their respective jurisdictions.

There are 3,141 aided colleges affiliated with 14 public universities in Maharashtra. More than Rs 500 crore is lying in the bank accounts of these colleges in Pune, Mumbai, Nagpur, Thane, and other districts.

The DHE issued the order on June 2. Earlier, the DTE had issued orders to all the joint directors to gather details on refundable deposit, including caution money, library and laboratory fees from 1,800 aided and unaided technical institutes.

Mirror had first highlighted the issue on April 18. The action by the DHE and the DTE comes in the wake of several follow-ups.

Amar Ekaad, a Right to Information (RTI) activist and president of the Care of People's Safety (COPS) Student Association said, "Under the RTI Act, we had sought details from the DTE and the DHE with regard to the amount collected from students in the name of caution money and library and laboratory fees. The RTI query revealed that an amount of Rs 500 crore was deposited in the accounts of 3,141 aided colleges including 1,800 technical institutes. Out of them, 54 non-professional colleges are sitting on Rs 14.37 crore of refundable unclaimed money. In addition, 126 government polytechnic colleges are holding Rs 12.12 crore refundable money in their bank accounts."

**FLASHBACK**




**Mirror highlighted the issue in its edition published on April 18, 2022**

Pointing out that it was the responsibility of the college management to repay this amount to students after completing their degrees, he said that the admission rules of the state CET (Common Entrance Test) cell state that such amount should be used for giving financial assistance to students belonging to economic backward classes (EBCs).

"However, prior approval from the joint director and audit department is mandatory. But most colleges have already spent crores of rupees without prior permission. However, the higher education director's office had requested year-wise data from all professional and non-professional degree colleges. Finally, the DTE and the DHE has taken a step forward and have ordered to spend 30 per cent amount on the welfare of EBC students. I welcome the decision on behalf of the students. I also thank Mirror who first reported and highlighted this issue."

Dr Dhanraj Mane, director of higher education of state, said, "I have issued orders to all divisional assistant directors to take report of refundable unclaimed deposits worth Rs 500 crore from aided, unaided and government colleges. Out of these 54 non-professional colleges have Rs 14.37 crore in their bank accounts. I have directed that 30 per cent of the total amount be spent on welfare schemes pertaining to EBC students as per the state government resolution. I will get a final report from concerned divisional assistant directors at the end of this month."

Pune Mirror 8.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education



पुणे : इयत्ता बारावीच्या परीक्षेत डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सर्व संस्थांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. निकाल समजताच विद्यार्थ्यांनी फर्गसन महाविद्यालय येथे जल्लोष केला. यावेळी यशवंत विद्यार्थ्यांसह शिक्षकही उपस्थित होते.

# राज्याचा बारावीचा ९४.२२ टक्के निकाल

**मुलांपेक्षा मुलीच अव्वल ठरल्या | ३.५६ टक्क्यांनी निकाल वाढला | पुणे विभागाचा ९३.६१ टक्के निकाल**

**कोकण विभागाची बाजी**

**पुणे, दि. ८ (प्रभात वृत्तसेवा)** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्याचा निकाल ९४.२२ टक्के एवढा लागला असून सन २०२० च्या परीक्षेच्या तुलनेत यंदाचा निकाल ३.५६ टक्क्याने वाढला आहे. (पान २ पहा) ▸▸

| विभागीय मंडळनिहाय निकालाची टक्केवारी | |
|---|---|
| पुणे | ९३.६१ |
| नागपूर | ९६.५२ |
| औरंगाबाद | ९४.९७ |
| मुंबई | ९०.९१ |
| कोल्हापूर | ९५.०७ |
| अमरावती | ९६.३४ |
| नाशिक | ९५.०३ |
| लातूर | ९५.२५ |
| कोकण | ९७.२१ |
| एकूण | ९४.२२ |

"करोनाच्या प्रादुर्भावामुळे अभ्यासक्रमात २५ टक्के कपात करण्यात आली होती. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षण घेत होते त्याच ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी वेळही वाढवून दिला होता. यामुळे या परीक्षेच्या निकालात वाढ झाली असून गुणवत्ताही वाढलेली आहे.

– शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ

प्रभात Thu, 09 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68514298

## राज्याचा बारावीचा ९४.२२ टक्के

निकालात मुलांपेक्षा मुलीच अव्वल ठरल्या असून परंपरा कायम राखली आहे. पुणे विभागाचा निकाल ९३.६१ टक्के एवढा लागला आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, प्रभारी सचिव माणिक बांगर यांनी पत्रकार परिषद घेऊन निकाल जाहीर केला. राज्यातील नऊ विभागीय मंडळात ४ मार्च ते ७ एप्रिल या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली होती.

या परीक्षेसाठी कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवसाय अभ्यासक्रम या शाखांमधून एकूण १४ लाख ४९ हजार ६६४ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यातील १४ लाख ३९ हजार ७३१ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १३ लाख ५६ हजार ६०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात कोकण विभागाचा निकाल हा सर्वाधिक ९७.२१ टक्के तर सर्वात कमी निकाल हा मुंबई विभागाचा ९०.९१ टक्के एवढा लागला आहे. मुलांचा निकाल हा ९३.२९ टक्के तर मुलींचा निकाल हा ९५.३५ टक्के एवढा लागला आहे.

मुलींचा निकाल हा २.०६ टक्क्याने जास्त लागला आहे. एकूण १५३ विषयांसाठी झालेल्या परीक्षेत २४ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. सर्व शाखांमधून एकूण ६ हजार ३३३ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ हजार ३०१ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. त्यातील ६ हजार १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ९५.२४ आहे. राज्यात एकूण ३५ हजार ५२७ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील ३५ हजार ३६८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८ हजार ७५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या निकालाची टक्केवारी ही ५३.०२ टक्के एवढी आहे.

खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेले ३३ हजार ७९५ विद्यार्थी होते. यातील ३३ हजार २३८ विद्यार्थ्यांनीच परीक्षा दिली होती. त्यापैकी २९ हजार १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून हा निकालाची टक्केवारी ही ८७.५६ आहे. फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये ९०.६६ टक्के निकाल लागला होता. त्यानंतर सन २०२१ मध्ये करोनाच्या प्रादुर्भावामुळे परीक्षा रद्द करण्यात आली होती. अंतर्गत मूल्यमापनाद्वारे निकाल लावण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल हा ९९.६३ टक्के एवढा लागला होता.

प्रभात Thu, 09 June 2022 https://epaper.eprabhat.

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

पुढारी

## ऑनलाइन शिक्षणाने केला विद्यार्थ्यांचा घात

■ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

बारावीच्या निकालात यंदा उत्तीर्णांचे प्रमाण वाढले, परंतु गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा टक्का मोठ्या प्रमाणात घटला आहे.

कोरोनामुळे विद्यार्थ्यांना ऑफलाइन शिक्षण सोडून ऑनलाइन शिक्षणाकडे वळावे लागले. याचा परिणाम म्हणजे विद्यार्थी उत्तीर्ण झाले, परंतु त्यांना चांगले गुण मिळवता आले नाहीत. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाने बारावीच्या विद्यार्थ्यांचा घात केला असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, बारावी निकालाची राज्याची आकडेवारी पाहिली. राज्यातील ८ लाख ८ हजार ९६३ विद्यार्थ्यांना ६५ टक्क्यांपेक्षा कमी आहेत. ऑनलाइन शिक्षणामुळे मूळ संकल्पना समजल्या नाहीत. परिणामी विद्यार्थी जेमतेम गुण मिळवण्यातच यशस्वी ठरले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पदवीचा पाया कच्चा राहिला. अकरावी-बारावीत झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्याची जबाबदारी आता महाविद्यालयांवर असल्याचे स्पष्ट केले आहे.

❝ ऑनलाइनमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचे खच्चीकरण झाले. या काळात ऑनलाइन शिक्षण मिळाले पण त्यातील संकल्पना त्यांना नीट समजल्या नाहीत. यावर्षी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या उजळणीसाठी पुरेसा कालावधी मिळाला नाही. यामुळेच विद्यार्थ्यांचा अभ्यास होऊ शकला नाही आणि विद्यार्थ्यांना अनेक अडचणी आल्या. त्याचा परिणाम म्हणून यंदाच्या बारावीच्या परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे.

- डॉ. अ. ल. देशमुख, शिक्षणतज्ज्ञ

❝ बारावीत गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या घटण्याला ऑनलाइन शिक्षण जबाबदार आहे. यामुळे सर्वसामान्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचू शकले नाही. त्यांच्याकडे इंटरनेट सुविधा नव्हती, विजेची सोय नव्हती आणि त्यांच्याकडे मोबाईल उपलब्ध नव्हते. याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांना वर्गात सहभागी होता आले नाही आणि त्यांचा अभ्यासही होऊ शकला नाही. नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तर त्याचा मोठा फटका बसला. सरकार ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यात अपयशी ठरले. याचा सर्व परिणाम विद्यार्थ्यांना सोसावा लागला आहे.

- प्रा. अविनाश ताकवले, माजी प्राचार्य

Pune Edition
Jun 9, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## पुरवणी परीक्षेसाठी अर्ज उद्यापासून

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्य मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थी आणि श्रेणी सुधार करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्टमध्ये पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षेसाठीचा प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांना १० ते १७ जून या कालावधीत त्यांच्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरता येणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे प्रभारी सचिव माणिक बांगर यांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांनी १० ते १७ जून या कालावधीत अर्ज भरल्यानंतर १८ ते २१ जून या कालावधीत शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना चलनाद्वारे बँकेत शुल्क भरायचे आहे. तर, २२ जूनला शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या विभागीय मंडळात जमा करायच्या आहेत. ऑनलाइन अर्जात मार्च-एप्रिल २०२२ मध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांची त्या परीक्षेतील माहिती प्रवेश अर्जात घेता येईल. श्रेणीसुधार करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०२२ आणि जानेवारी-फेब्रुवारी २०२३ या लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांचे ऑनलाइन समुपदेशन...



गुण मिळाल्यामुळे किंवा नापास झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना मानसिक दडपण येते. अशा मानसिक दडपणाखाली असलेल्या विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी ऑनलाइन समुपदेशन सेवा सुरू ठेवली जाणार आहे. समुपदेशकांचे भ्रमणध्वनी राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

Pune Edition
Jun 9, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा ५० क्रमांकानी वाढला

### क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटीचे रँकिंग जाहीर

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांच्या 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी' रँकिंगमध्ये ५४१-५५० या क्रमवारीच्या गटात स्थान प्राप्त केले आहे. गेल्यावर्षी पुणे विद्यापीठ हे ५९१-६०० या क्रमवारीत होते. आता पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा ५० क्रमांकांनी वाढला आहे.

क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग ही जागतिक उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठित रँकिंग प्रणाली आहे. गेल्या काही वर्षांत पुणे विद्यापीठाने या क्रमवारीत सातत्याने वरच्या क्रमवारीत स्थान पटकावले आहे. या वर्षीची क्रमवारी नुकतीच जाहीर झाली. यात जगभरातील १ हजार ४२२ संस्थांचे मूल्यांकन करण्यात आले असून भारतातील ४१ आयआयटी आणि आयआयएससीसारख्या संस्थांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे टाइम्स हायर एज्युकेशन एशिया रँकिंगने यावर्षी डेटापॉईंट संशोधन श्रेणीमध्ये विद्यापीठाला विशेष पुरस्कार जाहीर केला. त्यासाठी ८०० आशियाई शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करण्यात आले. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस.उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी प्राध्यापकांच्या सहाय्याने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठात केलेल्या चांगल्या कामांमुळे पुणे विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा उंचावला आहे.



❝ गेल्या काही वर्षांत पुणे विद्यापीठाने शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी सातत्याने प्रगती केली आहे. त्यामुळे देशातील प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक म्हणून मानाचे स्थान मिळवले आहे. रँकिंगमधील या प्रगतीमुळे इन्स्टिट्यूट ऑफ एमिनन्ससाठी दावा आणखी मजबूत झाला आहे.

- डॉ. प्रफुल्ल पवार,
कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

❝ पुणे विद्यापीठाची रँकिंग ५० क्रमांकांनी सुधारल्याचा आनंद आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनेक संकल्पना स्वीकारत आहोत आणि त्यांची पुनर्बांधणी करत आहोत. बहुविद्याशाखीय कार्यक्रम आणि संशोधनाच्या अंमलबजावणीमुळे आणखी उंची गाठण्यास नक्कीच मदत होणार आहे. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी पुणे विद्यापीठातील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

- डॉ. कारभारी काळे,
प्रभारी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात Fri, 10 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68547346

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

**लोकमत**

# क्यूएस वर्ल्ड रँकिंगमध्ये पुणे विद्यापीठाची आघाडी

## ५४१ ते ५५० रँकिंग गटात मिळवले स्थान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने क्यूएस वर्ल्ड यूनिर्व्हसिटी रँकिंगमध्ये गेल्या पाच वर्षात २५० ने आघाडी घेतली आहे. तर मागील वर्षी ५९१ ते ६०० रँकिंग च्या गटात असणारे पुणे विद्यापीठ २०२३ मध्ये ५४१ ते ५५० रँकिंग गटात पोहोचले आहे. त्यामुळे विद्यापीठाने भारतीय विद्यापीठांच्या यादीतही मानाचे स्थान मिळवले आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठित रँकिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्युएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगची क्रमवारी बुधवारी जाहीर करण्यात आली. त्यात चौदा हजार दोनशे संस्थांचे आणि विद्यापीठांचे मूल्यांकन करण्यात आले. भारतातील ४१ आयआयटी आणि आयआयएम सारख्या संस्थांचा समावेश आहे. मागील वर्षाच्या तुलनेत पुणे विद्यापीठाने रँकिंगमध्ये ५० ने आघाडी घेतली आहे.

ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणून



ओळखल्या जाणाऱ्या पुणे विद्यापीठाने आपली शैक्षणिक गुणवत्ता जगभरात दाखवून दिला आहे. केंद्र शासनाच्या शिक्षण विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या एन आयआरएफ रँकिंगमध्ये सुद्धा स्टेट यूनिवर्सिटी गटात पुणे विद्यापीठ अव्वल क्रमांकावर आहे. तसेच देशातील विद्यापीठांमध्ये अकरा ते नऊ या क्रमवारीत आपले स्थान अबाधित ठेवून आहे. क्यूएस रँकिंगमध्ये आघाडी घेतल्याने विद्यापीठाचे सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.नितीन करमळकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे रँकिंगमध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे.

Pune Main
Page No. 2 Jun 10, 2022
Powered by: erelego.com

---

११ वी प्रवेश प्रक्रियेत अधिक सुसूत्रता

# जन्म दिनांक, वडिलांचे नाव, आडनावावरून ठरणार क्रम

## ऑनलाइन प्रवेश; विद्यार्थ्यांना समान गुण असल्यास प्रवेशाचे सूत्र ठरले

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९** - राज्यातील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी सुधारणा करण्यात आल्या आहेत. एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या समान गुणांच्या आधारे प्रवेश देताना जन्म दिनांकापासून ज्येष्ठ विद्यार्थी अगोदर याप्रमाणे क्रम आणि जन्म दिनांक समान असल्यास विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव म्हणजे नाव-वडिलांचे नाव-



आडनाव याप्रमाणे इंग्रजी घेऊन त्या वर्णाक्षरांच्या क्रमानुसार क्रम ठरविण्यात येणार आहे.

अकरावी प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता (एसईबीसी) सामान्य प्रशासन विभागाच्या ५ जुलै २०२१च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी लागणार आहे. इनहाऊस कोटांतर्गत प्रवेश कोणत्याही टप्प्यावर करण्याची व प्रत्यार्पित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मुंबई महानगर क्षेत्र व पुणे महापालिका क्षेत्रातील वगळण्यात आलेल्या गावांचा ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत समावेश करावा लागणार आहे. प्रथम पसंतीक्रम मिळून प्रवेश न घेतल्यास, घेतलेला प्रवेश रद्द केल्यास, विद्यालयाने प्रवेश नाकारल्यास या तीन कारणांनी विद्यार्थ्यांना तीन नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येत व असे विद्यार्थी चौथ्या विशेष फेरीमध्ये समाविष्ट होऊ शकतात. शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत आवश्यक बदलाबाबत शिक्षण संचालकांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आदेश शिक्षण विभागाचे सहसचिव इ.मु. काझी यांनी काढले आहेत.

प्रभात Fri, 10 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68547446

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# SPPU in 541–550 bracket of QS Rankings 2023

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has augmented its position to the 541-550 rank bracket in the 'QS World University Ranking 2023' from the 591–600 bracket in the QS WUR 2022 edition. The QS Rankings were announced on Wednesday, June 8, wherein SPPU is amongst the top 38 per cent of the educational institutes across the world.

SPPU stands at the 11th position in the nation with the top 10 positions occupied by IISc, IITs and a central university. The QS

SPPU IS AMONGST THE TOP 38 % OF EDUCATIONAL INSTITUTES ACROSS WORLD

World University Ranking system utilises parameters like academic reputation, employer reputation, research publications and citations and international outreach with respect to faculty and students for assessment purpose. This year 2,462 global institutions were analysed and 1422 institutions were ranked by QS WUR team, in which 41 Higher Education Institutes participated from India.

"This year we have improved our rank by 50 numbers. We are adopting and rebuilding several concepts in accordance with the National Education Policy. Implementation of 'multidisciplinary programs and research' will help us achieve even greater heights," said SPPU vice-chancellor professor Karbhari Kale.

**DHEERAJ BENGRUT**

Hindustan Times 10.6.2022

QS WORLD UNIVERSITY RANKINGS

# SPPU climbs 50 points, ranks among 550 best universities in the world

**ALIFIYA KHAN**
PUNE, JUNE 9

THE SAVITRIBAI Phule Pune University (SPPU) has performed well again at the QS World University Ranking 2022, which were announced on Wednesday, rising from the 591-600 bracket in which it was categorised last year to the 541-550 bracket this year.

The rankings provide an insight into the higher education sector across the globe and rank universities worldwide based on points gathered for several parameters such as faculty student ratio, faculty research and citations per faculty in publications, teaching pedagogy, international faculty and students, employee perception and so on.

This year, 1,422 institutes from all over the world -- including 41 from India like the IITs and IISc -- were evaluated.

Notably, SPPU's rank in the world rankings system has been rising steadily over the last few years. In 2020, SPPU was in the 800+ bracket, which means that in only two years, the university overtook 250 universities across the world in terms of rankings.

While most Indian universities continue to struggle with the measure of institutional teaching capacity by the QS, with 30 of India's 41 ranked universities seeing a decline in the Faculty and Student Ratio (FSR) indicator, SPPU is one of the only two Indian universities ranked among the top 250 in the world for FSR.

Among prominent institutions in India, universities such as Delhi University, Jawaharlal Nehru University and Jamia Millia Islamia have slipped several places in the coveted rankings.



**SPPU is one of the only two Indian universities ranked among the top 250 in the world for Faculty and Student Ratio**

While the Delhi University, which is ranked 10th best Indian university, slipped from the 501-510 bracket to 521-530, JNU's ranking, which was earlier in the 561-570 bracket, dropped to the 601-650 bracket, and Jamia Millia Islamia, which was in the 751-800 bracket last year, is now in the 801-1000 bracket.

As far as Indian universities and educational institutions are concerned, Bengaluru's Indian Institute of Science (IISc) has moved up 30 places and become the 155th best university, and the topmost among Indian universities.

Meanwhile, the SPPU administration credited innovative ideas in education and research for its meteoric rise.

"In the last few years, the university has risen up steadily and has earned a position of honour as one of the prestigious universities in the nation. This advancement in ranking has made our claim for the 'Institute of Eminence' even stronger," said Prafulla Pawar, registrar of SPPU.

Acting Vice-Chancellor Karbhari Kale said the university looks forward to announcements of this ranking every year.

"SPPU has been adopting and rebuilding several new concepts in accordance with the National Education Policy. Implementation of multi-disciplinary programmes and research will help us achieve even greater heights. My congratulations to all my colleagues at SPPU who have contributed towards this ranking," he said.

The Indian Express 10.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

लोकमत

# परीक्षेचे वेळापत्रक कोलमडल्याने धास्तावले परदेशी जाणारे विद्यार्थी

## अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्याचे नियोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना संकटानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह विविध शैक्षणिक संस्थांच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले आहे. असले तरी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक कालावधीत प्रवेश निश्चित करावा लागतो. अद्याप परीक्षाच सुरू न झाल्यामुळे परदेशात जाता येईल का, या विचाराने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.



विद्यार्थी हिताचा विचार करून विद्यापीठाने प्रथमतः अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन त्यांचा निकाल तातडीने जाहीर करण्याचे नियोजन केले आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनीही स्पष्ट केले होते. त्यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाने प्रथमतः अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेची तयारी केली आहे.

> विद्यापीठाने परीक्षांचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले आहे. अंतिम वर्षाच्या विविध विषयांच्या परीक्षा २० जूनपासून सुरु होत आहेत. निकालही तातडीने जाहीर करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असेल.
>
> **- महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

अभियांत्रिकी, फार्मसी आर्किटेक्चर आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रथम घेतल्या जाणार आहेत. त्यानंतर वाणिज्य, विज्ञान, कला अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेतल्या जातील.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २० जूनपासून सुरू होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा निकालही जुलै महिना अखेरपर्यंत किंवा ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यातपर्यंत लावण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असणार आहे.

Hello Pune
Page No. 4 Jun 12, 2022
Powered by: erelego.com

# अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत बदल

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत पहिल्या क्रमांकाचे महाविद्यालय मिळाल्यानंतर प्रवेश न घेतल्यास आणि अचानक प्रवेश रद्द केल्यास संबंधित विद्यार्थ्याला पुढील तीनऐवजी आता एकाच फेरीत सहभागी होता येणार नाही,

असा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. यापूर्वी पुढील तीन फेरीपर्यंत प्रवेशासाठी संबंधित विद्यार्थ्यांना प्रतिबंध करण्यात येत होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुणे-पिंपरी चिंचवड, मुंबई (महानगर क्षेत्र), अमरावती, नाशिक, नागपूर या महापालिका क्षेत्रांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश घेण्यासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश राबविण्यात येते. सध्या या प्रवेश प्रक्रियेत नोंदणी प्रक्रिया आणि अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### महाविद्यालयांची संख्या वाढण्याची शक्यता



राज्य सरकारच्या २८ मार्च २०१६ आणि २७ जानेवारी २०१७ रोजीच्या निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्र, पुणे महापालिका क्षेत्रातील वगळण्यात आलेल्या गावांचा इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात यावा, असाही निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे इनहाउस कोट्यांतर्गत प्रवेश कोणत्याही टप्प्यावर करण्याची व जागा प्रत्यार्पित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, असेही निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पर्यायातील प्रथम क्रमांकाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतल्यास, घेतलेला प्रवेश रद्द केल्यास किंवा महाविद्यालयाने प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्याला पुढील तीन प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याला बंदी होती. या विद्यार्थ्याला चौथ्या विशेष फेरीमध्ये सहभागी व्हावे लागत होते. मात्र, या नियमात बदल करण्यात आला असून, संबंधित विद्यार्थ्याला पुढील एका फेरीतच सहभागी होता येणार नाही. त्यामुळे पुढील फेऱ्यांमध्ये त्याला सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असून त्यांना चांगल्या महाविद्यालयात प्रवेशासाठीचा पर्याय उपलब्ध राहणार आहे.

लोकसत्ता Mon, 13 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68588564

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

# अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत बदल

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत पहिल्या क्रमांकाचे महाविद्यालय मिळाल्यानंतर प्रवेश न घेतल्यास आणि अचानक प्रवेश रद्द केल्यास संबंधित विद्यार्थ्याला पुढील तीनऐवजी आता एकाच फेरीत सहभागी होता येणार नाही,

असा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. यापूर्वी पुढील तीन फेरीपर्यंत प्रवेशासाठी संबंधित विद्यार्थ्यांना प्रतिबंध करण्यात येत होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुणे-पिंपरी चिंचवड, मुंबई (महानगर क्षेत्र), अमरावती, नाशिक, नागपूर या महापालिका क्षेत्रांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश घेण्यासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश राबविण्यात येते. सध्या या प्रवेश प्रक्रियेत नोंदणी प्रक्रिया आणि अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### महाविद्यालयांची संख्या वाढण्याची शक्यता



राज्य सरकारच्या २८ मार्च २०१६ आणि २७ जानेवारी २०१७ रोजीच्या निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्र, पुणे महापालिका क्षेत्रातील वगळण्यात आलेल्या गावांचा इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात यावा, असाही निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे इनहाउस कोट्यांतर्गत प्रवेश कोणत्याही टप्प्यावर करण्याची व जागा प्रत्यार्पित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, असेही निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पर्यायातील प्रथम क्रमांकाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतल्यास, घेतलेला प्रवेश रद्द केल्यास किंवा महाविद्यालयाने प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्याला पुढील तीन प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याला बंदी होती. या विद्यार्थ्याला चौथ्या विशेष फेरीमध्ये सहभागी व्हावे लागत होते. मात्र, या नियमात बदल करण्यात आला असून, संबंधित विद्यार्थ्याला पुढील एका फेरीतच सहभागी होता येणार नाही. त्यामुळे पुढील फेऱ्यांमध्ये त्याला सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असून त्यांना चांगल्या महाविद्यालयात प्रवेशासाठीचा पर्याय उपलब्ध राहणार आहे.

लोकसत्ता Mon, 13 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68588564

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Education

# पुणे विद्यापीठाची प्रवेशप्रक्रिया १५ जूनपासून

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये सुरू असलेल्या विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया १५ जूनपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना दि.१७ जुलैपर्यंत अर्ज करता येईल. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा साधारण २० जुलैनंतर होण्याची शक्यता आहे. याबाबतचे परिपत्रक येत्या एक-दोन जाहीर होणार आहे.

बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाते. पुणे विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया येत्या दि. १५ जून ते १७ जुलै या कालालवधीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करावे लागणार आहे. या अर्जांची पडताळणी केल्यानंतर, विद्यार्थ्यांना हॉल तिकीट आणि प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक उपलब्ध होणार आहे. पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये १३ पदवी अभ्यासक्रम सुरू असून, त्यासाठीची परीक्षा केवळ एकच दिवस राहणार आहे. तर, इतर दिवशी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा विविध सत्रांमध्ये ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

### अर्ज संख्या वाढण्याचा अंदाज

पुणे विद्यापीठाने गेल्या काही वर्षात अनेक नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू केले आहेत. पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी साधारण अडीच हजार जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमांचे शुल्क इतर खासगी विद्यापीठे आणि कॉलेजांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे या प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी अर्ज करतात. त्याचप्रमाणे रोजगाराची संधीही उपलब्ध होत असल्याचे चित्र आहे. गेल्यावर्षी या प्रवेश प्रक्रियेत ३० हजारांपेक्षा अधिक अर्ज आले होते.



प्रभात Mon, 13 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68597591

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

सकाळ

### शालार्थ प्रणाली : नाव समाविष्ट करण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा

पुणे, ता. १२ : शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपद्धतीत सुस्पष्टता यावी, याकरिता शालेय शिक्षण विभागाने या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पात्रतेनुसार निवडून आलेले, त्यानंतर सरकारची मान्यता मिळालेले आणि सेवेत रुजू झालेले आणि अद्यापही शालार्थ आयडीअभावी वेतनापासून वंचित असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये तसेच विद्या निकेतने अशा संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदांची भरती करण्याबाबत, तसेच त्यांना वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याच्या कार्यपद्धतीत राज्य सरकारने सुधारणा केली असून त्याबाबत सविस्तर माहिती अध्यादेशात दिली आहे.

वैयक्तिक मान्यता तसेच शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपद्धती अधिक पारदर्शक, सोपी व सुटसुटीत व्हावी, या उद्देशाने हे पाऊल उचलले आहे. या सुधारणेमुळे प्रक्रियेसाठी लागणारा एकूण वेळ आणि कार्यालयीन फेऱ्या कमी होऊन ती अधिक शिक्षकाभिमुख आणि कार्यक्षम करण्यास मदत होईल, असे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी फेसबुकवरील पोस्ट आणि ट्विटर अकाउंटवरील ट्विटच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. शालार्थ प्रणालीत नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणेचा लाभ राज्यातील मान्यताप्राप्त विविध संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे. पवित्र प्रणालीद्वारे झालेल्या/होणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर पदांच्या नियुक्त्यांबाबत संबंधित उमेदवाराचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेमध्ये यापुढे वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याची आवश्यकता नाही. तसेच ही प्रक्रिया दिलेल्या मुदतीत पार पाडणे बंधनकारक असणार आहे, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे.

**अध्यादेशात काय म्हटले आहे?**

पवित्र प्रणालीद्वारे नियुक्त केलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीत समाविष्ट करण्यासाठी संबंधित संस्था, शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक यांनी कशा पद्धतीने कार्यवाही करावी, याबाबत सविस्तर माहिती राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या अध्यादेशात दिली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव समीर सावंत यांनी अध्यादेशाद्वारे दिले आहेत.

> शालार्थ आयडी न मिळाल्याने सध्या सेवेत असणारे जवळपास १५ टक्के शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनाच्या लाभापासून वंचित होते. परंतु आता राज्य सरकारने वैयक्तिक मान्यता तसेच शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणेबाबत घेतलेल्या निर्णयामुळे त्यांना न्याय मिळू शकणार आहे. राज्य सरकारने याबाबत अध्यादेश काढल्याने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी मिळण्याच्या प्रक्रियेला वेग येणार आहे.
> – **महेंद्र गणपुले**, राज्य प्रवक्ते, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ

Pune, Main
13/06/2022 Page No. 2

पुढारी

# परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची संधी



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यास सुरुवात झाली आहे.

विद्यार्थ्यांना ८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी टाइम्स किंवा क्यूएस रँकिंग प्रणालीत २०० च्या आत असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, विधी, अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र यापैकी कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यास त्याला योजनेत सहभागी होता येणार आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्याला ८ जुलैपर्यंत https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in या लिंकद्वारे ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे अपलोड करावी लागणार आहे.

**विद्यार्थ्यांना ८ जुलैपर्यंत करता येणार अर्ज**

कला, वाणिज्य, विधी, विज्ञान अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी जवळच्या उच्च शिक्षण विभागाच्या कार्यालयात; तर व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र शाखेतील अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना जवळच्या तंत्रशिक्षण विभागाच्या कार्यालयात ११ जुलैपर्यंत शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी करायची आहे. ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच योजनेत सादर करता येणार आहे, अशी माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे (डीटीई) संचालक डॉ. अभय वाघ यांनी दिली.

My Pune Edition
Jun 14, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

Times of India 14 June 2022

# Students can now pursue PhD after 4-year undergrad course

## 40% Of Vacant Seats Can Be Filled Through Univ-Level Tests

Manash.Gohain
@timesgroup.com

**New Delhi:** Students with a minimum CGPA score of 7.5/10 in the four-year-undergraduate programme (FYUP) will now be eligible for PhD admissions, without having to complete a master's programme, according to the new regulations on award of PhD degree finalised by the University Grants Commission (UGC). In order to arrest the trend of publishing in predatory journals, the new regulations recommend either patenting or publishing in peer-reviewed or referred journals only.

The University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of PhD degree) Regulations 2022 are likely to be announced by end of June and set to come into effect from the forthcoming 2022-23 academic session.

Giving a boost to FYUP introduced under the National Education Policy (NEP), the regulations state that "a candidate seeking admission after a 4-year/ 8 semester Bachelor's degree should have a minimum CGPA of 7.5/10," while offering a relaxation of 0.5 CGPA score on a scale of 10 for candidates from SC/ ST/ OBC/ differently-abled as well as economically weaker sections.



**In order to arrest the trend of publishing in predatory journals, the new regulations recommend either patenting or publishing in peer-reviewed or referred journals only**

"Encouraging four-year undergraduate students with a research bent of mind to do PhD is important to improve the research ecosystem in our HEIs. That is why we are permitting four-year UG students who have a CGPA of 7.5/10 or above to be eligible for PhD admission. Those who have a CGPA less than 7.5, will have to do a one-year Master's degree to be eligible," said UGC Chairperson M Jagadesh Kumar.

As per the new regulations, 40% of the vacant seats can be filled through university-level tests. Two modes of admissions — 100% based on national level entrance tests or 60-40 split based on national level entrance tests and university level or state-level entrance tests have been recommended.

If the total vacant seats are filled by the candidates qualifying in the national level entrance tests (conducted by UGC, CSIR, ICMR, ICAR, etc), the selection of such candidates will be based on a merit list with 100% weightage from interview/ viva conducted by the higher education institution.

The Times of India 14.6.2022

सकाळ

# विद्यापीठ अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू

पुणे, ता. १४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात आता लवकरच निवडणुकीचे वारे वाहू लागणार आहेत. निमित्त आहे विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीचे. विद्यापीठाच्या अधिसभेचा कार्यकाळ संपत असल्याने विद्यापीठ प्रशासनाने अधिसभा सदस्य निवडणूक आणि त्यासंदर्भातील प्रक्रिया सुरू करण्याची घोषणा केली आहे.

विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचे दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर निवडून द्यायचे आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी तसेच मतदार यादी तयार करण्यासाठी विद्यापीठाच्या 'election.unipune.ac.in' य संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धती बुधवारपासून (ता.१५) अर्ज मागविण्यात येत आहेत. हे अर्ज करण्यासाठी उमेदवारांना ४ जुलैपर्यंत मुदत दिली आहे. विद्यापीठा पदवीधरांच्या नोंदवहीत नोंद करणे आणि नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, ही प्रक्रिया सुरू केली आहे.

नोंदणीकृत पदवीधर होण्यास विद्यापीठाचे पदवीधर, तसेच विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असलेल्या, पुणे विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यास पात्र असणार आहेत.

### संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

विद्यापीठाच्या अधिसभेत नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूक कार्यक्रम, सूचना, मतदार याद्या, प्रकटन आदीबाबत फक्त विद्यापीठाच्या 'election.unipune.ac.in' या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे. ऑनलाइन अर्ज भरताना पदवीधरांनी प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात, असे आवाहनही केले आहे.

Pune, Main
15/06/2022 Page No 3

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

### विद्यापीठ सुधारणा विधेयक विचारार्थ राष्ट्रपतींकडे

**मुंबई :** कुलगुरूंच्या निवडीच्या राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावण्याच्या महाविकास आघाडी सरकारच्या प्रयत्नांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी चाप लावला आहे. विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर काहीच निर्णय न घेता हे विधेयक विचारार्थ राष्ट्रपतींकडे सादर केले आहे. परिणामी राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय हे बदल अमलात येणार नाहीत. विद्यापीठांच्या कारभारात हस्तक्षेपावरून राज्यपाल आणि सरकार यांच्यात वाद सुरू झाल्यानंतर राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्यानुसार राज्य सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) कायद्यात बदल करणारे विधेयक हिवाळी अधिवेशनात संमत करण्यात आले. हे बदल करताना कुलगुरूंच्या निवडीच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली. तसेच प्र-कुलपती असे नवे पद निर्माण करीत उच्च शिक्षणमंत्री हे प्र-कुलपती असतील अशी तरतूद कायद्यात करण्यात आली. शिवाय कुलपतींच्या अनुपस्थितीत प्र-कुलपती कामकाज पाहू शकतील.

लोकसत्ता Wed, http

### सिनेटच्या निवडणुकीची विद्यापीठात तयारी सुरू

**पदवीधारकांना आजपासून नोंदणी करता येणार**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचा (सिनेट) कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने नव्या सिनेटच्या निवडीसाठी निवडणूक तयारी सुरू झाली आहे.

सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार पुणे विद्यापीठाचे दहा नोंदणीकृत पदवीधर सिनेटवर निवडून द्यायचे आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांनी नावनोंदणी आणि मतदारयादी तयार करण्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाइटवर ऑनलाइन पद्धतीने आज, १५ जून ते ४ जुलै या कालावधीत अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचा कार्यकाळ ऑगस्टअखेर संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने पदवीधरांच्या नोंदवहीत नोंद करणे आणि नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, ही प्रक्रिया सुरू केली आहे. अधिकार मंडळावर शिक्षक, प्राचार्य, शिक्षण संस्था, शिक्षकेतर कर्मचारी याप्रमाणेच पदवीधर गटातून १० उमेदवार निवडून दिले जातात. त्यासाठी विद्यापीठाने नोंदणीकृत पदवीधारकांकडून आजपासून अर्ज मागविण्यास सुरुवात केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर देण्यात आली आहे. पदवीधराने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पदवीचे शिक्षण घेतलेले असावे.

नोंदणी करताना पदवी प्रमाणपत्र आणि निवासाचा पुरावा आवश्यक राहणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नव्याने नाव नोंदवयाचे असेल, त्यांनी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या वेबसाइटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या पदवीधरांनी यापूर्वीच नोंदणी केलेली असेल, त्यांनी मतदारयादीत नावाचा समावेश करण्यासाठी वेबसाइटवर ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज करताना पदवी प्रमाणपत्र, निवासाचा पुरावा, नाव बदलले असल्यास शासकीय राजपत्राची किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, छायाचित्र व स्कॅन करून सही अपलोड करणे आवश्यक आहे, असेही कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times 15.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# तासिक तत्त्वाचे धोरण रद्द करावे

## संघर्ष समितीचे धरणे आंदोलन : शासनाने दखल घेण्याची मागणी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५** - उच्चशिक्षितांचे शोषण करणाऱ्या तासिका तत्त्व धोरणाचे (सीएचबी) उच्चाटन करणारा माने समिती अहवाल राज्य शासनाने स्वीकारावा. तो लागू करण्यासाठी नेट-सेट, पीएच. डी. धारक संघर्ष समितीच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार विद्यापीठे व महाविद्यालयातील रिक्त पदे ही १०० टक्के भरावीत, प्रचलित



तसेच शंभर टक्के भरती होईपर्यंत समान काम समान वेतन या तत्वानुसार सेवाशर्तीनुसार वेतन देण्यात यावे, विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्र सरकारच्या निर्देशानुसार आरक्षणासाठी विभाग व विषय एकक न मानता विद्यापीठ व महाविद्यालय एकक म्हणून सहाय्यक प्राध्यापक भरती करण्यात यावी या मागण्यासाठी मागील

त्याची दखल घेत उच्च व त[...] शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी उ[...] शिक्षण संचालक डॉ. धनराज मा[...] यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठी[...] केली होती. या समितीने शासना[...] सादर केलेल्या अहवालाती[...] शिफारशी शासनाने स्वीकार[...] उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये त्याच[...] अंमलबजावणी करण्याबाबत आदेश पारित होणे आवश्य[...] आहे.

माने समिती अहवाल उ[...] शिक्षण क्षेत्रात लागू झाल्या[...] याचा लाभ हजारो पात्रताधारकां[...] होणार आहे, अशी माहिती संघ[...] समितीचे राज्य समन्वयक प्रा.[...]

प्रभात Thu, 16 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68653612

पुढारी

# नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी चुरस वाढणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता विद्यार्थी-पालकांचे लक्ष अकरावी, डिप्लोमा, आयटीआय प्रवेशांकडे लागले असून, या तिन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना वेबसाइटवर जाउन ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावे लागणार आहेत.

साधारण ८३ हजार ६० विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाल्याने यंदा देखील नामांकीत महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी चुरस राहणार आहे. प्रवेशासाठी गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही प्रवेशासाठी जागा उपलब्ध राहणार आहे. राज्यातील पुणे- पिंपरी चिंचवड, मुंबई, नागपूर, अमरावती, नाशिक या महापालिका क्षेत्रात कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तर, उर्वरित जिल्ह्यांमध्ये ऑफलाइन पद्धतीने



प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी प्रवेश प्रक्रियेत अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया ३० मेपासून सुरू झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेत अर्जाचा भाग दोन भरण्याची प्रक्रिया निकालानंतर सुरू होणार होती. मात्र, प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झालेली नाही. ही नोंदणी सोमवारपर्यंत पूर्ण होणार आहे. शालेय शिक्षण विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अकरावी प्रवेशासाठी गेल्या वर्षीप्रमाणेच जागा उपलब्ध राहणार आहेत.

### पॉलिटेक्निकसाठी करा ३० पर्यंत नोंदणी

दहावीनंतरच्या प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनीअरिंग (पॉलिटेक्निक) प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत नोंदणी करता येणार आहे. या प्रवेशासाठी साधारण १ लाख जागा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करताना कागदपत्रांच्या छायांकित प्रतीही स्कॅन करून अपलोड कराव्या लागणार आहे. दहावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक पात्रता तपशीलामध्ये स्वत:चा आसनक्रमांक भरावा आणि शुल्क भरून अर्ज पूर्ण भरावेत. माहितीसाठी https://dte.maharashtra.gov.in या वेबसाइटवर संपर्क साधावा.

### आयटीआय प्रवेशाची प्रक्रिया सुरू

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयातर्फे (डीव्हीईटी) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील (आयटीआय) अभ्यासक्रमांची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया शुक्रवारपासून सुरू झाली आहे. यंदा सरकारी आणि खासगी आयटीआयमध्ये मिळून १ लाख ४९ हजार २६८ जागांवर प्रवेशप्रक्रिया राबवली जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या घराजवळील आयटीआयमध्ये दररोज सकाळी १० वाजता मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अर्ज ऑनलाइन किंवा आयटीआयमध्ये ऑफलाइन पद्धतीने भरता येईल. मात्र, अर्जात मोबाइल नंबर देणे अनिवार्य आहे.

My Pune Edition
Jun 18, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

**लोकमत**

### महाविद्यालयातील ५० टक्के रिक्त जागा भरणार : सामंत

**यूपीएससीची तयारी करणाऱ्यांसाठी महाराष्ट्र सदनात वसतिगृह**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यातील नॅक मूल्यांकन झालेल्या आणि आकृतिबंध तयार असलेल्या महाविद्यालयातील रिक्त असलेल्या जागांपैकी ५० टक्के जागा भरण्यास तत्त्वत: मंजुरी दिली आहे. यात ग्रंथपाल, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वरिष्ठ लिपिकांच्या जागांचा समावेश आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

विद्यापीठ उपकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी शिवनई येथे सावंत यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. ते म्हणाले, राज्यातील महाविद्यालयांच्या समस्या जाणून घेत त्या सोडवण्यासाठी गत आठवड्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी नॅक मूल्यांकन झालेले व आकृतिबंध तयार असलेल्या महाविद्यालयांना रिक्त जागांच्या ५० टक्के जागा भरण्यास मंजुरी दिली आहे. तसेच तासिका तत्त्वावर (सीएचबी) काम करणाऱ्या प्राध्यापकांना व शिक्षकांना यापुढे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार ३२ ते ३५ हजार रुपये वेतन दिले जाणार आहे. यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना दिल्लीत महाराष्ट्र सदनमध्ये मोफत वसतिगृह तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महिन्याभरात हे वसतिगृह विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात येणार आहे. या वसतिगृहात १०० विद्यार्थ्यांची व्यवस्था होणार आहे.

Pune Main
Page No. 4 Jun 18, 2022
Powered by: erelego.com

# अकरावीला प्रवेश नक्की

## उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या तुलनेत जागा अधिक; खरी चुरस महाविद्यालयांसाठी

**मिशन ॲडमिशन**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

यंदा दहावीचा निकाल सर्वाधिक लागला असला, तरी सर्वांना कोणत्याही अडचणींविना अकरावीत प्रवेश मिळेल, अशी चिन्हे आहेत. गेल्या तीन वर्षांपासून पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये ३५ हजारांपेक्षा अधिक जागा रिक्त राहात आहेत. यंदाही जवळपास एक लाख १० हजार जागा असून, विद्यार्थ्यांची संख्या ७६ हजारांच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

दहावीच्या निकालात यंदा ९६.९४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. २०२०च्या तुलनेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी १.६४ने वाढली आहे. पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्याचा समावेश असणाऱ्या पुणे विभागातून ९६.९६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विभागातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दोन लाख ५८ हजार ३१२ आहे. त्यात पुणे जिल्ह्यातील एक लाख २८ हजार ५६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील उत्तीर्णांची संख्या ७६ हजार ३६२ आहे. एकूण संख्या ९० हजारांच्या पुढे जाणार नाही. यातील काही विद्यार्थी आयटीआय आणि डिप्लोमा अभ्यासक्रमांकडे वळतात. ज्युनिअर कॉलेजांमध्ये साधारण एक लाख १३ हजार जागा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे उत्तीर्ण झालेल्या सर्वांनाच प्रवेश मिळण्याची शक्यता शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील नामांकित कॉलेजांमध्ये सायन्स, आर्ट्स, कॉमर्स शाखेच्या जागांत फारशी वाढ होत नसल्याने, या तिन्ही शाखांत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा राहणार आहे.




**७६ हजार ३६२**
पुणे-'पीसीएमसी'तून यंदा दहावी उत्तीर्ण विद्यार्थी संख्या

**१ लाख १३ हजार**
अकरावी प्रवेशासाठी उपलब्ध जागांची शक्यता

> " निकालाचे प्रमाण वाढले असले, तरी सर्वांना प्रवेश मिळेल. कोणीही प्रवेशापासून वंचित राहणार नाही, या दृष्टीने शिक्षण विभागाचे नियोजन सुरू आहे. प्रत्येकालाच त्याच्या आवडीचे कॉलेज मिळेल असे नाही.
> - मीना शेंडकर, सचिव, अकरावी प्रवेश नियंत्रण समिती

**अकरावी प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे...**

- विद्यार्थ्यांनी https://pune.11thadmission.org.in/ यावरून अर्ज भरावा.
- अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना सर्वसाधारण माहिती भरायची आहे.
- अर्जाचा भाग दोन भरण्याची प्रक्रिया येत्या मंगळवारपासून (२१ जून) सुरू होईल. त्यापूर्वी प्रवेशप्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध होईल.
- अर्जाच्या भाग दोनमध्ये प्रामुख्याने दहावीचे गुण आणि कॉलेजांचे पर्याय भरायचे आहेत.
- कॉलेजांचे पर्याय भरताना विद्यार्थ्यांनी, गेल्या वर्षीचे 'कट ऑफ' गुण तपासावे. आवडते कॉलेज पहिल्या क्रमांकावर भरून मग इतर पर्याय भरावेत.

Maharashtra Times 19.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

लोकमत

## पुणे विद्यापीठाच्या अंतिम सत्र परीक्षा आजपासून

### परीक्षा होणार ऑफलाइन : निकाल सप्टेंबरला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम सत्र परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. ही परीक्षा सोमवार (दि. २०) पासून सुरू होत असून, ऑगस्ट अखेरपर्यंत पूर्ण होईल. जवळपास सर्वच परीक्षांचे निकाल १५ सप्टेंबरपर्यंत जाहीर केले जाणार आहेत.

या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. दरम्यान अंतिम सत्र परीक्षा ऑनलाइन का ऑफलाइन याबाबत वादंग झाले होते. विद्यार्थी संघटनांनी अगोदर ऑनलाइन आणि नंतर ऑफलाइन एमसीक्यू अशा प्रकारच्या परीक्षांची मागणी केली होती.

विद्यापीठ प्रशासनाने ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिली.

पहिल्या टप्प्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि वास्तूशास्त्र शाखांची परीक्षा होणार आहे. त्यानंतर पुढील परीक्षा होतील.

परीक्षेच्या वेळा सकाळी ९ ते ११.३०, ९ ते १२ तसेच २ ते ४.३० व २ ते ५ अशा असतील. परीक्षांसाठी आत्तापर्यंत साडेतीन लाख विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. अद्याप अडीच लाख विद्यार्थ्यांचे परीक्षांसाठी अर्ज येणे अपेक्षित आहेत. विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन परीक्षेसाठी मागणी करण्यात येत होती.

**असे आहे परीक्षेचे स्वरुप**

- प्रत्येक पेपरला तासामागे पंधरा मिनिटांचा कालावधी वाढवून मिळणार
- नियमित सत्राच्या परीक्षेत दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार
- परीक्षांसाठी प्रश्नसंच विद्यार्थ्यांना उपलब्ध

Pune Main
Page No. 2 Jun 20, 2022
Powered by: erelego.com

## विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून; १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. १९ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा दि. २० जूनपासून प्रचलित पद्धतीने म्हणजेच ऑफलाइनद्वारे होणार आहेत. पहिल्याच दिवशी अभियांत्रिकी, फार्मसी व वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू होणार आहेत. विद्यापीठाने यापूर्वीच परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. आता करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असताना विद्यापीठाच्या परीक्षा लेखी पद्धतीने होत आहे. या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक तासामागे १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ वाढवून दिला जाणार आहे. नियमित सत्राच्या परीक्षेमधील दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थी ज्या पॅटर्नमध्ये परीक्षा देणार आहेत, त्याच पॅटर्नमधील प्रश्नसंच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिवसभरातील सलगच्या दोन पेपरमध्ये एक तासाचे अंतर ठेवण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

प्रभात Mon, 20 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/68726140

सकाळ

### विद्यापीठ : संलग्न महाविद्यालयांच्या लेखी परीक्षेला सुरुवात

## हुश्श.. पहिला पेपर 'सुरळीत'

**पुणे, ता. २० :** दोन वर्षांच्या खंडानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची सत्र परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येत आहे. सोमवारी (ता. २०) औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी आणि वास्तुशास्त्र या विद्याशाखांतील उन्हाळी सत्राचा पहिला पेपर सुरळीत पार पडला. विद्यापीठाच्यावतीने मागील दोन महिन्यांपासून यासंबंधीची तयारी करण्यात येत होती.

ऑनलाइन शिक्षणामुळे काही विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेला विरोध केला होता. शिक्षणी जर ऑनलाइन झाली तर परीक्षाही ऑनलाइन घ्यावी, असा आग्रह विद्यार्थ्यांनी धरला होता. मात्र, विद्यापीठाने ठाम भूमिका घेत मार्च २०२२ मध्येच ऑफलाईन परीक्षेची तयारी सुरू केली होती. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर म्हणाले, "नाशिक, पुणे आणि नगर तीनही जिल्ह्यात परीक्षा सुरळीत पार पडली आहे. प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी मिळालेला अतिरिक्त वेळ आणि दोन विषयांच्या परीक्षेतील अंतर, यामुळे विद्यार्थ्यांनाही निश्चित फायदा झाला आहे." उन्हाळी सत्रातील अंतर्गत परीक्षा ऑफलाइन अथवा लेखी पद्धतीने घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचा आवश्यक सराव झाला होता, अशी माहिती एआयएसएमएसएस फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अश्विनी माडगूळकर यांनी दिली.

> **कोरोनामुळे दोन वर्षे लेखी परीक्षा झाली नाही, त्यामुळे संपूर्ण यंत्रणा काहीशी सुस्तावलेली होती. परीक्षा विभागाने महाविद्यालय स्तरावर संपूर्ण तयारी करून घेतली होती. परीक्षा अधिकाऱ्यांपासून प्राचार्यांपर्यंत सर्वांच्या बैठका झाल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून ही लेखी परीक्षा सुरळीत पार पडत आहे.**
> **- डॉ. महेश काकडे,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> **परीक्षेसाठी प्रत्येक तासाला अधिकची १५ मिनिटे दिली होती. खरंतर पहिली दोन वर्षे ऑफलाइन परीक्षा दिल्यामुळे आम्हाला लेखी परीक्षेचा सराव होता. पहिला पेपर तरी सुरळीत पार पडला आहे.**
> **- प्रतीक्षा कुमकर,** विद्यार्थिनी, औषधनिर्माणशास्त्र

**आकडे बोलतात...**

- **सोमवारी परीक्षेत सहभागी विद्यार्थी :** ११,५०० (सुमारे)
- **एकूण पेपरची संख्या :** ३८
- **परीक्षा केंद्र :** **अभियांत्रिकी :** १२०, **औषधनिर्माणशास्त्र :** ६१, **वास्तुशास्त्र :** ३

Pune, Main
21/06/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# पुन्हा ऑनलाइन परीक्षेची मागणी, ऑफलाइन परीक्षेवर विद्यापीठ ठाम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची उन्हाळी सत्राची परीक्षा सुरू झालेली असताना आता विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून पुन्हा ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याची मागणी मंगळवारी करण्यात आली. त्यासाठी प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांना घेराव घालण्यात आला. मात्र डॉ. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून ऑफलाइन परीक्षेवर विद्यापीठ ठाम असल्याचे स्पष्ट केले.

करोना काळात विद्यापीठाने ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्या होत्या. तर करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने पुन्हा पारंपरिक पद्धतीने लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. विद्यापीठाच्या या निर्णयाला काही विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून विरोध करण्यात येत होता. पारंपरिक पद्धतीने परीक्षेचे नियोजन करताना प्रश्नसंच उपलब्ध करून देणे, परीक्षेदरम्यान सुटी देणे, अतिरिक्त वेळ देणे अशा सवलती देण्यात आल्या. त्यानुसार सोमवारपासून विद्यापीठाच्या परीक्षा सुरू झाल्या. मात्र ऑनलाइन पद्धतीनेच परीक्षा घेण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी मंगळवारी आंदोलन केले.

> ऑफलाइन परीक्षेसाठी विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना सवलती दिल्या आहेत. त्यामुळे ऑफलाइन परीक्षेच्या नियोजनात आता कोणताही बदल होणार नाही. परीक्षा प्रक्रिया पूर्ण करून लवकर निकाल जाहीर करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांशी चर्चा केली. ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यावर विद्यापीठ ठाम आहे.
>
> **– डॉ. संजीव सोनावणे,** प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

अभ्यासक्रम पूर्ण झालेला नाही, अध्यापन ऑनलाइन पद्धतीने झाले आहे, ऑफलाइन परीक्षेमुळे आमचे नुकसान होईल, विषय राहण्याची भीती आहे, असे विद्यार्थ्यांनी सांगत ऑनलाइन परीक्षा घेण्याची मागणी केली. प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

लोकसत्ता Wed, 22 June 2022 https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

सकाळ

### अकरावी प्रवेश : ऑनलाइन अर्जाचा भाग दोनही भरता येणार

# पसंतीक्रमाची प्रक्रिया लवकरच

EDU गाईड

**पुणे, ता. २१ :** इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतंर्गत ऑनलाइन अर्जाचा भाग दोन आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याचे सूतोवाच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने केले आहे. त्यामुळे अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील अर्जाचा भाग दोन आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्यासाठी उत्सुक असणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे.

अकरावी प्रवेशाची प्रक्रिया ही राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी धरून राबविण्यात येते. तसेच ही प्रक्रिया नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेपर्यंत सुरू असते आणि प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात नव्याने नोंदणी करण्याची सुविधा विद्यार्थ्यांसाठी खुली असते. त्यामुळे अन्य मंडळाचे निकाल जाहीर झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे, असे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीच्या सदस्य सचिव व विभागीय शिक्षण उपसंचालक मीना शेंडकर यांनी स्पष्ट केले. त्यामुळे राज्य मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर झाला असला तरीही अद्याप केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), आयसीएसई अशा विविध शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल लागलेला नाही. म्हणूनच या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

**महाविद्यालयांचे प्रमाणीकरण आवश्यक**

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या अकरावी प्रवेश प्रक्रियेतंर्गत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील जवळपास ६२ कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले अर्ज लॉक केलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण होऊ शकलेले नाही. या महाविद्यालयांची यादी प्रवेश समितीने संकेतस्थळावर अपलोड केली आहे. प्रमाणीकरण झाल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. त्यामुळे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी बुधवारी (ता. २२) दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज अपलोड करावेत; अन्यथा त्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही," अशी माहिती मीना शेंडकर यांनी दिली.**

**शिक्षण विभागामार्फत अकरावी प्रवेशाच्या पुढील वेळापत्रकासंदर्भातील प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविला आहे. त्याला बुधवारपर्यंत मान्यता मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे लवकरच ऑनलाइन प्रवेश अर्ज भाग दोन आणि पसंतीक्रम भरण्याच्या प्रक्रियेस सुरवात होईल.**
**- महेश पालकर,** संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

Pune; Main
22/06/2022 Page No. 2

२ | लोकसत्ता — राज्य

# अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अडथळा

### अनेक कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रमाणीकरण रखडले; २२ जूनपर्यंत मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अनेक कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रमाणीकरण रखडल्याने अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा पुढील टप्पा अद्याप सुरू झालेला नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महाविद्यालयांना अर्ज निश्चितीसाठी २२ जून रोजी दुपारी बारा वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली असून, या मुदतीत प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

शिक्षण विभागाने यंदा दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करून वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना नोंदणी करून प्रवेश अर्जाचा भाग एक भरण्याची मुभा देण्यात आली. तर पुढील टप्प्यात राज्य मंडळाने दहावीचा निकाल जाहीर केल्यावर प्रवेश अर्जाचा भाग दोन भरणे, महाविद्यालयांचे



पसंतीक्रम नोंदवण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र दहावीचा निकाल जाहीर होऊनही प्रवेश अर्जाचा भाग दोन भरणे आणि अन्य प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे पालक विद्यार्थ्यांकडून अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याबाबत प्रश्न विचारण्यात येत आहेत.

या पार्श्वभूमीवर कनिष्ठ महाविद्यालयांना प्रमाणीकरणासाठी २२ जूनची मुदत देण्यात आल्याची माहिती केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ साठी नोंदणी करणे, माहिती अद्ययावत करणे, प्रमाणीकरण करून घेणे अनिवार्य आहे. मात्र अद्याप अनेक महाविद्यालयांनी अर्ज अंतिम केलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण होऊ शकलेले नाही. तसेच ज्या महाविद्यालयांनी सर्व आदेश अपलोड केलेले नाहीत, त्यांना पाठवण्यात आलेल्या त्रुटींच्या संदेशानुसार त्रुटी पूर्तता केलेली नाही. प्रमाणीकरण झाल्याशिवाय कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव संकेतस्थळावर दिसणार नाही, तसेच त्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed. 22 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68760863

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

लोकमत

# महाविद्यालयांतील शिल्लक अनामत रकमेचा अहवाल द्या

## संचालनालयाचे विभागीय सहसंचालकांना आदेश : पुणे विभागाकडून कार्यवाही नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम घेतलेल्या महाविद्यालयांनी त्यांच्याकडे शिल्लक एकूण रकमेपैकी ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्यात यावी, असे निर्देश आहेत. याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्याचे उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालकांनी सर्व विभागीय सहसंचालकांना दिले होते. मात्र, पुणे विभागाच्या सहसंचालकांकडून यावर अद्याप काही कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत 'कॉप्स' संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे.

महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय, वसतिगृह व खानावळ शुल्क, शैक्षणिक साहित्य, आदी उपलब्ध करणे, वैद्यकीय सुविधा, कमवा व शिका योजनेसाठी निधी उपलब्ध करणे या ४ घटकांवर शिल्लक अनामत रकमेतून खर्च करण्यात यावा असे म्हटले आहे.

### पुणे विभाग काढणार परिपत्रक

याबाबत महाविद्यालयांकडे तपासणी करून त्याचा अभिप्राय संचालनालयास सादर करण्याचे आदेश राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना दिले आहेत. याबाबत पुणे विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांना विचारले असता त्यांनी याबाबत परिपत्रक काढले नसल्याचे सांगत लवकरच त्याबाबत परिपत्रक काढण्यात येईल असे सांगितले.

प्रवेश प्रक्रियेसाठी अनामत रक्कम घेतली जाते. शिक्षण पूर्ण करून विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयातून बाहेर पडतो, त्यावेळी ही रक्कम त्या विद्यार्थ्यांना तत्काळ परत देणे अपेक्षित आहे. काही वेळा विद्यार्थ्यांना ही रक्कम परत दिली जात नसल्यामुळे ती महाविद्यालयाकडे पडून राहते. त्या रकमेचा विनियोग कसा करावा याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने २०१४ मध्ये परिपत्रक काढले होते.

अनामत रकमेचा विनियोग गरजू ईबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करावा असे पत्रात म्हटले होते. ईबीसी विद्यार्थी (आर्थिक दुर्बल घटक) पैशांअभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये त्यामागे हा उद्देश आहे. ही रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह

राज्यातील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना परत न केलेली एकूण अनामत रक्कम १४ कोटी आहे. एकूण अनामत रकमेच्या ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याबाबतचे परिपत्रक काढून त्याच्या अंमलबजावणीची मागणी कॉप्स विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत व उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्याकडे केली होती.

Pune Main
Page No. 5 Jun 23, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# 'सीबीएसई', 'आयसीएसई'च्या विद्यार्थ्यांचे प्रथम वर्षाचे प्रवेश कधी?

## निकाल उशिरा लागणार असल्याने पेच : पालक, विद्यार्थी देखील चिंतेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाराष्ट्रात राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल लागला. प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रियादेखील सुरू झाली. मात्र सीबीएसई, आयसीएसई व आयबी बोर्डांच्या बारावीच्या परीक्षेचा निकाल अद्याप लागला नाही. त्यातच प्रवेश प्रक्रिया बंद होण्याची शक्यता आहे. विद्यापीठांकडून याबाबत काही मार्गदर्शक सूचनाही आलेल्या नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार की नाही या चिंतेने पुण्यासह राज्यभरातील पालक व विद्यार्थी हवालदिल झाले आहेत.

सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सीबीएसई), इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन (आयसीएसई) व इंटरनॅशनल बॅचलरेट (आयबी) हे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बोर्ड आहेत. या बोर्डांचे बारावीचे निकाल दरवर्षी मे महिन्यातच लागतात. कोरोनामुळे यंदा या बोर्डातील इयत्ता बारावीच्या परीक्षाच १५ जूनच्या आसपास संपल्या. त्यामुळे त्यांचा निकाल उशिरा म्हणजेच जुलैमध्ये लागेल. त्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होईल.

याउलट राज्य शिक्षण मंडळाच्या (एसएससी बोर्ड) इयत्ता दहावीचा निकाल ८ जूनला लागला. तेव्हापासून महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. लाखो विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी फॉर्म भरले आहेत. त्यांची प्रवेशाची पहिली मेरिट लिस्ट ५ जुलैला लागेल. त्यानंतर हे प्रवेश प्रक्रिया पूर्ण होऊन जाईल. सर्व जागाही भरल्या जातील. इतर बोर्डांचे विद्यार्थी त्यापासून वंचित राहू शकतात, अशी चिंता पालकांना सतावत आहे.



### पालक झिजवताहेत महाविद्यालयांच्या पायऱ्या

प्रवेश प्रक्रियेमध्ये आपल्या मुलांना प्रवेश मिळेल की नाही, या चिंतेने या बोर्डांचे पालक पुणे व राज्यातील नामांकित महाविद्यालयांच्या पायऱ्या झिजवत आहेत. तसेच ई-मेल करून मुलांना प्रवेश देण्याबाबत सातत्याने चौकशी करत आहेत. मात्र, त्याबाबत अजून निर्णयच न झाल्याने महाविद्यालयांनाही त्यांना काय उत्तर द्यावे, हे कळत नाही.

कला, विज्ञान, व्यावसायिक या कोर्सेससाठी आमच्याकडे जवळपास दीड हजार जागा असून, आतापर्यंत ८ हजार अर्ज आले आहेत. एकूण जागांपैकी २५ टक्के जागांवर इतर बोर्डांचे विद्यार्थी असतात; मात्र त्यांचा अजून निकालच लागला नसल्याने त्यांच्या प्रवेशाबाबत शासनाच्या निर्णयाची आम्ही वाट पाहत आहोत.

- डॉ. नितीन कुलकर्णी, उपप्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय

माझ्या पाल्याने सीबीएसई बोर्डात बारावीची परीक्षा दिली आहे. निकाल जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात लागेल, अशी शक्यता आहे. याउलट प्रथम वर्षाचा ऑनलाईन फॉर्म भरण्याची तारीख २ जूनला संपत आहे आणि निकाल लागल्याशिवाय अर्ज भरता येत नाही. सीबीएसईचा निकाल लागल्यानंतरच फॉर्म भरण्याची मुदत वाढवून देण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

- पूर्वा गायकवाड, खेरा, पालक

सीबीएसई, आयसीएसई बोर्डा निकाल लागल्यानंतर ते विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत, याबाबत विद्यार्थ्यांच्या सीट वाढविणे किंवा त्यांची मुदत वाढवून देणे हा निर्णय घेण्यात येईल.

- प्रफुल्ल पवार, कुलसचिव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापी

Pune Main
Page No. 2 Jun 24, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

लोकमत

# पुणे विद्यापीठातील कुलगुरु निवड प्रक्रिया लांबली

### सरकारच्या विरोधात न्यायालयात याचिका

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेला अद्याप सुरुवात झालेली नाही. याप्रकरणी राज्य सरकारच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी आणि सिनेट सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी ही याचिका केली आहे. नव्या कुलगुरूंची निवड होईपर्यंत विद्यापीठाचा कारभार प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे सोपवलेला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १७ मे रोजी निवृत्त झाले. त्यांच्या ठिकाणी नव्या कुलगुरूंची निवड करण्यासाठी राज्यपालांकडून समिती स्थापन होणे गरजेचे असते. मात्र, अजूनही समितीची स्थापना केली नाही. या समितीमध्ये पुणे विद्यापीठ, राज्यपाल आणि सरकारकडून प्रत्येकी एक सदस्य असतो. कुलगुरू निवड प्रक्रियेला विलंब होत आहे. विद्यापीठ कायद्यातील सुधारणांमुळे राज्यपाल आणि सरकार यांच्यात वाद निर्माण झाला असून, त्यामुळे राज्य सरकारकडून सदस्याची नेमणूक करण्यात येत नसल्याचे समोर आले आहे, तर समितीसाठी आवश्यक सदस्य उपलब्ध होत नसल्याने राज्यपाल कार्यालयाकडून समिती जाहीर करण्यात अडचणी येत आहेत, असे दिसून येत आहे. याचिकाकर्त्याने याचिकेत म्हटले आहे की, कुलगुरू निवड प्रक्रिया सहा महिन्यांपासून रखडली आहे. दरम्यान, सरकारी अनास्थेमुळे ही प्रक्रिया अद्याप सुरू होऊ शकली नाही.

### कायद्याची अंमलबजावणी नाही...

विद्यमान विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार कुलगुरु निवड प्रक्रिया कुलगुरु निवृत्ती होण्याच्या सहा महिन्यांपूर्वी सुरु होणे अपेक्षित असते. मात्र, सरकार विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी करत नाही. कायद्याची अंमलबाजावणी करणे ही सरकारची कायदेशीर व घटनात्मक जबाबदारी आहे. त्यामुळे कायद्याप्रमाणे कुलगुरु नियुक्ती प्रक्रिया सुरु न करण्याच्या विरोधात जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

Pune Main
Page No. 2 Jun 24, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# प्रवेश परीक्षांच्या तारखा विद्यापीठाकडून जाहीर

**पुणे, ता. २३** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांच्या प्रवेश परीक्षांची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेश परीक्षांच्या तारखाही आता विद्यापीठाने जाहीर केल्या असून, २१ ते २४ जुलै दरम्यान या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत.

पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेल्या किंवा शेवटच्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातील विविध विभागांची प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहे. पदवी, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बहुपर्यायी पद्धतीतील ही परीक्षा १०० गुणांची असून, ऑनलाइन पद्धतीने परीक्षा पार पडेल.

प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. पदवी, पदव्युत्तर पदविका आणि पदव्युत्तर पदवीसाठी हे अर्ज मागविण्यात येत आहे. दोन तासांची ही परीक्षा १०० गुणांची असेल. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश परीक्षेसंबंधीची अधिक माहिती देण्यात आली आहे.

### महत्त्वाच्या तारखा

- अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत : १२ जुलै
- विलंब शुल्कासहित : १७ जुलै
- परीक्षेचा कालावधी : २१ ते २४ जुलै

संकेतस्थळ : https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx

Pune, Main
24/06/2022 Page No. 5

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# सीबीएसई, आयसीएसईच्या विद्यार्थ्यांसाठी जागा राखीव

### प्रथम वर्ष प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय

**पुणे** : राज्य मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केल्यावर पदवीपूर्व स्तरावरील प्रथम वर्ष प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), कौन्सिल ऑफ इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशनकडून (आयसीएसई) बारावीच्या परीक्षांचे निकाल जाहीर होणे बाकी आहे. त्यामुळे संबंधित मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत दहा टक्के जागा राखीव ठेवण्याचा, गरजेनुसार महाविद्यालयांना दहा टक्क्यांपर्यंत जागा वाढवून देण्याचा निर्णय घेतला आहे.

दरवर्षी सीबीएसई, आयसीएसईच्या निकालानंतर राज्य मंडळाचे निकाल जाहीर होतात. मात्र यंदा सीबीएसई, आयसीएसईने मूल्यमापन पद्धतीमध्ये बदल केल्याने या मंडळांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. तसेच निकाल कधीपर्यंत जाहीर होणार या बाबत काहीच संकेतही देण्यात आलेले नाहीत. मात्र विद्यापीठ-महाविद्यालयांतील पदवीपूर्व स्तरावरील अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याने सीबीएसई, आयसीएसईतून बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रथम वर्ष प्रवेशाचे काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा पहिल्यांदाच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे म्हणाले, की गेल्या काही वर्षांतील प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेतला असता त्यात सीबीएसई, आयसीएसई आदी मंडळांच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दहा टक्क्यांच्या घरात आहे. तसेच काही विद्यार्थी स्वायत्त महाविद्यालयांमध्येही प्रवेश घेतात. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांतील दहा टक्के जागा या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातील. तसेच या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या गरजेनुसार दहा टक्क्यांपर्यंत अतिरिक्त जागा महाविद्यालयांच्या मागणीनुसार देण्यास मान्यता दिली जाईल. सीबीएसई, आयसीएसईच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रियेत संधी मिळण्याची गरज असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

### स्वायत्त महाविद्यालयांचे वेगवेगळे पर्याय

सीबीएसई, आयसीएसईचा निकाल आल्यावर एकत्र गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येईल. त्यामुळे महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज थोडे उशिरा सुरू होईल, असे सिम्बायोसिस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हृषीकेश सोमण यांनी सांगितले. राज्य मंडळाच्या बारावीच्या निकालानंतर प्रथम वर्ष पदवीची प्रवेश प्रक्रिया सुरू केली असली, तरी प्रवेश प्रक्रिया सुरूच राहील. सध्या केवळ प्रवेश अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सीबीएसई, आयसीएसईकडून बारावीचा निकाल जाहीर झाल्यावर त्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळेल, असे स. प. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सविता दातार यांनी नमूद केले.

लोकसत्ता Fri, 24 June 2022 https://epaper.loksatta.com/c/

# आता पहिली ते बारावीसाठी १०० टक्के पाठ्यक्रम लागू

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. २४** - गेल्या दोन वर्षांत करोनाचा प्रादुर्भाव विचारात घेऊन पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम कपात करण्यात आला होता. आता मात्र यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इयत्ता पहिली ते बारावीसाठी १०० टक्के अभ्यासक्रम लागू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी याबाबतची माहिती दिली. मार्च २०२० पासून करोनामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा ऑनलाइन स्वरूपामध्ये सुरू होत्या. तसेच प्रत्यक्ष शाळेत अध्ययन-अध्यापन मर्यादित स्वरूपात होत असल्याने या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांवरील अध्ययनाचा ताण कमी व्हावा यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता पहिली ते १२ वीचा पाठ्यक्रम २५ टक्के कमी करण्यात आला होता. तसेच ही परिस्थिती कायम राहिल्याने कमी केलेला पाठ्यक्रम २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठीदेखील कायम ठेवण्यात आला होता. दरम्यान, आता करोनाचा प्रादुर्भाव कमी होत आहे. तसेच शाळाही पूर्ण क्षमतेने आणि ऑफलाइन पद्धतीने सुरू झाल्या आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच पूर्ण अभ्यासक्रमांवर यापुढे अध्ययन-अध्यापन होणार आहे.

प्रभात Sat, 25 June 2022 https://epaper.eprabhat.net/c/688165

# News Paper Clippings During June 2022

## Section: Education

सामना

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स



*राष्ट्रीय* शैक्षणिक धोरण अंमलबजावणी संदर्भातील शैक्षणिक व प्रशासकीय बाबींशी कार्यवाही करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने समिती स्थापन केली आहे. शिक्षण आयुक्त हे टास्क फोर्सचे अध्यक्ष आहेत. याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील शिफारशीनुसार टप्प्याटप्प्याने कार्यवाही सुरू असून याअंतर्गत राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हास्तरावर काम केले जाणार आहे. यासाठी २९७ कार्ये (टास्क) अंतिम करण्यात आली आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी (आयुक्त) शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीत माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाचे सहसंचालक, पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे विशेष अधिकारी आदींचा समावेश आहे.

सामना

Pune Edition
Jun 25, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

पुढारी

# अकरावी प्रवेशाचे नियोजन फसले!

## निकाल लागूनही भाग दोनचे वेळापत्रक जाहीर होईना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यात अकरावी प्रवेशाचा भाग एक भरण्यास ३० मेपासून सुरुवात करण्यात आली. त्याला आता महिना होईल, तरीदेखील अकरावी प्रवेशाचा भाग दोन भरण्यास सुरुवात झालेली नाही. त्यातच यंदा भाग एकसाठी अपेक्षित अर्जदेखील आलेले नाहीत. त्यामुळे अकरावी प्रवेशाचे नियोजन फसले असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

पुढारी वॉच

राज्यातील पुणे - पिंपरी चिंचवड, मुंबई, नागपूर, अमरावती, नाशिक या महापालिका क्षेत्रांत कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे, तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये ऑफलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी प्रवेश प्रक्रियेत अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया ३० मेपासून सुरू झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेत अर्जाचा भाग दोन भरण्याची प्रक्रिया दहावीच्या निकालानंतर सुरू होणार होती. मात्र, प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी भाग दोनचे वेळापत्रक जाहीर करण्यास अडचण येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे पिंपरी-चिंचवड परिसरात प्रवेशासाठी आत्तापर्यंत ७८ हजार २१६ अर्ज भरण्यात आले आहे. त्यापैकी ५२ हजार ५५४ अर्ज लॉक करण्यात आले आहेत. तसेच २९ हजार ३४५ अर्ज ऑटो व्हेरीफाईड करण्यात आले आहेत, तर १७ हजार ६६३ अर्जांची पडताळणी केंद्रावर तपासणी पूर्ण झाली आहे.

### कागदपत्रांची पूर्तता नाही...




पुणे आणि पिंपरी चिंचवड क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ साठी नोंदणी करणे, माहिती अद्ययावत करणे, प्रमाणीकरण करून घेणे अनिवार्य आहे. मात्र शहरातील अनेक महाविद्यालयांनी अर्ज अंतिम केलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण होऊ शकलेले नाही. तसेच १८ महाविद्यालयांनी सर्व आदेश अपलोड केलेले नाहीत, त्यांना पाठवण्यात आलेल्या त्रुटींच्या संदेशानुसार त्रुटी पूर्तता केलेली नाही. प्रमाणीकरण झाल्याशिवाय कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव संकेतस्थळावर दिसणार नाही, तसेच त्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

### प्रवेशाला अडचण...

दरवर्षी सीबीएसई, आयसीएसई मंडळाचे दहावीचे निकाल अगोदर जाहीर होतात. त्यानंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर होतो. यंदा मात्र राज्य मंडळाचा निकाल अगोदर जाहीर झाला आहे. याचा थेट परिणाम अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यावर झाला आहे.

### वेळापत्रक नेमके कधी...

अकरावी प्रवेशाचा भाग दोन भरण्याबरोबरच प्रवेशाच्या पहिल्या यादीचे वेळापत्रक २२ जूनला जाहीर केले जाईल, असे उपसंचालक कार्यालयाकडून सांगण्यात आले होते. त्यासाठी मंत्रालय स्तरावर बैठक होणार असल्याचेदेखील स्पष्ट करण्यात आले होते, परंतु राज्यात सध्या महाविकास आघाडी सरकारचा राजकीय पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे शालेय शिक्षण मंत्र्यांकडून लक्ष दिले जात नसल्यामुळे अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक लांबणीवर पडले असल्याचे शिक्षण विभागातील सूत्रांनी सांगितले आहे.

My Pune Edition
Jun 27, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# विषयनिहाय आरक्षणाने प्राध्यापक भरती

### संवर्गनिहाय आरक्षण लागू होण्यापूर्वीची पदे जुन्या पद्धतीनेच भरणार

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** राज्यातील अकृषक विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीत संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याचा निर्णय उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने एप्रिल २०२२ मध्ये घेतला होता. मात्र, संवर्गनिहाय आरक्षणामुळे बहुजन समाजातील नेट, सेट पात्रताधारकांसाठी प्राध्यापक भरतीची दारे बंद झाल्याचा आरोप केला जात होता. त्यामुळे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्राध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम-२०२१ लागू होण्यापूर्वी सुरू असलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्वीच्याच प्रचलित पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.

केंद्रीय शिक्षण संस्था (शिक्षक संवर्ग आरक्षण) २०१९ अन्वये केंद्रीय विद्यापीठे आणि केंद्रीय शैक्षणिक संस्थांतील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण लागू आहे. राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या पदांसाठीही हे आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्यातील प्राध्यापकांच्या २ हजार ८८ पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली होती. मात्र, संवर्गनिहाय आरक्षणामध्ये असलेल्या त्रुटींमुळे याला काही प्रवर्गांचा विरोध होत होता.

संवर्गनिहाय आरक्षणापूर्वी प्राध्यापक भरतीकरिता विषयनिहाय आरक्षण लागू होते. आता संवर्गनिहाय आरक्षणामध्ये संपूर्ण महाविद्यालयाला एक गट मानून रिक्त पदांना आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षण लावले जाणार आहे. संवर्गनिहाय आरक्षण लागू झाल्यामुळे बहुजन समाजातील नेट, सेट पात्रताधारकांना प्राध्यापक भरतीची दारे बंद होण्याची भीती व्यक्त केली जात होती. राज्यात प्राध्यापक भरती बंद आहे. तसेच अनेक अतिरिक्त प्रवर्गांचा प्रचंड अनुशेष विषयनिहाय आरक्षणानुसार शिल्लक असताना संवर्गनिहाय आरक्षणाचा घाट घातला जात असल्याने याला विरोध होता. परिणामी, आता राज्य शासनाने यात सुधारणा करून २४ जूनला नवीन पत्र जाहीर केले. त्यानुसार महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियम २०२१ लागू होण्यापूर्वी सुरू असलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्वीच्या प्रचलित पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे नवीन धोरण लागू होण्यापूर्वीची रिक्त पदे आता विषयनिहाय आरक्षणाने भरली जाणार आहेत.

**का होता विरोध?** केंद्रीय शिक्षण संस्था (शिक्षक संवर्ग आरक्षण) २०१९ अन्वये केंद्रीय विद्यापीठे आणि केंद्रीय शैक्षणिक संस्थांतील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात आले. यानुसार प्राध्यापक भरतीसाठी २०० बिंदू नामावलीचा वापर केला जातो. हा कायदा केवळ केंद्रीय विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांना लागू आहे. देशातील अनेक राज्यात अजूनही विषयनिहाय आरक्षणानुसारच प्राध्यापक भरती सुरू आहे. मग महाराष्ट्रात संवर्गनिहाय आरक्षणाचा अट्टहास का, असा प्रश्न प्राध्यापक सेनेने उपस्थित केला होता.

लोकसत्ता Mon, 27 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68842622

---

लोकमत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाकडून विविध कोर्सेस जाहीर

# आता विद्यापीठ कॅम्पसमधून करा 'ग्रॅज्युएशन'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कोर्सेस करण्यासाठी यापूर्वी किमान ग्रॅज्युएशन होणे आवश्यक होते. विद्यापीठाने आता चक्क बारावीनंतरच कॅम्पसमधून अनेक पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे कमी खर्चात दर्जेदार शिक्षण घेऊन उत्तम करिअर घडवता येणार आहे. इयत्ता बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने बारावीनंतर विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेअंतर्गत करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत.



### जुलै महिन्यात होणार प्रवेश परीक्षा

सर्व अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती, त्यासाठीची प्रवेश परीक्षा, प्रवेश क्षमता, संबंधित विभाग आदींची माहिती विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. सध्या विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, जुलै महिन्यात प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

### यात घेता येणार शिक्षण

- इंटरडिसिप्लिनरी स्कूल ऑफ सायन्स अंतर्गत बीएस्सी, ब्लेंडेड इन फिजिक्स, केमिस्ट्री, एन्व्हायर्नमेंटल सायन्स, अर्थ सायन्स हे अभ्यासक्रम आहेत. यासाठी विद्यापीठाने ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी करारही केला आहे.
- बायोटेक्नॉलॉजी विभागातून ५ वर्षांचा एकत्रित एमएस्सी बायोटेक्नॉलॉजी (आयबीबी विभाग) हा अभ्यासक्रम आहे. यामधून तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित 'बीएस्सी इन थ्री डी ॲनिमेशन ॲंड व्हीएफएक्स' हा पदवी अभ्यासक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रमही आहे.
- 'बीटेक इन एव्हिएशन' हा पदवी अभ्यासक्रमही विद्यापीठात आहे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये प्रोडक्शन ग्राफिक डिझाइन, प्रोडक्शन यूआय डिझाइन, प्रोफेशनल व्हिज्युअल इफेक्ट आदींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

Pune Main
Page No. 2 Jun 27, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education



# SPPU exam trend: Students need extra supplements, write till end

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The semester examinations of the Savitribai Phule Pune University (SPPU) are currently underway, however, an interesting trend is seen among students. This year, students are taking maximum time to write papers and attaching more supplements with the answer sheet.

With engineering, architecture and pharmacy exams having started initially, it is seen that pharmacy students are attaching the maximum number of supplements which is seven to eight.

Mahesh Kakade, SPPU examination and evaluation department head, said, "Currently, the exams of three streams are being conducted and from July 5, exams of post-graduate courses, too, will start. We are seeing a good trend this time which is that maximum number of students are using the entire time given for the examination, including the extra 15 minutes. This is unusual students complete their papers early."

"In the ongoing exams, the use of supplements is also high. The pharmacy course students are attaching the highest number of supplements at least seven to eight. This was not the case earlier," Kakade said.

The students are given the main answer sheet of 24 pages with each supplement containing four pages. The exams are being held in four sessions daily from 9 to 11.30 am, 9 am to 12 noon, 2 to 4.30 pm and 2 to 5 pm.

"Till now, around 3 lakh students have appeared for 270 subjects for the semester exams from engineering, pharmacy and architecture," Kakade said.

Meanwhile, students too are happy to appear for the offline examinations being held. Shraddha Manjre, a pharmacy student, said, "We lost writing practice during Covid, and had hence we practised to write in limited time. This has helped us now to appear for the actual papers and it is normal to attach supplements to the main answer sheet as we have to elaborate the answers, score good marks."

A senior professor from a pharmacy college requesting anonymity said, "We have given instructions to our students to fill up the answer sheet and not skip any of the questions. We have asked them to complete the entire paper as it will be beneficial for scoring marks."

# 30k register for senate elections

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** Even as the tenure of former senate members of the Savitribai Phule Pune University (SPPU) has ended, the process for the election of new senate members has been started by the SPPU administration.

Till now, 30,000 people have registered for participating in the election, and the last date for registration is July 3. These elections will be held in Pune, Nashik and Ahmednagar.

There are three types of senate members in SPPU: first, the office-bearers of the SPPU including major posts such as vice-chancellor, deans of various streams and registrar; second, the elected members; and third, members nominated by various government agencies.

> THERE ARE 3 TYPES OF SENATE MEMBERS: OFFICE BEARERS, THE ELECTED MEMBERS AND NOMINATED BY GOVT AGENCIES

Professor Prafulla Pawar, SPPU registrar, said, "For the senate election process, around 30,000 people have registered so far and the last date for registration is July 3. Once the voters' registration is completed, the voters' lists will be made and then the contestants who have nominated themselves for the election will begin campaigning. After which, the election schedule will be declared by the university. So our appeal to all the students and those who have graduated from the SPPU is to register for the senate election.

While the entire process of senate elections right from conducting the election to declaring its results will be carried out till November 30."

For registration as a voter for these SPPU senate elections, people who have graduated from the SPPU in the past can register themselves on the official website of the university.

For registration, one has to upload his/her university graduate certificate, Aadhaar card, signature scan copy and photograph in google form format.

Hindustan Times 30.6.2022

# *News Paper Clippings During June 2022*

## Section: Education

# पीएचडीसाठी दुप्पट शुल्कवाढ

## शुल्क कमी करण्याची संशोधक विद्यार्थ्यांची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएचडी अभ्यासक्रमासाठी दुप्पट शुल्कवाढ लागू केली आहे. त्यामुळे २०२०मधील पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांच्या तुलनेत आता जवळपास दुप्पट शुल्क भरावे लागत आहे. करोना काळात बिघडलेली आर्थिक परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. त्यामुळे ही शुल्कवाढ कमी करण्याची मागणी संशोधक विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठाने केलेल्या शुल्कवाढीनुसार पीएचडीचे वार्षिक शुल्क जवळपास साडेतीन हजार रुपये; तर कोर्सवर्कसाठीचे शुल्क पाच हजार रुपयांनी वाढवण्यात आले आहे. त्यामुळे २०२०पर्यंत असलेले साडेतेरा हजार रुपये शुल्क आता सुमारे २६ हजार रुपये झाले आहे. पीएचडीच्या शुल्कात जिमखाना, एनएसएस यासाठीचेही शुल्क समाविष्ट केले आहे. विद्यापीठाने केलेली शुल्कवाढ अवाजवी आहे. या संदर्भात प्र-कुलगुरूंची भेट घेऊन शुल्क पूर्ववत करण्याचे निवेदन दिल्याची माहिती संशोधक विद्यार्थी तुषार पाटील निंभोरेकर यांनी दिली. पीएचडी अभ्यासक्रमासाठीचे शुल्क करोनापूर्वी वाढवण्यात आले होते. करोनाकाळात ही शुल्कवाढ स्थगित करण्यात आली होती. ती आता लागू करण्यात आली. मात्र, सध्याची परिस्थितीची पाहता ही शुल्कवाढ कमी करता येईल का, या संदर्भात अधिकार मंडळात चर्चा करुन तात्पुरती पुनर्रचना करण्याचा निर्णय घेता येईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

> "करोनाकाळात विद्यार्थी आणि पालकांना आर्थिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. आर्थिक परिस्थिती सुधारत असताना, विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांना शुल्कवाढ सहन करावी लागत आहे. या संशोधक विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आहेत. त्यामुळे विद्यापीठाने शुल्क पूर्वीप्रमाणे करावे.
>
> - कुलदीप आंबेकर, स्टुडंट हेल्पिंग हँड



Maharashtra Times 30.6.2022

# News Paper Clippings During June 2022

## Section: Career

सकाळ

अपडेट

विद्यावाचस्पती विद्यानंद

# फॅशन डिझाईनच्या क्षेत्रातील ग्लॅमर



भारतीय फॅशनमध्ये हजारो वर्षांचा पारंपारिक इतिहास आहे. प्रत्येक भागामध्ये विविध प्रकारचे पारंपारिक कपडे आणि वेगळ्या पद्धती आहेत. सद्य:स्थितीत आधुनिक फॅशन उद्योग जगत सर्वत्र वेगाने वाढत आहे. आंतरराष्ट्रीय विकासाशी फॅशन उद्योग संबंधित आहे. फॅशन डिझाईनिंग हे दर्जेदार शिक्षण निवडून आपण आपल्या उत्कटतेस समृद्ध कारकिर्दीत रूपांतर करू शकता. दूरदृष्टी असण्याव्यतिरिक्त, फॅशन डिझायनर बनण्यासाठी फॅशन इच्छुकांकडे आवश्यक इतरही कौशल्ये लागतात. फॅशन करण्याच्या कलांचे महत्त्वपूर्ण कौशल्य अंगी असणं आवश्यक असतं.

## आवश्यक कौशल्ये...

१ **व्यवसाय बांधणी :** आपल्या संभाव्य निर्णयांचे मूल्य आणि लाभांची गणना करण्यासाठी आपल्यात उत्कृष्ट व्यवसाय कौशल्ये असावे.

२ **संवाद :** चांगले संभाषण कौशल्य तुमचा आत्मविश्वास वाढवते आणि अपेक्षित अंतिम परिणामासाठी ते मदत करते.

३ **स्पर्धात्मकता :** जागतिक स्तरावर फॅशन उद्योग सतत विकसित होत आहे, त्यास त्याच्या व्यावसायिकांसह उत्क्रांत होणं आवश्यक असतं. हे आपल्याला जागतिक आव्हानं आणि स्पर्धा यासाठी खुलं असणं आवश्यक असतं. डिझायनर म्हणून आपल्यात स्पर्धात्मकतेची भावना असावी.

४ **सर्जनशीलता आणि निरीक्षण :** आपण चालवत असलेल्या उद्योगांच्या प्रवाहातील निरीक्षक असणं आणि आपल्या डिझाईनमध्ये नाविण्यपुर्णता आणणं आवश्यक असतं. जगभरांतील डिझाइनरकडून अनेक व्यावसायिक बाबी जाणून घ्याव्यात. त्यांच्या व्यवसायाचं वेगळेपण, त्यांची पार्श्वभूमी, त्यांची डिझाईन शैली, त्यांनी शिक्षण घेतलेली संस्था, त्यांची विविध कौशल्य अशा अनेक बाबींचा विश्लेषणात्मक अभ्यास करणं उपयुक्त ठरत असतं.

५ **रेखांकन :** कागदावर आपले डिझाइन किंवा विचार सादर करता यावं. स्टोरीबोर्ड आणि उत्पादन श्रेणी कशी तयार करावी? ते जाणून घ्यावं. सामग्रीचा स्रोत/उपलब्धता कुठे आणि कशी आहे? हे माहीत करून घेणं महत्त्वाचं असतं. सर्व प्रकारच्या कापडांचा वापर करून शिवणकाम करण्यासाठी त्याचं यांत्रिक कौशल्य अवगत करून घेणं जरुरीचं असतं.

साहित्य आणि रंगांच्या निवडीसाठी दृष्टिकोन चांगला असावा. फॅशन डिझाइन करिअरची सुरुवात करण्यासाठी प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेणं हा महत्त्वाचा टप्पा आहे. अनुभवी फॅशन डिझायनरकडून शिकण्याची संधी मिळण्यासाठी अपरेंटिसिपीस आणि इंटर्नशिपमध्ये अनेक कौशल्य विकसित करता येतात. पुरुष आणि महिला दोन्ही फॅशन आणि डिझायनर कपडे परिधान करणं पसंत करत आहेत. त्यामुळे अनेक नवीन संस्था उदयास आल्या आहेत. त्या ठिकाणी फॅब्रिक आणि पोशाख डिझाइन आणि तंत्रज्ञानातील प्रतिभा आणि सर्जनशीलता वाढविण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना शिकवलं जातं.

## रोजगाराच्या संधी

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून, फॅशन डिझायनिंग विद्यार्थ्यांना मोठ्या ब्रॅण्ड अंतर्गत काम करण्यास सांगितले जाते आणि फॅशनच्या मूलभूत गोष्टी जाणून घेण्यासाठी आणि स्वत:च्या संकल्पनेनुसार फॅशनच्या वस्तू विकसित करण्यासाठी डिझाइनर्सना साहाय्य केले जाते. ते करिअरचे अनेक मार्ग खुले करते. फॅशन डिझायनिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना वेशभूषा डिझायनर, मर्कंटायझर, शिक्षण, टेक्स्टाईल उत्पादन, फॅशन प्रकाशक, फॅशन प्रोग्रॅम उत्पादक, चित्रपट निर्मिती विभाग, फॅशन डिझायनर, फॅशन स्टायलिस्ट, स्टोअर व्यवस्थापक, फॅशन सल्लागार, व्हिज्युअल मर्चंडाइझर, उत्पादन व्यवस्थापक, गुणवत्ता नियंत्रक, फॅशन छायाचित्रकार इत्यादी अनेक क्षेत्रांत कामाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

भारतीय फॅशन रिटेल बाजार खूप मोठा आहे. अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय उद्योजक तयार वस्त्र निर्मितीच्या क्षेत्राच्या विकासास हातभार लावत आहेत. फॅशन डिझाईन कारकिर्दीला सुरुवात करण्यासाठी कठोर परिश्रम आणि चिकाटी आवश्यक असते. फॅशन डिझाईन करियरची तयारी करताना, आपले सर्वोत्कृष्ट काम दर्शविण्याचा प्रारंभ करणे महत्त्वाचं असतं. तुम्ही फॅशन डिझायनिंगच्या क्षेत्रांत पदार्पण करत असताना तुमचे पोर्टफोलिओ तुमच्या कौशल्यपूर्ण कामाची ओळख सांगत असतात. त्यासाठी तुम्ही तुमच्या स्वतः विषयीचे तसेच तुम्ही करू शकत असलेल्या कामाबद्दलची सविस्तर माहिती सांगू शकणारे नावीन्यपूर्ण पोर्टफोलिओ तयार करून घेणं उपयुक्त ठरतं.

**(लेखक करिअर, मानसशास्त्रीय समुपदेशक आहेत)**

Pune, Main
22/06/2022 Page No. 1

## *News Paper Clippings During June 2022*

### Section: Miscellaneous

पुढारी

# ग्रंथालयांना शासनाची सापत्न वागणूक

## नव्या ग्रंथालयांना २००५ पासून मान्यताच नाही : तुटपुंजे अनुदान, कर्मचारी अर्धपोटी

**कोल्हापूर : श्रीराम ग. पचिंद्रे**

महाराष्ट्र सरकारने २००५ पासून सार्वजनिक ग्रंथालयांची मान्यता थांबवलेली आहे, तसेच ज्या ग्रंथालयांना शासनाचे अनुदान मिळते, तेही अपुरे आणि अनियमितपणे मिळते. त्यामुळे ग्रंथपालांसहग्रंथालयकर्मचाऱ्यांनाही तुटपुंज्या वेतनावर राबावे लागत आहे. कोरोनाकाळानंतर तर ही परिस्थिती अधिकच बिकट बनलेली आहे. इतर अनेक योजनांवर वारेमाप पैसा खर्च करणाऱ्या सरकारची ग्रंथालयांना मात्र सापत्न वागणूक मिळत असल्याची ग्रंथालय कर्मचाऱ्यांची भावना आहे.

> कोरोनानंतर परिस्थिती अधिकच बिघडलेली आहे. अनुदान पुरेसे आणि वेळेत न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचे हाल होतात. अनुदानही वाढवले पाहिजे. नवीन ग्रंथालयांना मान्यता मिळायला हवी. ग्रंथपाल व इतर कर्मचाऱ्यांना ठराविक वेतनमान्यता मिळावी.'
>
> \- **रवींद्र गुर्जर,** प्रसिद्ध साहित्यिक, अनुवादक

> 'देशाने संसदीय व्यवस्था स्वीकारल्यानंतर जनसाक्षरता करण्याची जबाबदारी ग्रंथालयांवर पडली, पण शासनाच्या दुर्लक्षामुळे वाचन संस्कृती, ग्रंथालय, अभ्यासपूर्ण चर्चा लोप होत चालल्या. जबाबदार नागरिक तयार करणाऱ्या शाळा म्हणजे ग्रंथालये! पण तीच कुपोषित राहिल्यामुळे सामाजिक ताणतणाव, जातीय संघर्ष यांनी राक्षसी रूप धारण केले आहे. हे बदलायचे असेल तर ग्रंथालयांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत.'
>
> \- **श्याम जोशी,** (ज्येष्ठ ग्रंथपाल व ग्रंथालय चळवळीचे नेते)

यापूर्वीच्या काळात ग्रंथालय सुरू झाल्यानंतर मान्यता लवकर मिळायची. शासन त्याला पहिल्यांदा 'ड' वर्ग मान्यता देत असे आणि एक वर्षानंतर अनुदान सुरू होत असे. त्यानंतरच्या काळात 'क' आणि 'ब' वर्ग देण्यात येत असे. ग्रंथालयाला 'अ' वर्ग मिळण्यासाठी १५ वर्षांहून अधिक काळ जात असे. मात्र २००५ पासून शासनाने नवीन ग्रंथालयांना मान्यता देणेच थांबवले. त्यामुळे अनुदान देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

आजच्या घडीला महाराष्ट्रात सुमारे वीस हजार ग्रंथालये मान्यतेच्या प्रतीक्षेत आहेत, तर शासनाची मान्यता मिळालेली अनुदानप्राप्त ग्रंथालये साडेबारा हजार आहेत. बारा कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात मान्यताप्राप्त ग्रंथालये इतकी कमी असावीत, हे सांस्कृतिकदृष्ट्या अधिकच हानीकारक आहे. महाराष्ट्र सरकारने ग्रंथालयांच्या अनुदानासाठी ठेवलेला निधी फक्त पंचवीस कोटी आहे. हा निधी तुटपुंजा आहे आणि ग्रंथालयांच्या दर्जानुसार अनुदानाच्या रूपात तोही वेळेवर मिळत नाही. संदर्भ ग्रंथालयांना शासन दरवर्षी ठोक पंधरा हजार रुपये अनुदान देते. त्यात ग्रंथपालाचे मानधनही नीट देता येत नाही आणि इतर कर्मचाऱ्यांची तर गोष्टच दूर. मान्यताप्राप्त ग्रंथालयांना शासनाकडून मिळणारे अनुदान हे त्याचा वर्ग, सभासदसंख्या, पुस्तकांची संख्या इत्यादी बाबींवर अवलंबून असते. त्यामुळे सर्व ग्रंथालयांना समाजाकडून मिळणाऱ्या देणग्यांवर अवलंबून रहावे लागते. दोन वर्षांपूर्वी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतनवाढीसाठी आंदोलन करावे लागले होते.

ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. शियाळी रामामृत रंगनाथन यांच्या नावे शासकीय स्तरावर एकही पुरस्कार नाही. त्यांचा जन्मदिवस ग्रंथालय दिवस म्हणून साजरा केला जातो. पण, विद्यमान स्थितीत ग्रंथपालांची अवस्था केविलवाणी आहे. तसेच उत्कृष्ट ग्रंथपालांसाठी राज्य शासनाचा एकही पुरस्कार नाही. शासन पैसा नसेल तर विनाअनुदानित तत्त्वावर शाळा महाविद्यालयांना मान्यता देते, त्याच तत्त्वावर नव्या ग्रंथालयांना मान्यता देऊन शिक्षण सेवकांप्रमाणे ग्रंथालय सेवकांना नेमण्यास संमती द्यायला हवी, तरच वाचन संस्कृतीला चालना मिळेल.

Pune Edition
Jun 2, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

# Upcoming Events

## July 2022

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 *Vasantrao Naik Jayanti*  | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 *Lokmanya Tilak Jayanti*  |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images, Pinterest, Freepik.Com.*